# थोरो

विल्यम कॉन्डी

यदुनाथ थत्ते

१८६२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ११२०



REFBK-0012396

# थोरो

क्र. १२३९६

लेखक : विल्यम कॉन्डी

अनुवादक : यदुनाथ थत्ते

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थलप्रत.

अनुक्रम ३५२४३ वि: चरित्र

क्रमांक ........................ नों. दि. ..........

REFBK-0012396

REFBK-0012396

मूल्य : पाच रुपये

मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगांव, मुंबई ४.

© WILLIAM CONDRY AND
PHILOSOPHICAL LIBRARY

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगांव नाका, मुंबई ४.

प्रथमावृत्ति : १९६२

मुखपृष्ठ : राम वाईरकर

मुद्रक :
सौ. उषा नागपूरकर,
श्री मुद्रण मंदिर,
५८० सदाशिव, पुणें २.

# थोरो

१

[library stamp] १२३९९

*" माझ्या बालपणच्या अनुभवांची बरोबरी करूं शकेल असा एकहि अनुभव माझ्याजवळ नाहीं ... त्या वेळचें माझें जीवन म्हणजे एक रोमांचकारी काव्य होतें, साक्षात् काव्य ! "*

**— थोरो जर्नल – १८५१**

अमेरिकेंतले मॅसाच्युसेटस् हें संस्थान. तापत चाललेल्या एप्रिल महिन्याचे दिवस. इथला वसंत ऋतु मोठा आल्हाददायक. पण तो अल्पकाळच असतो. वसंत बहराला येण्याची धांदल करीत आहे. हिंवाळा अगदीं कंटाळा येण्याइतका लांबतो—वाटतें तो कधीं संपणारच नाहीं, अनंत काळ असाच चालत राहणार ! पण त्यानें थोड्या दिवसांतच आपली अवतार-समाप्ति केली आहे. बर्फाचें नांवनिशाण आतां राहिलेलें नाहीं. नद्यांना पूर आले आणि गेलेहि. झाडांना कळ्या फुटत आहेत. जणुं अंगावर रोमांच उभे राहिले आहेत. पक्ष्यांचें कूजन ऐकूं येऊं लागलें आहे. आपापल्या कळपांना हाकारीत घोडेवाले फिरूं लागले आहेत. सगळीकडे स्वच्छ सूर्य-प्रकाश पसरला आहे. अटलांटिक समुद्राच्या लाटा चमचम करीत आहेत. केप कोडची लांबलचक पुळण उबदार झाली आहे. बोस्टन शहर आप-ल्याच डौलांत आहे. त्याच्या गल्लयाबोळांतहि सूर्यप्रकाश शिरला आहे. जंगलाच्या आंतर भागांत, शेतांत आणि पाणथळीवरहि त्याचें साम्राज्य पसरलें आहे. पश्चिमेकडच्या टेकड्यांवरहि सूर्यकिरणांचा मुलामा चढला आहे.

बोस्टनच्या ईशान्येला आंतल्या बाजूला वीसएक मलांवर कॉकॉर्ड हें बऱ्यापैकीं खेडें वसलेलें आहे. वसंताच्या आगमनाची वर्दी या खेड्याला लागली आहे आणि जो तो त्याच्या स्वागताच्या तयारींत गुंतला आहे. वसंत म्हणजे कांहींना नांगरटीचें निमंत्रण वाटतें, तर कांहींना पेरणीचें. कांहींच्या दृष्टीनें हा जंगलतोडीचा हंगाम आहे. कांहींना वाटतें आहे कीं

आपापलीं घरेंदारें झाडा-सारवायचे हे दिवस आहेत. कोणाला वाटतें, घरांतल्या वस्तूंना आतांच एकदां ऊन दाखवून ठेवलें पाहिजे. कांहींची बगीचे उठवण्याची धांदल चालली आहे. सगळे या ना त्या कामांत गुंतले आहेत. अपवाद आहे तो थोरो कुटुंबाचा. सूर्याच्या किरणांत न्हाऊन निघण्यासाठीं ही मंडळी शेतांतून आणि जंगलांतून भटकंती करण्यांत गुंतली आहेत. जंगलांत तें एकटें एकच कुटुंब आहे. १८३० चें तें साल. निसर्गाचा आनंद लुटण्याची भाषा फक्त कवींच्या तोंडीं ऐकूं येण्याचा तो काळ. रविवारचा सुटीचा दिवस निसर्गाच्या सान्निध्यांत, घराबाहेर घालवण्याची कल्पना लोकमानसांत रुजायला आणखी पाऊण शतकाचा तरी काळ अद्याप जायचा आहे.

वसंतांतला हा पहिला शनिवार ! वसंतांतला पहिला फेरफटका करायला थोरो कुटुंब बाहेर पडलें आहे. ही सोफिया. वय अकरा वर्षें. रस्त्यानें जातां जातां फुलें वेचण्याचा तिला छंद आहे. हेनरीचें वय असेल तेराच्या आसपास. अमेरिकेंतल्या मूळ रहिवाशी इंडियनांप्रमाणें तो वागडतो आहे. जॉन त्याच्याहून दोन वर्षांनीं मोठा. तो हेनरीपेक्षां थोडा कमी स्वच्छंदी. त्याला पक्ष्यांचें निरीक्षण करण्यापेक्षां त्यांच्या खोड्या काढण्याचीच जास्त हौस आहे. या सर्वांत मोठा अठरा वर्षांचा हेलन. पण तो गंभीर आहे. त्याला झाडाझुडपांचा, वनस्पतींचा अभ्यास करण्याची गोडी आहे आणि त्यांत तो गढला आहे. त्यांच्याबरोबर आई-वडील दोघे आहेत. दोघांनाहि वसंत ऋतूचा त्या मुलांइतकाच उल्हास आहे. वसंताच्या हळुवार स्पर्शानें तेहि फुलांप्रमाणेंच पुलकित झाले आहेत. मुलांनाहि ग्रामीण भागाची आणि निसर्गाच्या सहवासाची गोडी आपल्याप्रमाणेंच लागावी अशी त्यांची इच्छा आहे. आई मोठी कर्तबगार स्त्री आहे. सगळ्या कामांत तिचाच पुढाकार असतो. आठवड्याच्या सुट्टीच्या दिवशीं असें घराबाहेर जाऊन निसर्गाची दौलत लुटावी असा आग्रह तिचाच असतो. तिच्या त्या निसर्गाच्या अतिरिक्त ओढीची एक गंमतीदार आख्याइका सांगतात. शनिवार घराबाहेर निसर्गाच्या सान्निध्यांत घालवण्याचा तिचा आग्रह असा पराकोटीचा कीं एकदां एका मुलाचा जन्मच शेताडींत व्हायची पाळी आली होती !

वडील पुढाकार घेत नसले तरी त्यांनाहि ही शनिवारची सहल आवडे. आपल्या पेन्सिलीच्या कारखान्याला शनिवारीं दुपारीं ते चक्क टाळें ठोकीत. इंग्लिश आणि जर्मन पेन्सिलींशीं बाजारांत करावी लागणारी जीवघेणी स्पर्धा ते डोक्यांतून बाजूला सारीत. त्यांचा हा छोटा कारखाना घराला लागूनच होता. तो बंद करून ते आपल्या कुटुंबाबरोबर जंगलची वाट धरीत. परंतु वडील फारसे बोलके नव्हते. त्यामुळें जंगलांतील भटकंतीबद्दल किंवा पेन्सिलींच्या उत्पादनाबद्दल त्यांच्या डोक्यांत कसलीं चक्रें फिरत, त्याचा थांग सहसा कोणाला लागत नसे. ते आपले मुकाट सगळयांचें ऐकत. वाचण्याची त्यांना आवड होती. पण गप्पांचा त्यांना स्वभावतःच कंटाळा. काम संपलें कीं सरळ वर्तमानपत्र वाचीत पडत, नाहींतर कॉकॉर्डमधला गप्पांचा अड्डा बनलेल्या मिल डॅमवर जाऊन लोकांच्या गप्पा ऐकून घेत. त्यांची स्मरणशक्ति दांडगी असे. त्यामुळें त्यांच्या पंचक्रोशींतल्या कोणत्याहि माणसापेक्षां त्यांच्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांचा गतकाळ त्यांनाच जास्त ठाऊक असे. हेनरीनें पुढें आपल्या दैनंदिनींत या गोष्टीचा कृतज्ञतेनें उल्लेख करून ठेवलेला आहे.

ह्या घराण्याचें मूळ फ्रेंच आहे, हें जॉन थोरो या नांवावरूनच ओळखूं येतें. त्यांचे लांबचे पूर्वज फ्रान्समधून आले असावेत असें गृहीत धरलें जात असलें तरी त्यांच्या आधींच्या पिढ्या जर्सीमधल्या खाडीवरच्या सेंट हेलियर या गजबजलेल्या बंदरांत राहत असत. जॉन थोरोंचे वडील हे सेंट हेलियर-मधल्या एका कलालाचे चिरंजीव. कलालाचा धंदा करणारे हे गृहस्थ १७७३ सालीं अमेरिकेंत आले आणि बोस्टनमध्यें त्यांनीं व्यापार सुरू केला. बोस्टन ही एक संपन्न बाजारपेठ असल्यानें इतर व्यापारीउदमी लोकांप्रमाणेंच त्यांनींहि नशीब काढलें. त्यांची सारी जिंदगी समुद्र आणि बेटें यांच्या परिसरांत गेली. पण म्हातारपणीं थोरो कुटुंबाचा जन्मजात हाडवैरी असलेल्या क्षयानें ह्या जर्सीच्या नागरिकाला घेरलें. मग त्यांनीं समुद्रापासून जरा दूर, शांत अशा कॉकॉर्डला प्रयाण केलें. १८०१ सालीं कॉकॉर्डमध्येंच ते परलोकवासी झाले. जॉनकडे त्यांचा वारसा आला. परंतु त्याच्यांत व्यापारी चलाखी नव्हती. त्यामुळें एकामागून एक व्यवहारांत त्याला खोट बसूं लागली आणि सगळा पैसा तो गमावून बसला. १८१२

सालीं सिंथिया डनबार हिच्याशीं त्याचें लग्न झालें. ह्या दांपत्याला चार मुलें झालीं. जॉनच्या बरोबर बोस्टन आणि कॉंकॉर्ड या परिसरांत ह्या कुटुंबानें एकामागून एक अपयशें घेतलीं ! शेवटीं आपल्या एका नातेवाई-काच्या शेतावर त्यानें हलकीसलकी तात्पुरती नोकरी पत्करली. कॉंकॉर्डच्या वेशीवरच हें शेत होतें. याच अवस्थेंत १२ जुलै १८१७ या दिवशीं ह्या दांपत्याच्या तिसऱ्या मुलाचा जन्म एका घरांत झाला. हें घर वाल्डेनच्या जंगलापासून कांहीं मैलांवर होतें. ह्या मुलाचें पाळण्यांतलें नांव ठेवलें डेव्हिड हेनरी. घरांत सगळे त्याला हेनरी या नांवानेंच हांक मारीत. पण पुढें आपल्या लेखनासाठीं कां कोणास ठाऊक पण त्यानें ‘ हेनरी दी थोरो ’ असें नांव वापरण्याचा पायंडा ठेवला. हेनरीला एकट्यालाच काय तें या नांवामागचें रहस्य माहीत होतें. ज्या घरांत हेनरी दी थोरोचा जन्म झाला तें घर त्या मूळच्या जागेच्या जवळच हलवलें गेलें असलें तरी आजहि तें तेथें उभें असलेलें आपल्याला दिसून येईल.

हेनरीची आई ही अनेक बाबतींत मोठी कर्तबगार स्त्री मानली जात असली पाहिजे. कर्नल एलिशा जोनचें रक्त तिच्या नसांतून वाहत होतें ! एलिशा जोन हा टोरी विचारांचा. त्यामुळें इंग्लंडच्या राजावर त्याची अनन्य निष्ठा. अमेरिकन राज्यकर्त्यांशीं त्यामुळें त्याची सतत झुंपलेली असायची. त्याच्याकडून हेनरीच्या आईनें झुंझार वृत्ति घेतली असावी. तिचें व्यक्तित्व मोठें प्रभावशाली होतें. तिला न आवडणाऱ्या माणसांशीं बोलतांना ती फटकळ होती, पण तिच्या मायेची पाखर पुष्कळांवर असे आणि त्यांच्याशीं वागतांना ती अत्यंत उदार असे. अशा लोकांचें आगतस्वागत ती मनापासून करी. तिचें वागणें सडेतोड आणि बोलणें अगदीं आडपडदा न ठेवणारें. मातुल घराण्याकडून तिनें हा गुण उचललेला होता. तिचें जबरदस्त व्यक्तित्व आणि सैल जीभ यांच्यामुळें तिच्या नवऱ्याला मानसिक मूकपणा आला होता कीं काय न कळे ! पुढें यापायींच हेनरीला घर सोडून वाल्डेनच्या जंगलांतल्या झोपडींत जाऊन राहण्याची पाळी आली असावी. चिंतनशीलता आणि एकांतप्रियता हे गुण हेनरीमध्यें त्याच्या वडलांकडून आले. त्याच्या आईकडून त्याला अखंड चैतन्यशील असें मन आणि शरीर वारसाहक्कानें मिळालें. ह्या चैतन्यानें अखेरच्या श्वासापर्यंत त्याला सोबत

केली. चाळीसाव्या वर्षी आपल्या दैनंदिनींत हेनरीनें जी नोंद केली आहे त्यावरून त्याच्या आईच्या उत्साही वृत्तीची साक्ष मिळते. " आपल्या तरुणपणीं, व्हर्जिनिया रोडला राहत असतांनाची गोष्ट, रात्रीं आईनें सांगितली. गाईचें हंबरणें, बदकांचें क्लक क्लक, हिल्ड्रेथसारख्या दूरच्या ठिकाणीं वाजणारे नगारे, हें सगळें तिला उन्हाळ्या रात्रीं ऐकूं यायचें म्हणे. पण एवढेंच नव्हे तर तिला मेरियम आपल्या सवंगड्यांसाठीं जी शीळ घाली तीहि ऐकूं यायची. त्याची शीळ वैशिष्ट्यपूर्ण समजली जात असे. ती सांगते कीं ऐन मध्यरात्रीं ती उठून दाराबाहेर येऊन पायऱ्यांवर बसायची. घरांतलीं सगळीं माणसें ढाराढूर झोपलेलीं. त्या वेळीं घड्याळाची टिक टिक काय ती तिला मागून, घराच्या आंतून ऐकूं यायची."

थोरोंच्या घरांत एक कुटुंब राहत होते म्हणण्यापेक्षां एक कुळच राहत होतें म्हटलें तर तें योग्य होईल ! हेनरीच्या आईला कितीहि माणसें जेवा-खायला असोत कधीं प्रश्न पडत नसे. कुठल्याहि दूरच्या मावशा, आत्या, लांबचीं भावंडें आणि मित्रमंडळी यांचा ती उत्साहानें पाहुणचार करी. येणाऱ्या पाहुण्यांत स्त्रियांची संख्या मोठी असे. घरांत हेनरीला स्त्रियांच्या घोळक्यांतच बहुधा वावरावें लागे.

प्राथमिक शिक्षणाचा फारसा ठसा हेनरीच्या स्मृतीवर उमटलाच नाहीं. त्याला त्या काळांत केलेल्या शिकारी, रेंगाळत केलेल्या सहली, नावेंतून मारलेल्या सफरी, छावण्या, पोहण्यांत घालवलेला काळ आणि बर्फावर घसरण्याची लुटलेली मजा एवढेंच बालपणचें आठवत होतें. कॉन्कॉर्डच्या भोंवतींचा भाग म्हणजे जणु एक प्रसन्न क्रीडांगणच होतें. रेतीचीं किंवा गवताचीं मैदानें, मध्येंच झुळझुळ वाहणारे झरे आणि पाणथळी. या झऱ्यांत मासे भरपूर असायचे. सडबरी आणि असाबेट ह्या दोन प्रवाहांच्या संगमा-वर तें खेडें वसलेलें होतें. त्या दोन प्रवाहांचा संगमानंतरचा जो खोल, संथ, नागमोडीं वळणें घेणारा प्रवाह त्यालाच कॉन्कॉर्ड हें नांव मिळालें होतें. शांत डोह, मॅपलच्या बागा, दूरवर पसरलेलीं पाईन वृक्षांचीं जंगलें आणि फताड्या पानांचीं झाडें आणि त्या सर्वांपाठीं पश्चिमेला उभें असलेलें वाचुसेटचें शिखर ! हें शिखर जन्मभर थोरोला खुणावत होतें. अमेरिकेंतील जंगलें आणि कुरणें यांच्यावर जेव्हां एकट्या इंडियनांचीच वस्ती होती त्या काळांतल्या गोष्टी

ऐकायला थोरोला बालपणीं फार आवडे. त्या वेळीं कॉंकॉर्डच्या त्यांच्या वसाहतीला ' मुस्केटाक्वीड ' असें म्हणत. स्वावलंबनाचे पाठ तो त्याच वेळीं गिरवीत होता. पुढें स्वावलंबन हेंच त्याचें जीवनाचें एक वैशिष्ट्य ठरलें. त्याचे इतर शेजारी स्वावलंबनाची महती जाणत नव्हतें. एखाद्या क्षेत्रांतील बौद्धिक नैपुण्यापेक्षां आपल्या हातांतील कलेची थोरवी त्याला अधिक वाटावी अशी स्थिति पुढें येणार होती.

पश्चिमेला नव्या वसाहती वसवण्यासाठीं जाणाऱ्या लोकांचा लोंढा दिसण्याचा तो काळ होता. परंतु प्रारंभींच्या वसाहती वसवणारांचा जोश आतां न्यू इंग्लंडमधून अस्तंगत झाला होता. प्रारंभींच्या लोकांना वाटणारी मानसिक आणि शारीरिक बेचैनी, त्यांची प्रवासांतली अपरिग्रही वृत्ति, तंबूराहुट्या ठोकणें, बंदुका खांद्यावर टाकून संकटाची चाहूल लागतांच त्यांतून आग ओकणें, आज इथें मुक्काम तर उद्यां दुसरीकडे प्रस्थान. आरंभींच्या पुरुषार्थी लोकांच्या ह्या अशा जीवनाचें दर्शन सुप्रतिष्ठित, सुसंघटित आणि खानदानी बनलेल्या एकोणीसाव्या शतकाच्या आरंभींच्या न्यू इंग्लंडमध्यें कुठलें व्हायला? खडतर कष्ट, नवधर्मांच्या पाइकांसारखें कठोर अनुशासन आणि काटकसर यांची कास धरून न्यू इंग्लंडनें व्यापार-उदीमाच्या क्षेत्रांतच आपला वरचढपणा सिद्ध केला होता असें नव्हे तर सांस्कृतिक क्षेत्रांतहि त्यांची बरोबरी करणारे कोणी नव्हतें. हॉर्वर्ड आणि येल हीं दोन विद्यापीठें तेथें स्थापन झालीं होतीं. या विद्यापीठांतून प्रागतिक विचारांचे न्यू इंग्लंडनिवासी तयार होत होते. ह्या मंडळींचा युरोपांतील तत्कालीन विचारांशीं–विशेषतः जर्मनी व ब्रिटनमधील विचारांशीं निकट संबंध होता. कॉंकॉर्डच्या दोन हजार लोकसंख्येचा त्या काळांतील सर्व पुरोगामी विचारांत सहज शिरकाव होत होता. समाजांतील बुद्धिसंपन्न लोकांनीं नवा, अधिक उदार असा युनिटेरियानिझमचा धर्ममार्ग स्वीकारला होता. अशा आध्यात्मिक बेचैनीच्या काळांत हेनरीची वाढ झाली. मानवी इच्छाशक्ति निष्प्रभ असून घटना आपल्या अपरिहार्य क्रमानेंच घडत असतात, असा जो एक वैफल्यग्रस्त विचार पसरत चालला होता त्याच्यावर स्वातंत्र्याची भावना मात करीत असलेला तो काळ होता. त्यामुळें सर्वत्र नवआशा अंकुरत होत्या. त्यांतूनच ध्येयवादी, प्रतिभावान आणि उदार

धर्ममतें असलेली एक जोमदार पिढी उदयाला आली होती. हेनरीच्या स्वतःच्या घरांत तर सुधारणा आणि क्रांति यांचें गहिरें वातावरण प्रथमपासूनच होतें आणि त्यांतच श्वासोच्छ्वास घेऊन तो वाढत होता.

पण आपल्या बालवयांत हेनरी अगदीं एखाद्या खेडवळ मुलासारखा होता. आपल्या परिवाराच्या उबेंत सुखावलेला जीव ! पुढच्या आयुष्यांतील बंडखोरीचा किंवा चिकित्सक मनाचा मागमूसदेखील त्या काळीं लागत नव्हता. अनवाणी वावरणाऱ्या त्याच्या इतर सवंगड्यांपेक्षां त्याच्या परिस्थितींत आणखी एक वेगळेपणा होता. त्याच्या आई-वडिलांनीं लग्नापूर्वीं जें सुखी, संपन्न आयुष्य घालवलें होतें त्याचा त्यांना विसर पडलेला नव्हता. आपल्या वडिलांना व्यापारउदीमांतून मिळालेली दौलत जॉन थोरोला डोळ्यांपुढें दिसत होती तर घराण्यांतील उद्योगधंद्यांत कर्तबगारी दाखवणाऱ्या आणि भली दांडगी जमीनदारी असलेल्या दोन्ही कुळांतल्या थोर पुरुषांची मालिका सिंथिया थोरोच्या मनश्चक्षूंसमोर उभी राहत होती. त्यामुळें दारिद्र्य आणि कष्ट वाट्याला आलें असूनहि सामान्य खेडूत मुलांपेक्षां आपल्या मुलांना जरातरी चांगलें शिक्षण मिळावें म्हणून त्यांची सर्व प्रकारें धडपड चालू असें. हें साधावें म्हणून जॉन थोरोनें शिसपेनींचा एक कारखाना आपल्या घरांत सुरू केला आणि सिंथिया पैसे घेऊन लोकांची राहण्या-जेवण्याची व्यवस्था घरांत करूं लागली. शिसपेनींचा कारखाना सुरू झाला तेव्हां हेनरी सहा वर्षांचा होता.

हेनरीनें शाळेंत पदार्पण केलें तें बोस्टनमध्यें. हेनरीच्या बाळपणाच्या आठवणींत तेथील हमरस्त्यांची आठवण प्रमुख होती. हेनरी पांच वर्षांचा असतांनाची गोष्ट. उन्हाळ्याचे दिवस. एके दिवशीं त्याची एक आत्या बोस्टनपासून खूप दूर वाल्डेनला त्याला घेऊन गेली. वाल्डेन म्हणजे जणुं पऱ्यांचा गूढरम्य प्रदेश ! वाल्डेनला घनदाट सावली असलेलें पाईनचें जंगल होतें आणि एक देखणा जलाशय ! तें "वनसौंदर्याचें दर्शन" त्यानें नंतर लिहून ठेवलें, "वाल्डेन म्हणजे नंतरच्या माझ्या स्वप्नांची मंचभूषा कितीतरी काळ होती. माझ्या आध्यात्मिक वृत्तीला त्या बाल्य काळांतहि तसल्या गोड एकांताची ओढ वाटूं लागली..." अशा रीतीनें बालपणींच निसर्गांतील सौंदर्यांत आणि संपन्नतेंत काठोकांठ भरून ओसंडणारी प्रसन्नता त्याच्या प्रत्ययाला आली. हा प्रत्यय अत्यंत उल्हासानें त्यानें शब्दबद्ध केला आहे.

" खरोखर जीवन हें आनंदमय आहे. जलाशयांत विहार करणाऱ्या मासोळ्या, उन्हाळ्यांतील सायंकाळीं जीवनांत पदार्पण करणारे ते अनंत जीवजंतु, वसंत ऋतूची चाहूल देणारे, जंगलांतील झाडांतून अहर्निश निघणारे ते मुरलीचे स्वर, आपल्या पंखांवर अनंत छटा घेऊन मिरवणारे फुलपांखरांचे ते इवले जीव किंवा झुळझुळणाऱ्या झऱ्यांत हिमतीनें प्रवाहाच्या विरोधी पोहत जाणारे ते मासे...यांचा विचार केला कीं ' आनंदाच्या डोहीं आनंद तरंग, आनंदची अंग आनंदाचें' असा प्रत्यय येतो. "

कॉंकॉर्डच्या प्रशाळेंत त्याची प्रवेश परीक्षेची तयारी झाली. तेथील हेनरीचें शिक्षण जुन्या पठडींतलेंच होतें. अभ्यासक्रमांत फ्रेंच आणि प्राचीन महाकाव्यें यांचा भरणा अधिक होता. इथें त्यानें मुरली वाजवायची कला हस्तगत केली आणि नृत्याचे धडे गिरवले. संगीताशींहि त्याची तोंडओळख इथेंच झाली. संगीताची जी एक अवीट गोडी जन्मभर त्याला होती त्याचीं बीजें इथेंच रोवलीं गेलीं. संगीताचा त्याच्या मनावर गहिरा असर होत असे. " संगीत म्हणजे भाषेनें कुणालाहि निवेदन करतां येणार नाहीं असा जीवनसंदेश देणारें एक अपूर्व माध्यम ! " असें त्याला वाटे. सामान्यतः हुशार मुलांना शाळेंतल्या पुस्तकांचें जेवढें प्रेम असतें तेवढें हेनरीलाहि होतें. स्वच्छंदीपणाच्या त्या काळांत मोठेपणीं पुढें त्याला जें जाणवलें तें जाणवणें शक्य नव्हतें. मोठेपणीं त्यानें लिहिलें आहे, " शिक्षण सामान्यतः नेहमीं काय करतें ? झुळझुळत्या झऱ्याचें तें डबकें बनवून टाकतें ! " तें कांहीं असो पण शाळेंत जें कांहीं गणित तो शिकला त्यामुळेंच पुढें त्याला जंगल आणि शेतें यांच्या मोजणीदाराचें काम मिळालें ! त्याच्या उभ्या आयुष्यांत त्याच्या स्वभावाशीं जुळणारें आणि भटकंतीला वाव असणारें असें दुसरें काम त्याला कधीं मिळालें नाहीं.

हेनरी थोरोनें वयाच्या सोळाव्या वर्षी हॉर्वर्ड विद्यापीठांत प्रवेश केला. लॅटिन, ग्रीक, फ्रेंच आणि गणित या विषयांवर त्यानें चांगलें प्रभुत्व संपादन केलें होतें. होतकरू मुलांसाठीं ठेवलेली एक शिष्यवृत्तीहि त्याला मिळाली. विश्वविद्यालयांत त्यानें चांगलें प्रावीण्य दाखविलें. तीन वर्षांत परीक्षकांना त्यानें संतुष्ट केलें. परंतु त्याच्या आवडीनिवडीची कक्षा विशाल होती. त्याचें वाचन अफाट होतें आणि त्याचीं मतें अगदीं स्वतंत्र होतीं. त्यामुळेंच बहुधा त्याला

त्यांनीं प्रावीण्याचा दाखला दिला नसावा. हेनरीच्या मतें विद्यापीठ म्हणजे जगांतील सर्व ठिकाणच्या आणि सर्व काळांतील विचार प्रवाहांशीं गांठ घालून देणारें प्रवेशद्वार होतें. सामाजिक संबंध जोडण्याचें किंवा व्यावसायिक कसब हस्तगत करण्याचें केंद्र, अशी त्याची विद्यापीठाबद्दल संकुचित कल्पना नव्हती. मिळेल तेवढा जास्तींत जास्त वेळ विद्यापीठाच्या ग्रंथालयांत घालवायचा, अशी त्याची संवय होती. ग्रंथालयांत गेल्यावर अभ्यासक्रमाची गोष्टहि त्याच्या गांवीं नसायची. आपल्या आवडीच्या विषयावरचीं पुस्तकें वाचण्यांत तो अगदीं गढून जायचा. जर्मन साहित्य आणि सतराव्या शतकांतील इंग्लंड हे त्याचे खास आवडीचे विषय होते. त्याच्या परीक्षेला नेमलेल्या विषयांसंबंधीं त्याला जेवढें ज्ञान हॉर्वर्ड सोडतांना होतें त्यापेक्षां किती तरी चांगली तयारी त्याची वरच्या दोन विषयांची झालेली होती. त्याचें वाचन सखोल असे आणि हॉर्वर्डच्या ग्रंथालयांतून वाचण्यासाठीं पुस्तकें आणण्याचा त्याचा हा क्रम मरेपर्यंत चालू होता.

हॉर्वर्डला तो एक बेफिकीर मुलगा होता. पण तेथून तो बाहेर पडला मात्र एक वावरलेला बेचैन तरुण म्हणून. हॉर्वर्डमधील त्याच्या वास्तव्यांतील त्याच्या शैक्षणिक यशाबद्दलच्या ढोबळ गोष्टी तेवढ्या आपल्याला ठाऊक आहेत. पण तेथें असतांना त्याच्या अंतःकरणांत जें तुमुल चाललें होतें त्याचा फारसा थांगपत्ता लागत नाहीं. त्याचें विश्वविद्यालयीन जीवन फारसें गमतीचें नसावें असें वरवर पाहतां वाटतें. विद्यापीठांतील सामाजिक जीवनाबद्दल त्याला फारशी गोडी नसावी. हॉर्वर्डमधील त्याच्या सहाध्यायांच्या त्याच्यासंबंधींच्या आठवणी बऱ्याचशा परस्परविरोधीच आहेत. थोरोच्या विश्वविद्यालयीन जीवनासंबंधींच्या आठवणींत, त्याचा समकालीन असणारा जॉन वाईस यांनीं निवेदलेल्या आठवणी पुष्कळशा खऱ्या असाव्या. त्यांतून थोरोच्या जीवनाविषयीं मिळणारी माहिती मोठी रोचक आहे. " त्याच्या त्या शांत, गंभीर चेहऱ्यामागें एखादा थोर विचारवंत आकारास येत आहे, याची आम्हांला पुसटशीहि कल्पना नव्हती. त्याच्या व्यक्तिगत आवडीनिवडींविषयीं सांगता येण्याजोगें फारसें नाहीं. हां, प्राचीन इंग्लिश साहित्याबद्दल त्याला अनिवार ओढ होती आणि गोवेर, चॉसर यांच्यापासून एलिझाबेथच्या कारकीर्दींतील कवींपर्यंतच्या कित्येक नामवंत कवींचे काव्य-

संग्रह त्याच्या गाठीं होते, हें बरीक सांगतां येईल. ज्ञानाच्या ह्या खाणींत तो अत्यंत उत्साहानें राबतांना दिसे. लोकांबाबत तो बेफिकीर वाटे. त्याचे सहाध्यायी त्याच्यापासून दूर अंतरावर असल्यासारखे भासत. थोरोच्याभोंवतीं सतत एक प्रकारचें निगूढ वातावरण असे. पण तें जुन्या श्रद्धाशील वडील-धाऱ्या माणसांनीं आपल्या पाल्याला काळजीपायीं त्याला लेववलेल्या अंगर-ख्याइतकें ढगळ नसे.त्याच्या चेहऱ्यावर विचाराची चमक अद्याप दिसूं लागली नव्हती. चेहरा शांत-गंभीर असला तरी जरासा मंदच वाटत असे, थोडा थकल्या-भागल्यासारखा म्हटलें तरी चालेल ... पण त्याची नजर कित्येक-वेळां शोधक वाटे. जणुं त्याचें कांहीं हरवलें असावें किंवा कांहीं तरी गवसण्यासाठीं त्याची धडपड असावी ! सर्वत्र विखुरलेलीं रहस्यें शोधण्याचा निसर्गाचें हें लेकरूं प्रयत्न करीत आहे, असें त्याला पाहून वाटे. सामान्यतः उतावळ्या निरीक्षकाच्या दृष्टीला दिसणार नाहींत अशा सजीव-निर्जीव सृष्टींतील ज्या गोष्टी, त्या त्याच्या डोळ्यांनीं नेमक्या टिपून घेतलेल्या असत. कोणालाहि सहजासहजीं कल्पना होणार नाहीं इतकें भूमीवरचें त्याच्या नजरेच्या टप्यांत येई...असा माणूस आम्हां सहाध्यायी कॉलेजकुमारांपासून दूर दूर राहिला तर नवल वाटायला नको. तो कुठल्याशा वाल्डेन तलावाच्या कांठीं आतां राहूं लागला होता आणि अंतःकरणांतील सखोल भागांत चाललेल्या क्रीडेंत तो रममाण झाला होता......

"त्यांचें मन आतां पूर्ण जागरूक झालें होतें. इंग्रजी साहित्यांत जें जें उत्कृष्ट म्हणून सांपडण्याजोगें होतें तें तें हा उद्यांचा गद्यभास्कर मनांत सांठवीत होता. आणि लिहीत होता मात्र काव्य! हॉर्वर्डच्या आपल्या सहाध्यायांची, हा उद्याचा सामाजिक प्रश्नांवरचा भाष्यकार बैठ्या खेळांत कसोटी पाहतांना आढळत होता. आपल्या सुट्टयां घालवायला तो कॉंकॉर्डला येई. एकदां राल्फ वाल्डो इमर्सनला त्यानें हॉर्वर्डमधील लोकजीवनावरचें जें सडेतोड आणि विनोदी भाष्य ऐकवलें त्यामुळें तो भलता खूष झाला आणि त्यानें आपल्या विश्वविद्यालयीन जीवनांतील स्मरणें लिहून काढण्याची त्याला सूचना केली. हेनरीनें ही सूचना विशेष मनावर घेतली नाहीं. स्वतःचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचें किंवा ॲशिलसचा अनुवाद करण्याचें • अधिक प्रभावीपणें त्याच्या मनांत घोळत होतें. पण भवितव्यता त्याच्या

साठीं वेगळेंच मनोहर सांकेतिक गाणें आळवीत होती आणि त्याच्याच कानांना तें जाणवत होतें. त्या संकेताच्या अनुरोधानें कूच करायला तो उतावीळ झाला होता. व्यावहारिकदृष्ट्या अगदीं निरुपयोगी असें तें संगीत होतें. त्या तालासुरावर चालणारा हेनरी हा त्याच्या स्वतःच्याच एका विलक्षण मार्गाचा यात्रेकरू झाला.'

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि ....................

# २

*" मी म्हणजे अपेशी धडपडींचें एक गाठोडें.*
*नशीबाच्या एका वस्त्रानें एकत्र आवळलेलें."*

**—थोरो**

हॉर्वर्डनें हेनरीला पुस्तकी किड्याहून जास्ती कांहींतरी केलें. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें त्याला लेखक म्हणूनहि हॉर्वर्डनें आकारास आणलें. एडवर्ड टी. चॅनिंग हे त्याचे निबंधविषयाचे प्राध्यापक होते. न्यू इंग्लंडच्या संजीवनाचे नेते ठरलेले इमर्सन, ऑलिव्हर वेंडेल, होम्स हे त्यांच्या हाताखालींच तयार झालेले. त्यांनीं तर्कशुद्ध आणि सौंदर्यपरिप्लुत अशा शैलींत लिहिण्याची कला थोरोला दिली. विद्यार्थ्यांच्या कल्पनांची तेथें कसून छाननी केली जाई. थोरोनें आपले विश्वविद्यालयीन निबंध साक्षेपानें सांभाळून ठेवले होते. त्यांतल्या नुसत्या शीर्षकांवरून वरवर नजर टाकली तरी त्या निबंधांचा नैतिक दर्जा केवढा उच्च असला पाहिजे त्याची कल्पना येते. मानवी जीवनाच्या एखाद्या अंगावर शोधक प्रकाशझोत टाकणारें नेटकें असें व्याख्यान नियमानें तयार करणें, हें मोटें जिकिरीचें आणि कंटाळवाणें कार्य असे. आणि त्यामुळें इतर सहाध्यायांप्रमाणें हेनरीनेंहि कांहीं भयंकर, कृत्रिम आणि रसहीन निबंध खरडले. तो फार लवकर समाजाचा एक मौलिक टीकाकार बनला होता, हें आपण मागेंच पाहिलें आहे. तो महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षांत असतांनाच इमर्सननें त्याच्याविषयीं आपल्या दैनंदिनींत नोंदलें आहे, " तो मुलगा सामाजिक प्रश्नांसंबंधीं बोलतो तेव्हां तें विनोदी वाटतें, पण त्यामागचा आशय गंभीर असतो. " हॉर्वर्डच्या कुंपणांत असेपर्यंत आपले विचार ' ह्या मुलानें ' फारसे प्रकट केलेच नाहींत. एकदांच काय ती त्याच्या हृदयांतील व्यथा बाहेर पडली. तो म्हणाला, " शहरी माणसांपेक्षां हा जो गांवढळ वाटणारा इंडियन आहे त्याच्यांत अधिक माणुसकी आहे. तो माणूस म्हणून

जगतो, माणूस म्हणून विचार करतो आणि माणूस म्हणून मरतो ... शिक्षण हें एक कलेचें उपांग आहे. परंतु परिपूर्ण मानवाला त्याची गरज काय? त्याला त्यांतून काय संस्कार मिळणार? " हें ऐकून अध्यापकांच्या भुवया कशा वर चढल्या असतील, याची कल्पना करतां येण्यासारखी आहे! पण असे प्रसंग क्वचित् येत. आपल्या बंडखोरीनें उफाळणाऱ्या मनाचा थांग हेनरीनें आपल्या पौगंडावस्थेंत फारसा कोणाला लागूं दिला नाहीं.

हॉर्वर्डच्या वास्तव्याच्या काळांत विचारांच्या अथांग सागरांत थोरो बुडून गेला होता. त्याच्या पिढींतील तरुण मनें हेलावून सोडणाऱ्या नवनव्या कल्पना वातावरणांत प्रसृत झालेल्या होत्या. इंग्लंडमध्यें रॉबर्ट ओवेन हा प्रसिद्धीच्या शिखरावर होता. न्यू इंग्लंडमध्यें त्याच्या अनुयायांचा परिवार फार मोठा होता. त्या सर्वांना समाजवादी नवयुगाच्या आगमनाच्या भेरी ऐकूं येत होत्या. ही समाजवादी क्रांति कोणत्या मार्गानें अवतरणार, याबाबत मात्र त्यांच्यांत भिन्न मतें होतीं. त्यांपैकीं जे इतर, कमी स्वप्नवादी आणि अधिक व्यवहारवादी होते, त्यांची अशी खात्री होती कीं समाज ही जी झेप घेणार आहे ती श्रमिकांच्या संघटित बळावरच शक्य होईल. श्रमिकांच्या संघटनांच्या हातीं सत्ता आली म्हणजेच हें परिवर्तन घडून येईल, असा त्यांचा विश्वास होता. तो काळ क्रांतिकारी संघांचा, जन्मसिद्ध हक्कांच्या भाषेचा आणि जिवंत हुतात्म्यांचा होता! कोलरिज आणि वर्डस्वर्थ यांचा सौंदर्यवाद अद्याप वातावरणांत भरून राहिला होता. कोलरिज, स्कॉट, बायरन, शेली आणि कीट्स या दिवंगतांचा प्रभाव सर्वत्र जबरदस्त होता. अमेरिकेंतहि तो इतर ठिकाणांपेक्षां कोठल्याहि प्रकारें कमी नव्हता. अर्थात् भावविवश सौंदर्यवादाची जागा वास्तववादाकडे येत होती. औद्योगिक क्रांति आणि तिच्यामुळें कारखानदारी असलेल्या नगरांची वाढणारी संख्या आणि त्यामुळें निर्माण झालेले सामाजिक प्रश्न यामुळें हें नवें वळण मिळत होतें! युरोप–अमेरिकेंत विचारवंतांचें दळणवळण सतत होत होतें. मधमाशा ज्याप्रमाणें मध गोळा करून आपल्या घरट्याकडे समृद्ध होऊन येतात त्याप्रमाणें नवनव्या कल्पना घेऊन हे विचारवंत आपल्या मायदेशीं परतत होते. चाटेयुब्रियांग आणि ह्यूगा यांच्या सौंदर्यवादाप्रमाणेंच फ्रान्समधून चार्लस फोरियरच्या आदर्शवादी, समाजवादी कल्पनाहि त्यांनीं आयात

केल्या होत्या. त्यानंतर थोड्याच अवधींत न्यू इंग्लंडमध्यें फोरियरिस्टांचा एक गट अस्तित्वांत आला. ह्या मंडळींना श्रमिकांच्या चळवळींत फारशी गोडी नव्हती. समाजवादाचा आपल्या जीवनांत आविष्कार व्हावा अशी त्यांची तळमळ होती आणि त्यासाठीं त्यांनीं छोट्या आश्रमांची व समाजवादी परिवारांची स्थापनाहि केली होती. जर्मनींतून त्यांनीं तत्त्वज्ञानाची आयात केली होती. युरोपियन विचारवतांच्यामार्फत कांहीं न्यू इंग्लंडनिवासियांनीं याहिपुढें मजल मारली होती. पौरस्त्यांच्या अध्यात्मविचारांशीं ते येऊन ठेपले होते.

न्यू इंग्लंडचें मन यामुळें विशाल झालें आणि त्याची प्रतिभा जागृत झाली. विशेषतः नवकल्पनांबद्दल सतत स्वागतशील असलेलीं तरुण मनें अधिकच प्रभावित झालीं होतीं म्हटलें तर तें योग्यच ठरेल. कार्लाइलच्या स्फूर्तिदायी विचारांपासून प्रेरणा घेणारे अग्रदूत म्हणून बहुधा बोस्टनच्या व्यापारीवर्गाचाच निर्देश करावा लागेल. हॉर्वर्ड विद्यापीठ अमेरिकेंतील विचारांचें माहेरघर बनावें यासाठीं ते पैसा देण्यांत धन्यता मानीत. अर्थात् परदेशी बनावटीच्या कल्पना त्यांच्या महाविद्यालयांत बहराला येतांना दिसल्या कीं क्षणभर आपला पैसा व्यर्थ गेल्याची खंतहि त्यांना वाटे. परंतु परदेशी व्यापार–व्यवहार आणि परदेश–पर्यटन करणारीं माणसें यांच्यामुळें बोस्टनवासियांचें जीवन बहुरंगी बनण्याची प्रक्रिया सुरू झाली होती आणि आधुनिक संस्कृति आणि सभ्यता व त्यांचा सनातनीपणा यांतील संघर्षहि त्यांच्या वाढत्या समृद्धीमुळें बोथट होत गेला. आतां युरोपियन लोकहि, एडिंबर्ग, पॅरिस यांच्या जोडीला सरळ सरळ बोस्टनचें नांव घेऊं लागलें होतें. न्यू इंग्लंडमध्येंहि नवे चांगले लेखक पुढें येऊं लागले होते. थोरो हॉर्वर्डला असतांना तीस वर्षांचा हेनरी वर्डस्वर्थ लॉंगफेलो हा विदेशी भाषांचा प्राध्यापक होता. त्याच्या कविता ख्याति पावत होत्या. राल्फ वाल्डो इमर्सन हा हॉर्वर्डला पहिल्या वीस वर्षांत शिकत होता. कोलरीज, वर्डस्वर्थ, लॅंडोर, डीक्विन्सी आणि कार्लाइल यांच्याशीं त्याच्या गाठीभेटी झाल्या होत्या. तो आतां अध्यापक आणि निबंधकार म्हणून मान्यता पावला होता.

तिसऱ्या दशकांतलें वातावरण बंडखोरी आणि आशावाद यांनीं भरलेलें होतें. त्या काळांतील लोकांमध्यें आणि विशेषतः तरुण वर्गामध्यें अशी श्रद्धा

निर्माण झाली होती कीं नवमानवाची घडण होत आहे. हा नवा मानव म्हणजे शौर्य, स्वावलंबन आणि समजूतदारपणा यांची मूर्ति असेल, अशी त्यांची भावना होती. नवजीवनाच्या चळवळींत सामील होण्यासाठीं इमर्सन आपल्या चाहत्याना आवाहन करीत होता. या चळवळीमुळें मानवी मन समजूतदारपणाच्या वरच्या पायरीवर आरोहण करील, असें त्याच्या चाहत्यांना जाणवू लागलें होतें. मौलिक विचारांचे हे जे नवप्रवाह त्यांना एक अभिधान देणें अवघड होतें. न्यू इंग्लंडमध्यें नुसत्या 'नवता' शब्दानें त्याचा उल्लेख होत होता. नवता म्हणजे तत्त्वज्ञानांतील जाणवणारें असें एक नवें गुह्य असें सर्वांना समजत होतें. मुख्यतः राल्फ वाल्डो इमर्सनच्या नांवाशीं ही नवता अभिन्नरूपानें जुळलेली होती. १८३७ सालीं बावीस वर्षांचा, पदवीधर झालेला हेनरी थोरो विश्वविद्यालयाकडून आपल्या कॉंकॉर्डमधील घराकडे वळला. तो काळ पाश्चात्य प्रगतीमधला मामुली काळ नव्हता. आणि १८३७ सालीं कॉंकॉर्ड हेंहि एखादें साधेसुधें खेडें राहिलेलें नव्हतें. कारण इमर्सन त्या गांवांत आल्याला एव्हांना तीन वर्षें लोटलीं होतीं.

इमर्सन चौतीस वर्षांचा होता. पण त्याचें व्यक्तित्व भारावून टाकणारें होतें. त्याचा प्रभाव विशेषतः तरुण वर्गावर अधिक होता. जुन्या निर्जीव तत्त्वज्ञानाचें खांद्यावरील ओझें भिरकावून निर्भयपणें बौद्धिक स्वातंत्र्य आणि मौलिकता यांच्या दिशेनें आगेकूच करण्याचें त्याचें आवाहन ज्या तरुण मनांना पोंचलें होतें, तीं त्याच्या छंदीं लागलीं होतीं. इमर्सन म्हणजे कोठल्याहि तरुणांना हलवून टाकणारा ज्वलंत संदेश होता. परंतु १८३० मधील तरुण पिढीच्या दृष्टीनें तर तो एक ज्वालामुखी होता. एके काळीं बोस्टनच्या गिरजाघरांत धर्मगुरु असलेला इमर्सन, पण त्यानें नवदर्शन होतांच त्या संप्रदायाचा त्याग केला होता. एव्हांना त्याच्याजवळ पुरेशी खासगी माया जमली होती. त्यांतून कॉंकॉर्डच्या गांवाबाहेर एक टुमदार घर त्यानें घेतलें होतें. या ठिकाणीं राहून त्याला ग्रामीण जीवनाचा मनसोक्त आनंद लुटतां येत होता आणि शिवाय हॉर्वर्ड आणि बोस्टनमधील बुद्धिवादी मंडळींशीं निकट संपर्क ठेवण्याचीहि सोय होती. त्याचें बालपण दुर्दैवाच्या फेऱ्यांत गेलें होतें. हॉर्वर्ड आणि संप्रदाय सोडल्यानंतर कांहीं काळ त्यानें शिकवण्याचें काम केलें, परंतु नंतर तें सोडून दिलें. त्यानें दारिद्र्याशीं झुंजारपणें सामना

दिला होता. क्षयरोगानें त्याच्याशीं मैत्री केली होती. लग्न केलें तरी वैवाहिक सुख त्याला फार काळ लाभलें नव्हतें. त्याचें आयुष्य म्हणजे एकामागून एक हातच्या गेलेल्या संधींचा एक निरुद्देश प्रवाहच बनला होता! त्याच्या निबंधांतील व भाषणांतील बौद्धिक चमक, तर्कशुद्ध विचार आणि स्पष्टपणा वडीलधारी मंडळीहि मान्य करीत, पण त्यांतून अराजक आणि पाखंड तेवढें माजेल असें त्यांना वाटे. इमर्सन उंचापुरा, उदास चेहऱ्याचा, निळ्या डोळ्यांचा पण एकूण दिसायला चांगल्यांत गणना होईल असा होता. त्याच्याकडे पाहिल्यावर तो स्वतःच्या आवडीच्या विषयांत तल्लीन होणाऱ्या एखाद्या विद्वानासारखा भासे. त्याच्या चेहऱ्यावर एखाद्या प्रेषिताचें तेज दिसे. आपला जीवनसंदेश इतरांना सांगण्याचें तेंच औत्सुक्य आणि आपल्या निकट वर्तुळांतील सहयात्रींसंबंधीं तीच ओढ. हेनरी थोरोसारखा कुशाग्र बुद्धीचा तरुण यामुळेंच त्याच्याकडे ओढला गेला. थोरोच्या जीवनाची घडण करणारा इमर्सन हा एक प्रभावी शिल्पकार बनला. पण असा हा आदर आणि प्रभाव दोघांचाहि एकमेकांवर होता. खेड्यांतून विद्यार्थी म्हणून आलेल्या थोरोची अभिजात बुद्धिमत्ता, त्याचा निर्भय प्रांजळपणा, त्याची अव्वल दर्जाची हुशारी आणि त्याचें आध्यात्मिक सामर्थ्य यांची ओळख पटायला इमर्सनला फारसा कालावधि लागला नाहीं. हेनरीच्या मनांत वसत असलेल्या आदरानें त्याला संतोष वाटे. त्याच्या हजरजबाबीपणानें त्याची मोठी करमणूक होई. त्याचें निसर्गप्रेम, स्थानिक कसबांतील त्याचा हातखंडा आणि त्यांच्यांतील साहित्यिक गुणांचें झालेलें अस्फुट दर्शन, यामुळें इमर्सन त्याच्यावर खूष होता. हेनरीला आपल्या गुरूकडून शिकायला पुष्कळच मिळालें, पण शेतीव्यवसायांतील कांहीं कसब त्यानें इमर्सनला शिकवलेंहि.

थोरोच्या दृष्टीनें ग्रीक भाषा म्हणजे तेजस्वी विचार आणि पुरुषार्थी समाजाचें काव्य समजून घेण्याचा एक राजरस्ता होता. प्लेटो त्याला मंद आणि मिळमिळीत वाटला, पण इलियटच्या काव्यावर प्रभुत्व मिळण्यासाठीं करावी लागलेली मेहनत मात्र त्याला सार्थकी लागली असें वाटलें. लॅटिनच्या लेखकवर्गाबाबतचा अनुभवहि असाच. सर्वांत मौलिक अशा आधुनिक विचारांची गंगोत्री असलेली जर्मन भाषा शिकणें आवश्यकच होतें. फ्रेंच भाषेंतील अनुवादांच्या साह्यानें पौरस्त्य अध्यात्मशास्त्राशीं त्याची तोंडओळख

झाली होती. एक उत्साही ओवेनाइट, ऑरेस्टस ब्राउनसन यांच्याशीं त्याची दोस्ती जमल्यामुळें इंग्लिश समाजवाद्यांच्या प्रमुख कल्पनांसंबंधीं त्याला चर्चा करतां आली होती. हेनरी हॉर्वर्डमध्यें शिकत असतांनाच इमर्सनचें ‘ नेचर ’ हें काव्य प्रसिद्ध झालें होतें. तें त्यानें एखाद्या अधाशा-सारखें वाचलें. त्यांतून त्याला शुद्ध आणि स्पष्ट असा आंतला आवाज ऐकूं आला. स्वावलंबन आणि निसर्गचिंतन यांतून परिणत होणाऱ्या आत्मौपम्य बुद्धीसंबंधींची जी अबोध ओढ त्याला जाणवत होती तिची स्पष्ट जाणीव त्याला इमर्सनचें हें काव्य वाचून झाली. इमर्सननें लिहिलें होतें : “ आजच्या जगांत ज्या फाटाफुटी दिसतात आणि तुकड्यांच्या ढिगाऱ्यासारखें त्याला जें रूप आलें आहे, त्याचें कारण मानव स्वतःलाच पारखा झाला आहे हें आहे. ...म्हणून तुम्ही स्वतःचें विश्व उभारा.”

नुकत्याच पदवीधर झालेल्या हेनरी थोरोच्या डोक्यांत, जीवनांत काय करावयाचें, ह्यासंबंधीं मोठ्या भव्य, पण पुसट कल्पना होत्या. त्यानें निर्वाहासाठीं अध्यापनाचा व्यवसाय करावा, अशी त्याच्या आईबापांची इच्छा होती. पण त्याच्या डोक्यांत कवि होण्याचें वेड होतें. इमर्सनच्या परिवारांत कवि म्हणूनच त्याचा शिरकाव झाला होता. १८३७च्या ऑगस्ट महिन्यांत स्वारी हॉर्वर्डहून परतली. त्यानंतर सप्टेंबर महिन्यांतच कॉंकॉर्डच्या ग्रामशाळेंत त्यानें शिक्षकाची तात्पुरती म्हणूनच नोकरी पत्करली. पण आठवडाभरांत स्थानिक शिक्षण समितीशीं त्याचें भांडण जुंपलें. हेनरीनें मुलांना सक्त शिक्षा करावी, अशी समितीची सूचना होती आणि अशा कडक्या शिक्षेवर हेनरीचा मुळांतच विश्वास नव्हता. एकदां एका धर्मगुरूनें पोरांना फोडून काढण्याचा धोशा लावला म्हणून हेनरीनें सहा विद्यार्थ्यांना छडीखालीं झोडपलें. पण त्याचा त्याला एवढा उबग आला कीं, पुन्हा न परतण्याचा निर्धार करून तो शाळेंतून निघून गेला. कोवळ्या मुलांना अशी क्रूर सजा ठोठावण्यापेक्षां रस्त्यावर खडी फोडलेली काय वाईट, असें त्याला वाटलें ! त्याच्या ह्या तऱ्हेवाईक वागण्याबद्दल त्याच्या घरच्या लोकांना काय वाटलें त्याची कुठें नोंद नाहीं, पण त्याच्या अबोल बापाला काय वाटलें असेल याची कल्पना करणें कठीण नाहीं. आपल्या छोट्या शिसपेनीच्या

कारखान्यावर बिचाऱ्याला धड गुजारादेखील करतां येत नव्हता. आपल्या भडक माथ्याच्या पोराच्या ह्या चमत्कारिक वागण्यामुळें बिचाऱ्याचें डोकें फिरून गेलें असेल! हेनरीच्या ह्या अशा वागण्याबद्दल कुटुंबांतल्या इतर मंडळींनीं कशी प्रखर सहानुभूति दाखवली असेल याचें चित्र रेखाटणें सोपें आहे! कारण मानवतावादाच्या प्रस्थापनेसाठीं करावयाच्या सुधारणांचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. थोरो कुटुंबाचें घर हें खरें म्हणजे गुलामगिरीविरोधी लढ्याचें एक केंद्र त्या काळीं बनलें होतें.

'आतां पुढें काय?' हा हेनरीच्या पुढचा तात्कालिक महत्वाचा प्रश्न होता. त्या वेळीं आणि नंतरहि कित्येक वर्षें निर्वाह कसा चालवावयाचा ही त्याच्या-पुढील बिकट समस्या होती. नेकीनें सर्व शक्ति वेंचून अहर्निश करतां येईल असा एखादा व्यवसाय त्याला हवा होता. धंदेवाईक कवीच्या किंवा साहित्य-समीक्षकाच्या सेवेची कॉंकॉर्डला मुळींच गरज नव्हती. हेनरीला लांडीलबाडी करणें शक्य नसल्यानें त्यानें आपल्या बापाच्या शिसपेनींच्या कारखान्यांत मदत करण्याचें तात्पुरतें ठरवलें. पण शिसपेनींचा धंदा भरभराटलेला नव्हता. थोरोंच्या कारखान्यांतील शिसपेनी दर्जेदार होत्या, पण परदेशांतून आयात केलेल्या स्वस्त शिसपेनींनीं बाजार काबीज केला होता. त्यांच्या कंपनीचें नांव 'थोरो अँड सन्स' असें असलें आणि मुलें–विशेषतः हेनरी पेन्सिली बनविण्यांत वाकबगार असला तरी धंद्याची परिस्थिति अशी नव्हती कीं, मुलांना त्यांत लाभदायक रोजगार देतां यावा.

त्यामुळें मुलांना रोजगारासाठीं दुसरीकडे वळावें लागलें. हेनरीची ग्राम-शाळेंत परवड झाल्यानंतर त्यांनीं स्वतःचीच शाळा सुरू करण्याचा विचार केला. १८३८ च्या जून महिन्यांत त्यांची शाळा सुरूदेखील झाली. जॉन आणि हेनरी थोरो या भावंडांनीं तीनच महिन्यांत कॉंकॉर्डची पडित अकादमी ताब्यांत घेतली. त्यांच्या पटावर पंचवीस विद्यार्थी होते आणि येऊं इच्छि-णाऱ्यांच्या यादीची लांबीहि बरीच मोठी होती. नंतरचीं कित्येक वर्षें या साहसी प्रयोगामुळें त्यांची निर्वाहाची चिंता मिटली होती.

सर्व दृष्टींनीं ही शाळा चांगली होती. अभ्यासक्रमाची आंखणी नेटकी केली होती. शिस्तीचें वळण हुशारीनें लावलें होतें. कुठल्याहि माराचा धाक मुलांना मुळींच घातला जात नव्हता. एक पुरोगामी शाळा म्हणून लोकांत ही

शाळा ओळखली जात होती. इमर्सन परिवारांत हेनरी दाखल होऊन चुकला होता. आणि नवनव्या शैक्षणिक कल्पना प्रत्यक्षांत उतरवणाऱ्या मंडळींशीं त्याचा विचारविनिमय होत होता.

इमर्सनच्या घरींच, हेनरीला हीं नवीं आणि भव्य शैक्षणिक तत्त्वें अधिकारवाणीनें आणि हिरीरीनें त्याच्या त्या परिवारांतील जाणकार मंडळींनीं मांडलेलीं ऐकायला मिळत. पण हेनरी त्यांच्या त्या भव्य कल्पनांबरोबर वाहवत जात नसे. त्याचें स्वतःचें व्यक्तिमत्त्व आणि जीवनतत्त्वज्ञान यापूर्वींच तयार झालेलें होतें. त्यांत परिपक्वता आलेली नसली तरी त्यांत मूलभूत फरक होण्याला फारसा अवकाश नव्हता. थोरोच्या कल्पना स्वतंत्र असल्या तरी त्यांत अव्यवहार्य असें कांहीं नसे. आणि विशेष म्हणजे आध्यात्मिकतेकडे त्याचा कल असूनहि त्याच्या कल्पना अव्यवहार्य नसत. ग्रामीण कारागिरींत त्याचा हातखंडा असल्यानें ह्या नव्या शैक्षणिक तत्त्वांची कसोटी तो त्यांच्या व्यवहार्यतेच्या निकषावर ठरवी.

हेनरी हा उगवत्या पिढ्यांचा एक चांगला शिक्षक होता. त्याच्या सहाध्यायांपेक्षां त्याला त्याच्या स्वतःच्या वर्तुळांतल्या लोकांचा सहवास विशेष आवडे आणि हें सत्य त्यानें कधीं झाकूनहि ठेवलें नाहीं. परंतु मुलांना ग्रामीण भागांतील झाडाझुडपांतून हिंडायला नेण्याची मात्र त्याला अनिवार हौस होती. हिंडतांना त्यांना तो ग्रामीण कारागिरी शिकवी. कधीं निसर्गाबद्दल त्यांच्याशीं बोले तर कधीं इंडियन लोकांच्या गोष्टी सांगे. आपल्या बाळपणाच्या जंगलांतल्या आठवणी त्यानें साक्षेपानें जतन केल्या होत्या. त्यामुळें तो जणुं ते रम्य दिवस त्या मुलांबरोबर पुन्हा जगूं लागे. हेनरीनें मोठ्या कौशल्यानें, शाळेबाहेरच्या जगांतील फेरफटके, निसर्गाची ओळख आणि लाकूड–काम यांच्याद्वारा शैक्षणिक नवकल्पना व्यवहारांत उतरवल्या होत्या आणि हेंच थोरोंच्या या विद्यालयाचें वैशिष्ट्य होतें. ते दोघे भाऊ म्हणजे जिवाभावाचे मित्र होते आणि पुष्कळ वेळां हेनरीला जंगलांत घेऊन जाण्यांत जॉनचा पुढाकार असे. जॉनला पक्षिजीवनाचें सूक्ष्म निरीक्षण करायची आवड होती. तो दैवदयेनें आणखी जगता तर हेनरीपेक्षां तो अधिक पद्धतशीर निसर्गाभ्यासी ठरला असता. त्यांच्या शाळेचें पहिलें वर्ष उत्तम रीतीनें पार पडलें. नंतर ते पडावानें सफरीला निघाले. त्यांच्या

भागांतल्या रम्य नद्यांच्या प्रवाहांतून दिवसा भटकावें आणि रात्रीं नदी-किनाऱ्यावर तळ ठोकून निद्रादेवीची आराधना करावी, असा त्यांचा क्रम होता. जॉन पक्ष्यांचें निरीक्षण करण्यांत गुंग असे. हेनरी मागल्या बाजूला बसून नदीच्या पात्रांतील कमळांची शोभा, संथपणें मासे धरणारे किनाऱ्यावरचे कोळी आणि नदीच्या पाण्यावरचे ते चमचमणारे तरंग पाहण्यांत आणि आपल्या डायरींत ह्या सगळ्यांची नीट टिपणें करण्यांत दंग असे.

जॉन चोवीस वर्षांचा होता आणि हेनरी बावीस वर्षांचा. जीवन मोठें रम्य होतें. परंतु भावनांचे गोंवें त्यांनाहि चुकलेलें नव्हतें. त्यांचें वय प्रेमसंबंधांत पडण्याजोगें झालें होतें. आणि एलन सीवॉल नांवाच्या सतरा वर्षांच्या देखण्या पोरीच्या प्रेमांत दोघेहि पडले ! ही मुलगी त्यांच्या शाळेंतल्या एका मुलाची बहीण आणि त्यांच्या घरी ये–जा असलेली ओळखीची होती. कॉन्कॉर्ड आणि मेरिमॅकच्या शेकोटीच्या कार्यक्रमाच्या वेळीं त्या दोघांतली ती एक सावली होती. अर्थात् हें बहुधा फक्त हेनरीलाच जाणवलें असावें. कारण तिच्याशीं लग्न करण्याचा आपला मनोदय जॉननें जाहिरपणें बोलून दाखवला. हेनरी मात्र चकार शब्द बोलला नाहीं. त्याचें प्रेम हें सरस्वतीसारखें गुप्त होतें आणि तें सदासर्वदा तसेंच राहील असें दिसत होतें.

एक वर्ष गेलें. नंतरच्या वसंत ऋतूंत जॉननें एलनला आपल्याशीं लग्न करण्याची सूचना केली. तिनें पुष्कळ आढेवेढे घेऊन शेवटीं जॉनला नकार दिला. पण त्याचा परिणाम असा झाला कीं हेनरीच्या मनांत अनपेक्षित अशा आशा अंकुरित झाल्या. त्या दोघांत यानंतर पत्रव्यवहार झाला. कांहीं महिन्यांनीं स्किटयूट येथें तिच्या घरच्या पत्यावर पत्र लिहून त्यानें आपली तिच्याशीं जडलेली प्रीति व्यक्त केली. आणि आतां आपल्या मनोरथांचे किल्ले जमीनदोस्त झालेले पाहण्याची पाळी त्याच्यावर होती ! तीं थोरो भावंडें तिला खूप आवडत होतीं, पण एकावरहि तिचें प्रेम मात्र नव्हतें. आतां त्यांच्यांतले संबंध पुन्हा पूर्वीसारखे मोकळे राहणार नाहींत याची तिला वेदना होती. यासंबंधींचें तिचें एक पत्र जपून ठेवलेलें आहे. त्यांत ती लिहिते : " त्या संध्याकाळीं मीं हे. थो. ला लिहिलें. पत्र पाठवतांना अशी कालवाकालव माझ्या उभ्या आयुष्यांत कधीं झाली नाहीं. ज्या दोघा

मित्रांचा सहवास मला एवढा मोलाचा वाटे कीं त्यांच्याशीं आतां यापुढें पूर्वीप्रमाणें धड मनमोकळेपणानें आपल्याला बोलतांहि येणार नाहीं, ही गोष्ट माझ्या मनाला फार लागून राहिली. माझें तें पत्र त्रोटकच होतें. पण त्याशिवाय गत्यंतरच मला नव्हतें, असें मला वाटतें ''. हेनरीनें त्यानंतर कुठल्याहि मुलीकडे ढुंकूनहि पाहिलें नसावेंसे वाटतें. एलनचें जें आदर्श चित्र त्याच्या कल्पनेनें रंगवलें होतें त्याच्यापुढें इतर मुली त्याला फिक्या वाटल्या असाव्या व त्यामुळें त्यांची मोहिनी त्याला कधींच पडली नसवी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: ............
क्रमांक ................ नों दि: ............

# ३

*“ नदींतलें जसें पाणी तसेंच आपलें जीवन ! एखाद्या वर्षी त्याला असा प्रचंड पूर येतो कीं माणसाला तसा पूर्वी आल्याचें माहीतहि नसतें. आणि मग नदीकिनाऱ्याची माजून निघालेली ती जमीन तृप्त होते.”*

**—थोरो –‘ वाल्डेन ’**

“ माझा प्रिय मित्र हेनरी थोरो आला होता. आपल्या स्वच्छ विचारांनीं आणि साधेपणानें ती एकाकी दुपार त्यानें उजळून टाकली ! ” असें १७ फेब्रुवारी १८३८ रोजीं इमर्सननें आपल्या दैनंदिनींत लिहिलें. इमर्सनच्या बगीचांत दोघे संबंध दुपारभर एकत्र होते. इमर्सन मागें रेलून बसला होता आणि ऐकत होता. उत्साही श्रोता लाभला कीं किती बोलू किती नको, असें हेनरीला होऊन जाई. इमर्सनलाहि चार गोष्टी सांगता येतील असे कांहीं विषय होतेच. रेड इंडियन लोक आणि कॉंकॉर्डच्या परिसरांतील अवशेष हा असा एक विषय होता. दुसरा विषय कॅनडांतील लोकरीचे व्यापारी. ( एक प्रसिद्ध भटक्या आणि निसर्गविज्ञानाचा अभ्यासक अलेक्झांडर हेनरी. त्यानें कॅनडांतील प्रवासाचीं व साहसाचीं वर्णनें लिहिलीं आहेत. त्याच्या पुस्तकांच्या वाचनामुळेंच कॅनडांतील लोकरीच्या व्यापाराविषयींची माहिती थोरोला झाली होती. ) न्यू इंग्लंडमधील पहिल्या वसाहतवाल्यांचा इतिहास हाहि असा एक विषय होता. सर्वांत जास्त आवडीचा विषय निसर्ग ! पण इमर्सन आणि कार्लाइल यांचा काव्यात्म निसर्ग मात्र तो नव्हता. ह्या निसर्गात दगड-गोटे, माती, हवापाणी, झाडेंझुडपें, प्राणि आणि मनुष्य यांचा समावेश होता.

निसर्ग–इतिहासाच्या त्या गोडीमुळें त्याच्या इतर बुद्धिवादी मित्रांहून तो अगदीं वेगळा पडलेला कालांतरानें दिसून आला. कॉंकॉर्डच्या ग्रामीण परिसरांत त्यानें जे एकाकी प्रवास केले त्यांचीं तपशीलवार टिपणें करण्याची एव्हांना त्याला सवय लागली होती. त्याच्या ह्या सवयीचा इमर्सनलादेखील

हेवा वाटे. इमर्सननें लिहिलें आहे : “ जर मला पुरेसें दीर्घायुष्य लाभलें तर माझ्या हजारों कामांत निसर्गावरचें एक पुस्तकहि मी लिहीन ...... जंगलांत दर महिन्याला माझी छावणी ज्या ठिकाणीं पडेल त्याच्या आसपासच्या सृष्टीचा इतिहास त्यांत निश्चितच असेल. त्यांत खगोल, विज्ञान, जीवशास्त्र, शरीरशास्त्र, धातुविज्ञान, ह्या सर्व गोष्टी रेखीव, काव्यात्म पद्धतीनें गुंफलेल्या असतील. एखादा पक्षी, किडामुंगी, पानफूल यांना एखादा दिवसच काय पण प्रहरदेखील त्यांत विसरलेले नसेल. ” पण इमर्सनच्या मागें कामें फार. त्याचा स्वतःचा असा कांहीं जीवितहेतु होता. आणि लेखना-भाषणांचें लचांडहि त्याच्या मागें होतें. एखाद्या क्षणीं लहर लागली म्हणजे तेवढ्यापुरतेंच निसर्ग-विज्ञानाकडे छंद म्हणून पाहण्याव्यतिरिक्त अधिक लक्ष त्याला देतां आलें नाहीं. हेनरीसारखी निसर्गविज्ञानाची तीव्र ओढहि त्याला नव्हती. आणि इमर्सनला ह्या गोष्टीची जाणीव होती. साहित्य आणि विचार यांत थोरोला मौलिक भर पुढें घालतां आली त्याचाहि अंदाजा इमर्सनला आला होता. थोरोमध्यें त्याला असे कांहीं गुण आढळले कीं त्यामुळें ‘ कॉन्कॉर्डचा माणूस ’ म्हणून तो वेगळा दिसावा ! इमर्सन हा त्याच्यापेक्षां विद्वान होता, त्याच्यापेक्षां जास्त हिंडला-फिरलेला होता. तो एका अर्थानें अधिक ‘ जगाचा माणूस ’ होता. या उलट आपण कॉन्कॉर्डमध्येंच खूप भटकलों, याचा हेनरीला अभिमान होता. एखाद्या छोट्याशाच ठिकाणचा घनिष्ठ परिचय हा पृथ्वीच्या पाठीवर पांच-पन्नास ठिकाणीं नाचतफिरण्यापेक्षां जगाची अधिक चांगली ओळख करून देतो, असा त्याचा दावा होता. झांझिबारमधल्या मांजराची मोजदाद करायला पृथ्वीभोवतीं अर्धी प्रदक्षिणा घालण्यांत त्याला कांहींच स्वारस्य वाटत नव्हतें ! जगांतल्या वेगवेगळ्या देशांतील लोकांच्या जीवनांत एवढें साम्य आहे आणि त्यांचे घरगुती अनुभव इतके एकसारखे आहेत कीं त्यामुळें “ जगाच्या एका अर्ध्या भागाला दुसऱ्या भागांतले लोक कसे राहतात याची कल्पना नाहीं ! ” हें म्हणणें त्याला साफ खोटें वाटायचें.

नागमोडी गल्ल्या ओलांडून, निर्जन रस्त्यानें, ओस पडलेलीं शेतें आणि दुर्लक्षित बागा मागें टाकून कॉन्कॉर्डची पातळ झालेलीं कुरणें उल्लंघून जंगला-तळ्यांचा रस्ता धरणारा हेनरी हा शिकारी होता. संथ प्रवाहाच्या कॉन्कॉर्ड नदीला इंडियन लोकांनीं मुळांत दिलेलें ‘ मुस्केटाक्वीड ’ हें नांव

त्याला आवडे. ओक वृक्ष पसरलेल्या कुरणांत नदी रांगत रांगत शिरते आणि जिथें कॅनबेरींची राई आहे, आणि द्राक्षांच्या वेली विलो, मॅपल व आल्डर्सच्या वृक्षांना जिथें मिठ्या मारतात आणि जिथल्या ताडमाडांशीं सूर्यप्रकाशासाठीं स्पर्धा करतात, थेट त्या प्रदेशापर्यंत नदीच्या काठाकाठानें हेनरी जात असे.

निसर्गांतील बारक्यासारक्या सर्व गोष्टी त्याचें चित्त वेधून घेत. मासे काय, सरपटणारे प्राणी काय, किडामुंगी, पक्षी, फुलें, झाडें या सर्वांकडे एकाग्र चित्तानें तो पाही. आणि जें जें त्यानें सूक्ष्म नजरेनें आणि स्वतंत्र मनानें टिपलें असेल तें तें तो आपल्या वहींत नोंदवून घेत असे. निसर्गाचें तो सौंदर्यदृष्टीनें अवलोकन करी आणि त्या सौंदर्यानें वेडावून जाई. आपल्या गांवाबाहेर जरा दूरवर येतांच त्याच्यामध्यें एकदम जो फरक होई त्याची छाप त्याच्या मित्रांवरहि पडे. जंगलांत तो एकदम अधिक चैतन्यशाली होई आणि निसर्गाचीं रहस्यें जाणून घ्यायला बेचैन झालेला दिसे.

वनस्पतींची पाहणी करण्याची लहर असली आणि जागजागीं विखुरलेल्या झाडाझुडपांचें एकाच वेळीं निरीक्षण करायचें असलें तर दिवसामागून दिवस तो रोज पंचवीस-तीस मैलांची मजल न थकतां मारी. झाडांच्या कळ्यांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठीं तो वाटेल तेवढी पायपिटी रीत असे. पण कांहीं कांहीं वेळा निरीक्षण करतांना कांहींदेखील करावें लागत नसे. नुसते स्तब्ध बसून राहायचें किंवा उभे राहायचें; इतका वेळ कीं जंगली जनावरांना त्यांच्या जंगलीपणाचा विसर पडून अगदीं जवळून त्यांचें दर्शन व्हावें! नदीच्या कांठावर तो तासन् तास बसून माशांकडे पाहत राही. त्याला तळाशीं जाऊन त्यांच्या घरट्यांतून मासळ्या कशा उचलाव्या किंवा गोड्या पाण्यांतल्या माशांना कसें गोंजारावें किंवा गाऱ्या-चिखलांतून चालत जाऊन त्यांत फसलेल्या खंड्याला अलगत पंख धरून वर कसें काढावें ही कला चांगली अवगत झाली होती. तो पळत्या खारी ओळखूं शके. कासवांचीं अंडीं उबवण्याची त्याला माहिती असे. घुबडांचे आवाज त्याला समजत. बेडूक, उंदीर, ससाणे, गाणारे पक्षी, यांची माहिती असे. नेचा, शेवाळ, झाडांवरचीं बांडगुळें ह्या सगळ्यांचें तो वर्णन करूं शके. झऱ्यांची खळखळ त्याला समजे आणि त्या त्या प्रदेशाच्या सुरम्य दर्शनाशीं-त्याचा

परिचय असे. आणि ह्या सगळ्यांत एक गुंफण असल्यामुळें त्यांतला एखादाहि दुवा हातचा निसटला तर होणारें नुकसान जबरदस्त असल्यानें तो बारीक सारीक गोष्टीहि नजरेंतून सुटूं देत नसे.

हिवाळ्यांत तर त्या ग्रामीण परिसराचा तो एकटाच जणुं मालक असे. त्यानें लिहिलें आहे, " काल बर्फावरून मी एका कोल्ह्याचा पाठलाग करीत गेलों. अधूनमधून तो कंबर टेकून बसे आणि एखाद्या तरण्या भालूसारखा माझ्याकडे पाहून तो खेकसे. मी जेव्हां त्याच्या मागावर धावूं लागलों तेव्हां मात्र तो शर्थीनें पळूं लागला. पण मग मी जेव्हां अगदीं निःस्तब्ध उभा राहिलों, तेव्हां त्याच्या मनांतलें भय ओसरलेलें नसूनहि, कुठल्या तरी अटळ अशा निसर्गनियमामुळें तोहि उभा राहिला. आणि मग अंमळशानें तो आपली कंबर टेकून बसलादेखील..." कधीं तो बर्फावरून घसरत निघे आणि मग देखण्या दृश्यांचें बक्षीस त्याच्या पदरांत अचानकच पडे. " बर्फाची जाडी तीन फूट आणि वर दोन फूट हिमाचा थर असेल...आणि काल रात्रीं स्वाभाविकच तपमापक यंत्रांतला पारा शून्याखालीं तीस अंशां-पर्यंत उतरला. सृष्टीच्या सर्व हालचालींवर जणुं मोहोर बसली. मुशाफिर आपल्या मार्गावरच गोठून गेला. पण त्या एकाकी बर्चच्या झाडाखालीं, गुलाबी छातीच्या पण फिक्या लाल रंगाच्या इवल्या पोपटांचा थवा, बर्चच्या खालीं पडलेले दाणे वेचीत असेल. त्यांच्या हालचालींनीं बर्चच्या झाडावरचा कीस खालीं पडेल......केवढा विलक्षण विरोधाभास ! उष्णकटिबंधांतले रंग ! गुलाबी छात्या. शुभ्र बर्फावर त्या उठून दिसत ! त्यांचें तें स्वर्गीय रूप, त्यांच्या आकारांतील लाघव, त्यांच्या रंगांतील ती तेजस्विता त्या गोठलेल्या रित्या दिवसांत तें सगळें किती वेधक वाटत होतें ! "

कित्येक प्रसंगीं थोरोच्या वाटे कार्लाईल प्रतिध्वनित होई आणि त्याच्या तोंडून उद्गार निघत, " सृष्टीचीं हीं दिव्य रहस्यें " किंवा " सौंदर्याहून दिव्य दिव्यतर असें हिचें रुपडें ! " आणि त्यामुळेंच इमर्सनला त्याच्यांत एक उच्च आदर्श भक्त असल्याचें जाणवावें, हें स्वाभाविकच म्हटलें पाहिजे. त्यावेळीं तो थोडा अधिक स्वच्छंदी होता. पण एक दिवस हा रूढ कल्पनांच्या जाळ्यांत न फसलेला, भौतिक आकांक्षांनीं ग्रस्त न झालेला, मुक्त मनुष्य आपल्या कळपांत दाखल होईल, असा इमर्सनला विश्वास वाटे. थोरोनें

संप्रदायाचा त्याग केला होता आणि इमर्सनभोवतीं स्वतंत्र बाण्याचे जे लोक जमले होते आणि नवे विचार, नवा जीवनमार्ग आणि नव्या दिशा यांचा शोध घेत होते त्यांच्या इतकेंच औत्सुक्य त्याच्याहि मनांत होतें. हेनरी-सारख्या तरुणाला प्रोत्साहन देणें आवश्यक होतें आणि लौकरच इमर्सनकडे नेमानें खेपा टाकणाऱ्यांच्या मालिकेंत तो सामीलहि झाला.

इमर्सनच्या घरांत राल्फ वाल्डोला जशी थोरोविषयीं माया, ममता वाटे. तशीच माया त्याची दुसरी बायको लिंडियन हिलाहि त्याच्याविषयीं वाटे. आणि तिच्याशीं त्याची ही सुखद मैत्री पुढें दीर्घकाळ कायम राहिली. लिंडियन ही नाजुक, फिक्कट, सौम्य अशी स्त्री होती. त्याच्या कल्याणाची चिंता वाहणारी, त्याच्या प्रगतीबद्दल आस्था बाळगणारी, त्याच्या वेगवेगळ्या कल्पनांबद्दल सहानुभूति वाटणारी लिंडियन हेनरीला स्त्रीत्वाची आदर्श मूर्ति वाटे! एखाद्या तरुण कवीनें जिला उद्देशून आपलीं भावगीतें किंवा आर्त पत्रें लिहावीं, अशी स्त्रीत्वाची मूर्ति! इमर्सनच्या घरीं आणखी एका वेगळ्याच प्रकारच्या बाईशीं–मार्गारेट फुल्लरशीं त्याची वारंवार गांठ पडे. मार्गारेट ही एक प्रतिभावान लेखिका होती. नवतेची भक्त होती. तिच्या अंगप्रत्यंगांतून जोश नुसता उसळत होता. हेनरी हा एक होतकरू अननुभवी तरुण आहे अशी तिची कल्पना होती. तो तिला आवडतहि होता. पण त्याच्या जागींच त्याला राखलें पाहिजे, असा तिचा कटाक्ष असे.

इमर्सनचें घर म्हणजे त्यांचा नियमानें भेटण्याचा एक अड्डा होता. कॉंकॉर्डमधले बुद्धिवादी आपल्या सर्वोच्च गुरूसमोर नवतेचें जें तत्त्वज्ञान सांगत तें हेनरीनें श्रवण केलें होतें. त्या चेल्यांना चांचपडून त्यांच्या त्या रंगीत झुलींच्या आंत कोणत्या तऱ्हेचीं माणसें आहेत त्याचा त्याला पडताळा पाहतां आला. जेव्हां केव्हां त्याला संशय वाटे तेव्हां तेव्हां त्या पांघरलेल्या झुली ओढून काढायला तो तत्पर असे. त्या बोलघेवड्या उत्साही मंडळींचें सगळें बोलणें हेनरी, भक्ति आणि संशय या उभय दृष्टीनें ऐकून घेई. व्यक्ति म्हणून तीं माणसें त्याला आवडत, परंतु एक गट म्हणून त्यांच्यापासून जरा फटकून रहावेसेंच त्याला वाटे. विशेषतः नव्या वसाहती स्थापण्याचे त्यांचे मनसुबे चालत तेव्हां तर तो हमखास त्यांच्यापासून दूर सरे.

१८४० सालीं अमेरिकन साहित्याच्या दृष्टीनें एक किरकोळ वाटणारा प्रसंग घडला, पण त्यानें हेनरी थोरोच्या जीवनांत मात्र खळबळ उडवून दिली. ' द डायल ' हें एक अल्पायुषी दिखाऊ नियतकालिक सुरू झालें. न्यू इंग्लंडमधील ह्या नव्या ध्येयवादी पंथाचें तें मुखपत्र बनणार होतें आणि इमर्सन त्याचा संस्थापक होता. बोस्टन हें त्या काळीं नव विश्वसंस्कृतीचें एक केंद्र होतें आणि तेथूनच तें प्रकाशित होत असे. ' द डायल ' चा वाचकवर्ग लहानसाच होता. तीनशें ग्राहक जेमतेम असतील नसतील. पण बुद्धिवादी वर्गाचें लक्ष मात्र त्यानें पहिल्या झपाट्यांतच वेधून घेतलें. थोरोसारख्या ज्या होतकरू नव्या लेखकांना इतर नियतकालिकांत स्थान मिळण्याची मारामार पडे. त्यांच्या पहिल्या कलाकृतींची ओळख करून देण्यासाठीं हें नवें मासिक होतें. एलिझाबेथ पीबडी ही कर्तबगार स्त्री ह्या नव्या नियतकालिकाची प्रकाशिका होती. बोस्टनच्या वेस्ट स्ट्रीटवर तिनें नवें प्रकाशनगृह सुरू केलें होतें. ह्या प्रकाशनगृहानें अज्ञेयवादी साहित्याचें प्रकाशन केलें होतें. एलिझाबेथ पीबडीनें आपला मेव्हणा नाथानिएल हॉथ्रोन यांचें प्रारंभाचें साहित्यहि प्रकाशांत आणलें होतें.

प्रथम १८४० ते १८४२ या कालखंडांत मार्गारेट फुल्लर ही त्या नियतकालिकाचें संपादन करीत असे. तरुण शाळामास्तर हेनरी थोरो याचें लिखाण तिला अगदीं हौशी लेखकासारखें वाटून तिनें जवळ जवळ त्याचीं सर्व हस्तलिखितें साभार परत पाठवलीं ! खरें म्हणजे त्याच्या अहंतेला यामुळें धक्का लागायचा, पण त्यामुळेंच त्याच्या शैलींत सुधारणा झाली. याच काळांत इमर्सनसारखा एक थोर प्रोत्साहक दैवयोगानें लाभला आणि त्यानें त्याला आपलें लिखाण निर्धारानें चालू ठेवण्याचा सल्ला दिला. त्याला अशा प्रोत्साहनाची फार गरज होती. कारण आपल्या निर्वाहाचा कांहीं भाग तरी लेखनावर मिळवायची महत्त्वाकांक्षा त्याच्यांत मूळ धरीत होती. एखाद्या निर्जीव उद्योगांत गद्धे-हमाली करण्याची आपल्यावर पाळी येणार कीं काय, अशी त्याला भीति वाटत होती आणि त्यांतून सुटण्याचा लेखन हाच एक पर्याय त्याला दिसत होता. त्यानें आपल्या दैनंदिनींत लिहिलें आहे : " कोणत्याहि व्यवसायांत शिरणारे बरेचसे लोक थकलेभागलेलें

असतात. जगानें आतांच त्यांचें शोकगीत गाइलें तर तें वावगें ठरणार नाहीं. ”

१८४१ च्या आरंभींच एका भावाच्या आजारामुळें शाळा बंद करणें त्यांना भाग पडलें आणि त्यानंतर हेनरीच्या जिवाचा घोर संपून थोडी निश्चितता त्याच्या वाट्याला आली असावी. त्यानें पुन्हां शिकवायचा धंदा म्हणून करावयाचा नाहीं असें ठरवलें. अर्थात् अगदींच नाइलाज झाला तर गोष्ट वेगळी. स्वातंत्र्य आपल्या कवेंत आल्यासारखें त्याला वाटलें. “ मी आतां कुठल्याहि ताऱ्यापेक्षां मुक्त आहे……मी आतां लोकमताची, सरकारची, धर्मांची, शिक्षणाची, समाजाची पत्रास बाळगीत नाहीं. आमचीं मुळें जमिनींत रुजलेलीं नसतात हें केवढें वरदान आहे ! आपला परिसर हेंच कांहीं सगळें जग नव्हे, खरोखर जर शहरी कारकून म्हणून एखाद्याची निवड झाली तर त्याला वसंत ऋतूंत ‘ टीरा डेल फ्युगोला ’ कसें जातां येईल ? ”

तो शरीरानेंच स्वतंत्र झाला होता असें नव्हे, आपल्या चैतन्यावर कांहीं दिवसांनीं जी राख जमा होतें आणि जो एक निर्जीवपणा आपल्याला घेरतो त्याची त्यानें जणूं धास्ती घेतली होती. त्यानें लिहून ठेवलें आहे : “ आपल्या इंद्रियांना खरें म्हणजे पुरेसा अवसर असतो, पण आपल्या आत्म्यावर कोपऱ्यांत वारुळें चढत असतात ! ” आपलें स्वातंत्र्य आणि स्वावलंबन याचें निर्भयपणें रक्षण करण्याचा एकदां निश्चय केल्यानंतर आपल्या शिरावरचें वडीलधाऱ्या मंडळींचें छत्र सोडून स्वतंत्रपणें राहण्यासाठीं तो जागेची शोधाशोध करूं लागला. हस्तीदंती मिनारींत राहून त्याला स्वतःची उपासमार करायची नव्हती, उलट आपल्या गरजा किमान पातळीपर्यंत कमी केल्यानंतर जें कांहीं अल्पस्वल्प उत्पन्न मिळेल, त्यांत भागवतां येईल असें एक घरकुल त्याला हवें होतें. मग त्याला चिंतनाला खूप वेळ मिळाला असता, निसर्गाचें मनसोक्त अध्ययन करतां आलें असतें आणि भरपूर लिखाण करण्याला फुरसत मिळाली असती. आवती-भवतीच्या शेतकऱ्यांच्या शेतांवर मधून अधून श्रम करून त्याला आपलें साधें जीवन चालवणें अवघड झालें नसतें. पण त्याला हवें होतें तें घर मिळूं शकलें नाहीं. मग दुसरें घर शोधावें-कीं आपलें मनपसंत घर बांधून घ्यावें, या संभ्रमांत

तो राहिला. एवढ्यांत त्याला अनपेक्षितपणें इमर्सनकडून नोकरीचें बोलावणें आलें आणि १८४१ च्या एप्रिल महिन्यांत त्यानें ती नोकरी पत्करलीहि.

त्याला मिळालेली जागा ही कांहीं अंशीं त्याच्यासाठीं इमर्सननें निर्माण केली होती. हेनरीला ज्या प्रकारचें जीवन घालवायचें होतें त्याची संधि यामुळें त्याला मिळूं शकेल, अशी कल्पना. त्याच्या गरजा तरी काय होत्या–पुरेसें रिकामपण, डोक्यावर मायेची पाखर, पोटाला पोटभर अन्न म्हणजे जवळपास सगळें आलेंच ! पण इमर्सनला त्याचा फायदा होणार होता. राल्फ वाल्डोला व्याख्यानमाला गुंफण्यासाठीं सफरीवर जायचें होतें आणि त्या निमित्तानें एकेका वेळीं आठाठ दिवस त्याला घरापासून दूर राहण्याची पाळी येणार होती. हेनरी या त्यांच्या कुटुंबांतच ह्यावेळीं राहिला असता आणि घरचें लागलेंभागलें त्यानें इमर्सनच्या गैरहजेरींत पाहिलें असतें. यापेक्षां दुसरी कोणती चांगली व्यवस्था राल्फ वाल्डोला करतां आली असती ? इमर्सनच्या मुलांशीं हेनरीची दोस्ती होती. लिंडियनचीहि त्याच्या येण्याला हरकत असण्याचें कारण नव्हतें. तो एक विश्वासू आणि कार्यक्षम असा खासगी कारभारी होता. बागेकडे त्यानें पाहिलें असतें, फळझाडांची नीट कापाकूप केली असती. कोंबड-घराची| निगा राखली असली आणि संध्याकाळीं एखाद्या वेळीं घरीं येऊन त्यानें लिंडियनला रिझवलें असतें, येणाऱ्याजाणाऱ्यांचें अगत्यानें आतिथ्य केलें असतें. त्याला एक खासगी खोली आणि स्वयंपाकघर मिळणार होतें. इमर्सनचीच सुस्थिति नसल्यानें पगार मात्र कांहींच मिळणार नव्हता ! पण यांत कष्ट वाटण्याजोगें कांहींच नव्हतें. त्यानें आपल्या दैनंदिनींत एक प्रार्थना लिहून ठेवली होती, " सुख-संपत्तीशीं होणाऱ्या संघर्षाशिवाय दुसरा संघर्ष माझ्या वाट्याला न येवो ! " शिवाय त्याच्यावर कामाचा विशेष बोजा पडणार नव्हता. वाटेल तेव्हां त्यानें यावें, वाटेल तेव्हां जावें अशी त्याला मोकळीक होती. आणि अगदीं घरच्यासारखें राहण्याची त्याला मुभा होती. कुठलाहि होतकरू लेखक यापेक्षां मागून मागून जास्त काय मागणार ?

इमर्सनच्या घरींच तो आणि त्याचा मित्र अल्कॉट अशा दोन्ही कुटुंबांनीं एकत्र रहावें असा बूट त्या दोघांनीं काढला होता. परंतु त्यांच्या व्यवहारी बायकांनीं ती कल्पना अव्हेरली होती ! मग अल्कॉटच्या जागीं

हेनरी आला. हा प्रयोग मात्र कल्पनेबाहेर यशस्वी झाला. हेनरी आणि इमर्सन कुटुंब यांच्यांत फार सुखद नातीं निर्माण झालीं. राल्फ वॉल्डोला मुळांत बागकामाची अशी फारशी आवड नव्हती आणि कुवतहि नव्हती. पण घरीं असला कीं हेनरीच्या पाठीमागें तोहि बागेंत लुडबुड करायचा. हेनरी जंगलांत त्याला घेऊन गेला कीं त्याला वेगवेगळीं झाडेंझुडपें आणि पक्षी दाखवायचा. असें कांहीं या जगांत आहे, याचीदेखील इमर्सनला तोंवर खबर नसायची आणि त्यांची ओळख झाल्यामुळें त्याला आगळा आनंद लाभायचा. एका रात्रीं हेनरी त्याला घेऊन कॉंकॉर्ड नदीच्या उगमाच्या दिशेनें नाव वल्हवीत गेला. चंद्रप्रकाशांतील सृष्टिसौंदर्याचें त्यानें मनसोक्त पान करावें हा हेतु. इमर्सन आनंदानें बेहोश झाला आणि त्यानें आपल्या दैनंदिनींत लिहिलें, "एकच शेत तुडवून आम्हीं बोटीशीं पोंचलों. आणि आम्हांला काळाचा विसर पडला! विज्ञान, इतिहास, सगळें आम्हीं मागें टाकलें. निसर्गमातेच्या अंकावर एकाच वल्ह्याच्या फटकाऱ्यांत आम्हीं जाऊन पोंचलों."

कॉंकॉर्डच्या सांस्कृतिक जीवनाच्या प्रत्यक्ष हृदयाशींच हेनरीचा निवास होता. इमर्सनची वाढती कीर्ति आणि 'द डायल' हें नियतकालिक यामुळें नवतेचे उत्साही पुरस्कर्ते वाढत्या संख्येनें एकत्र येऊं लागले होते आणि त्यामुळें वातावरण अधिक चैतन्यदायी झालें होतें. अशा काळांतील आणि अशा ठिकाणचीं एका उत्सुक तरुणाच्या आयुष्यांतलीं तीं दोन तीन वर्षें! अत्यंत कट्टर आणि प्रोत्साहक असा ब्रॉनसन अलकॉट तेथें आला होता. त्याच्या आदर्शवादाची लौकरच कसोटी लागणार होती. अध्यात्मवादी आणि सत्योपासक यांच्या स्वप्नांतली 'फळबाग वसाहत' प्रत्यक्षांत उतरवण्याच्या नादांत त्याचें वाटोळें झालें होतें. दुसरा बंडखोरीचा साक्षात् नमुना म्हणतां येईल असा एलरी चॅनिंग तिकडे आला होता. हॉर्वर्डहून तो इलिनॉइसच्या एका झोपडींत एकांतांत आणि अज्ञातवासांत राहण्यासाठीं पळाला होता. १८४२ सालीं चॅनिंगनें मार्गारेट फुल्लरच्या बहिणीशीं लग्न केलें आणि कॉंकॉर्डमध्यें येऊन तो राहूं लागला. नंतर आला नाथानील हॉथॉर्न. तो कॉंकॉर्डमधील जुन्या धर्मगुरूच्या घरांत येऊन राहिला. त्याची बायको सोफिया, ती एलिझाबेथ पीबडीची बहीण. पीबडी अद्यापहि बोस्टन-

हून आपलें ‘ द डायल ’ हें नियतकालिक प्रसिद्ध करीत होती. हे सगळे हेनरीचे मित्र बनले. सर्वांना साहित्याची गोडी होती. हेनरीनें आणखी कविता आणि निबंध लिहावे म्हणून हे सगळेजण आग्रह करीत. १८४२ च्या वसंत ऋतूंत ‘ द डायल ’ चें संपादकत्व मार्गारेट फुल्लरकडून इमर्सननें आपल्या हातीं घेतलें. त्यामुळें थोरोच्या लिखाणापैकीं बरेचसें या नियत-कालिकांतून प्रकाशित झाल्याचें समाधानहि लाभलें. परंतु दुर्दैव असें कीं दरिद्री ‘ द डायल ’ कडून कपर्दिकहि मिळण्याची आशा नसल्यानें तेथें फारशी स्पर्धा अशी कधीं नव्हतीच. पुढें १८४३ सालीं जेव्हां थोरोकडेच कांहीं काळ त्या नियतकालिकाचें संपादकत्व आलें तेव्हां ही गोष्ट त्याला कळली.

थोरो त्या काळांत नाना तऱ्हेचें लिहीत होता. कांहीं तात्त्विक, कांहीं निसर्गपर, कांहीं सौंदर्यचित्रणाचे असे निबंध त्यानें लिहिले. अभिजात आणि पौरस्त्य साहित्यांतून त्यानें अनुवाद केले. परंतु तरीहि त्याच्या मित्र-मंडळींत तो ‘ उगवता कवि ’ आहे असेंच मानलें जात होतें! इमर्सनच विशेषेंकरून त्याला कविता लिहिण्याला प्रोत्साहन देई आणि थोरोनें आपल्या दैनंदिनींत याची कृतज्ञतापूर्वक नोंद केली आहे. “ इमर्सनला अद्वितीय बुद्धिमत्तेचें लेणें लाभलें होतें. मानवांतील ईश्वरी अंश याहून सरळ, सुलभ आणि व्यवच्छेदक रूपांत आविष्कृत होणें शक्य नाहीं. दुसऱ्या कोणाहि माणसाहून त्याचा तरुण मनांवर अधिक प्रभाव आहे. त्याच्या त्या जगांत प्रत्येक जणच कवि झाल्याशिवाय राहणार नाहीं! ” इमर्सनच्या छायेंत तो एक उगवता कवि म्हणूनच आला होता आणि ‘ द डायल ’च्या मार्फत साहित्याच्या प्रवाहांत त्याला सोडून देण्यांत आलें होतें. परंतु ‘ डायल ’ मध्यें जें त्याचें सर्वोत्कृष्ट लिखाण प्रसिद्ध झालें तें पद्य नव्हतें. १८४२ सा[illegible]च्या एक प्रदीर्घ निबंध प्रसिद्ध झाला. ‘ नॅचरल हिस्ट्री आफ मॅसाच्युसेट्स ’ ह्या निबंधाची त्यानें केलेली तर्कशुद्ध मांडणी आणि त्याच्या वर्णनांत साकारलेलें अप्रतिम सौंदर्य, यामुळें तर ही गोष्ट स्पष्ट दिसून आली कीं हेनरी हा एक भावी उत्कृष्ट गद्यलेखकच होणार आहे. पुढल्या वर्षीं त्याचा ‘ वॉक टु वॉशुसेट् ’ हा निबंध प्रसिद्ध झाला आणि त्यामुळें प्रवासवर्णनपर आणि सृष्टिविषयक लिखाण करणारा एक समर्थ लेखक तो असल्याचा प्रत्यय आला.

शिक्षकाचा पेशा संपल्यानंतरचा काळ आणि आपल्या आयुष्याची पुढील दिशा निश्चित करण्याचा काळ या मधल्या स्थितींत इमर्सनच्या छत्र-छायेंत त्याला माज लुटता आली. भावी दिशा निश्चित करण्याबाबत दोन वर्षें ही जी टाळाटाळ त्यानें केली त्या अवधींत त्याच्या कल्पना अधिक सखोल झाल्या, त्याच्या अनुभवाचें क्षेत्र वाढलें आणि कॉंकॉर्डच्या निसर्ग-विभ्रमांशींहि त्याची ओळख घनिष्ठ झाली. हेनरीचा एकुलता एक भाऊ जॉन आणि इमर्सनचा छोटा बच्चा वाल्डो यांना १८४२ च्या जानेवारींत काळानें ओढून नेलें नसतें तर हीं दोन वर्षें मोठी आनंदाचीं आणि निश्चि-ततेचीं त्याच्या आयुष्यांत ठरलीं असतीं. जॉन हा हेनरीचा एकुलता एक भाऊ. क्षयानें त्याला गांठलें होतें. त्यांची शाळा त्याच्या क्षयरोगापायींच बंद करावी लागली होती. पुढें १८४१ च्या अखेरी अखेरीस तो क्षय रोगाच्या मगरमिठींतून जवळपास सुटला होता. परंतु १८४२च्या आरंभी दाढी करतां करतां पात्यानें कापलें गेलें आणि रक्तदोष होऊन तो थोड्याच दिवसांत वारला.

हेनरीला पूर्वीं कधीं वाटलें नसेल इतकें एकाकी वाटूं लागलें. त्या वर्षी उन्हाळ्याचा मारा चुकवण्यासाठीं जुलै महिन्यांत त्यानें सपाटी सोडली आणि वॉशुसेटच्या शिखरांवरची थंड हवा खाऊन ताजातवाना होण्यासाठीं तो त्या रोखानें निघाला. वॉशुसेटच्या माथ्यावरून मोनॅडनॉकचा एकाकी सुळका उत्तर क्षितिजावर त्यानें पाहिला आणि केव्हांना केव्हां त्याच्यावर चढून जायचेंच असें त्यानें ठरवलें. तो इमर्सनच्या घरच्या आपल्या खोलींत परतला तो तगडा होऊन. आपल्या ह्या प्रवासाचा वृत्तान्त त्यानें ‘ द बोस्टन मिसलिनी ’ साठीं लिहिला.

इमर्सनच्या घरच्या दोन वर्षांच्या निवासामुळें साहित्यक्षेत्रांतील आपल्या यशाबद्दल जरी थोरोला आत्मविश्वास वाटूं लागला होता तरीहि आपल्या निर्वाहायोग्य असें त्यांतून कांहीं मिळण्याची आशा मात्र त्याची मावळली होती. एक मार्ग होता आणि तो म्हणजे इमर्सनप्रमाणें आपल्या कल्पनांवर लोकप्रियतेचा साज चढवून व्याख्यानरूपानें त्या मांडणें आणि पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें. त्यानें व्याख्यानें द्यायला सुरवातहि केली होती. पण कॉंकॉर्डच्या परिसरापलीकडे मात्र तो गेला नाहीं. पुढें कधीं काळीं कीर्तीनें त्याला माळ घातलीहि असती, पण ह्या मधल्या काळांत जगायचें कसें ?

त्याला या काळांत कोणतें आवाहन मिळत होतें? जंगलांत मुक्तपणें वावरण्याची त्याला तीव्र आकांक्षा होती. त्याला वाटे कीं, पोटामागें लागून एखाद्या अप्रिय व्यवसायांत पडावें लागलें तर आपल्या आत्म्याशीं प्रतारणा केल्यासारखें होईल. मग त्याच्या सुप्त व्यक्तित्वाच्या सामर्थ्यांतून फक्त शारीरिक आणि मानसिक स्वातंत्र्याचा तेवढा विकास झाला असता. आपल्या दैनंदिनींत त्यानें लिहून ठेवलें आहे, " भावना दडपून किंवा कठोर संयम आचरून खऱ्या ज्ञानाच्या विश्वांत आपला प्रवेश होत नाहीं. उलट अपरिग्रह आणि बालकसदृश आनंदी वृत्ति असेल तरच खऱ्या ज्ञानाचा मागोवा घेतां यईल." आधुनिक जगांतील कामाचा हव्यास आणि घाईची ओढ या गोष्टी निसर्गाशीं सर्वस्वीं विरोधी आहेत, असें त्याला वाटे. हेनरी आपल्या लहरीप्रमाणें वाटेल तिकडे लांब लांब पल्ले गाठूं लागला. आणि खडकाशीं प्रेमाचें नातें जोडण्यांत घालवलेले हे बारा तास पैसा मिळवण्यासाठीं घालवलेल्या एका दिवसापेक्षां अधिक किफायतशीर आहेत, ही गोष्ट त्याला जाणवली. जर पाणथळींतील भूमिगत किल्ल्यांतून पक्ष्यांचे आवाज, सूर्यास्ताच्या तोफेप्रमाणें त्याच्या कानीं पडण्याची शक्यता असती तर घरांतल्या सुखसोयींपेक्षां दलदलींतील ओलसर गारवा त्याला अधिक स्वागतार्ह वाटत होता.

त्याला माणसें अतिरिक्त कठोर, नीतिच्या फुका वल्गना करणारीं, उगाच दिवसभर काबाडकष्ट करणारीं, अगदीं सामान्य, वृथा चर्चा चालवणारीं आणि घरकोंबडी वाटत. जंगलांत भेटणाऱ्या हरणांच्या जातीसारखी माणूसजात असायला हवी होती, असें त्याला वाटे. हळूंहळूं तो वेगळ्या–त्यानें म्हटल्याप्रमाणें 'आशियायी पद्धती'च्या–'शांत-संथ' जीवनाकडे वळूं लागला. त्याला अगदीं तीव्रतेनें ज्या जीवनपद्धतीची आढ होती तें समाज त्याला द्यायला तयार नव्हता. त्यालाहि समाजाची अमूक एक भरीव सेवा बजावता येत होती असेंहि नव्हे. समाजाच्या चाकोरीपासून त्याचा मार्ग दुरावत जाणारा होता. १८४० मध्यें आपली आवडती शिकारीची जागा पाहून आल्यावर त्यानें लिहिलें आहे, " वाल्डेन जलाशयाच्या काठीं मी ऊन खात बसलों तेव्हां ग्रीष्माच्या तापामुळें आणि झडणाऱ्या पानांच्या टपटप आवाजामुळें मी जणूं भूतकाळापासून सर्वस्वीं मुक्त होतों! " समाज जगरहाटीप्रमाणें

चालेल. पण मानवमात्रासाठीं कांहीं शहाणपणाचा ठेवा निसर्गानें ठेवला असेल तर तो हुडकायची त्याला इच्छा होती. हा जो शोध तो घेत होता तें निश्चित काय आहे, हें त्यालाहि धडपणें उमगलेलें नव्हतें. १८४२ च्या मार्च महिन्यांत तो एवढेंच म्हणूं शकला, "मी माझ्या आयुष्यांतील सर्वस्व मानवमात्रासाठीं आनंदानें देईन. माझ्याजवळ जें सर्वांत मोलाचें असेल तेंच खरोखर देईन......समाजाच्या कल्याणासाठीं मी सूर्याचे किरणसुद्धां गाळून द्यायला मागें पुढें पाहाणार नाहीं."

इमर्सनशीं असलेला त्याचा संबंध तुटेतोंवर आपल्या आयुष्याच्या भावी कार्याची निश्चित अशी आखणी त्यानें केली नव्हती कीं, पुढील आयुष्याचा पक्का विचारहि धड केला नव्हता.

मग राहतां राहिलें एकच ध्येय. निर्वाहासाठीं लिहिणें आणि व्याख्यानें देणें. त्या दिशेनें मात्र त्यानें झेप टाकली. याहि वेळीं इमर्सन त्याला लगेच मदतीचा हात द्यायला जवळ होता. त्यानें न्यूयॉर्कजवळच्या स्टेटन बेटावर थोरोला पाठवलें. त्याचा वडील भाऊ विल्यम इमर्सन तेथें राही. त्याच्या मुलाला शिकवायचें काम होतें. न्यूयॉर्कच्या साहित्यिक आणि प्रकाशक जगताच्या तो आतां जवळ पोंचणार होता आणि आपलें भलें करून घेण्याची त्याला चांगली संधि चालून येणार होती.

त्यानें मित्रांचा गोतावळा जमा केला. वृत्तपत्रव्यवसाय, प्रकाशन, फोरियरिझम, व्यक्तिवाद यांच्याबाबत तो पुष्कळच शिकला. पण तो अपेशी ठरला. न्यूयॉर्कसारख्या शहरांतदेखील लेखन–व्यवसायावर जगणें दुरापास्त होतें. लोकप्रिय मासिकांना हवें असलेलें चटोर लिखाण लिहिणें त्यासाठीं आवश्यक होतें. त्या काळांतदेखील स्त्रियांचीं नियतकालिकें चांगला मोबदला देत. त्यानें लिहिलें आहे, "लेडीज कम्पॅनियन–स्त्रियांचा सोबती नांवाचें पत्र मोबदला देते म्हणे. परंतु त्या 'सोबत्याला' आवडण्याजोगें कांहींसुद्धा मला लिहिणें जमलें नाहीं!" मग त्याचा न्यूयॉर्कवर रोष झाला आणि कॉंकॉर्डची त्याला ओढ वाटूं लागली. एकाच वेळीं माणसांच्या झुंडी पाहून त्याचा जीव दडपला जाई. गर्दी पाहिली रे पाहिली कीं, त्याचा गळाठा होई. लेखनांतहि तो कांहीं प्रगति करूं शकला नाहीं. विल्यम इमर्सनचा तो सरंजामशाही थाट आणि सहवास त्याला कंटाळवाणा वाटूं लागला. त्यांतच

भरीला त्याला श्वासनलिकादाहाचें दुखणें झालें. त्याला घराची ओढ लागली. जवळ जवळ आठ महिन्यानंतर तो घरीं आला. त्यानें मनाशीं ठरवून टाकलें कीं गमतीनें सहलीला जाण्याचा प्रसंग वगळून कॉंकॉर्ड कधीं म्हणून सोडायचें नाहीं. या निर्वासनाच्या काळाच्या मोजक्याच, पण मोलाच्या आठवणी त्याच्या संग्रहीं होत्या. अटलांटिक महासागराच्या किनाऱ्याचा सुखदस्पर्श त्याला मिळाला. नवीं फुलें, नवे प्राणी आणि नवीं माणसें त्याला पाहतां आलीं. जीवनाचें व सौंदर्याचें एक नवें दर्शन त्याला घडलें. होरेस ग्रीलेसारखा जिवाभावाचा मित्र त्याला न्यूयॉर्कनेंच मिळवून दिला. हा होरेस ग्रीले समाजवादी स्वप्नांत रमणारा होता. पुढें तो ' द न्यूयॉर्क ट्रिब्युन ' चा संपादक म्हणून चांगला ख्याति पावला. येथेंच त्याची एका थोर आणि चतुर आत्म्याशीं मैत्री जमली. हेनरी जेम्स म्हणजे प्रसिद्ध कादंबरीकाराचे वडील. त्यांच्याशीं त्याचें तत्त्वज्ञान विषयावर खूप दीर्घ काळ बोलणें होई. त्या चर्चांनीं त्याला पुन्हा टवटवी येई.

१८४४ च्या सुरवातीला तो कॉंकॉर्डला परतला. त्याचें वय एव्हांना सत्तावीस वर्षांचें झालें होतें. कॉंकॉर्डची रोजच्या रोज पाहणी करणें आणि निसर्गाचें संशोधन करून टिपणें तयार करणें यासाठीं त्याला संपूर्ण मोकळीक हवी होती. त्याच्या दृष्टीनें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट होती. एका बाजूला आवडीच्या कामासाठीं हवें असलेलें स्वातंत्र्य आणि दुसऱ्या बाजूला निर्वाहाची चिंता अशा कात्रींत तो सापडला होता. एखाद्या जुनाट हट्टी रोगाप्रमाणें हा प्रश्न त्याला सतत छळीत होता. निसर्गविज्ञानाचा पाइक होणें हाच एक आपला धंदा आहे याची त्याला जाणीव झाली होती. खरोखर जगण्याला कांहीं अर्थ असला तर त्याला ह्या मार्गानें जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. आणि हें करायचें तर आपला कमींत कमी वेळ आणि शक्ति समाजाच्या अन्य कामांसाठीं वेंचली जावी, याची दक्षता घेणें भाग होतें. सर्वसामान्य लोकांच्या गरजा वयाबरोबर वाढतच जातात, पण आपल्या गरजा कमी कमी करण्याचा डोळ्यांत तेल घालून त्याला प्रयत्न करायला हवा होता. जीवनाच्या प्राथमिक गरजांना लागणारा वेळ सोडून इतर कुठल्या कामांत वेळ जाऊं लागला कीं तो बेचैन होऊं लागला. एखाद्या कामासाठीं किती वेळ खर्चीं पडतो यावर त्यानें त्या वस्तूच्या

किंमतीचा हिशोब बसवला होता. इमर्सनच्याकडे जाण्यापूर्वी एकांतवासाची जी इच्छा त्याच्या मनांत रुजली होती ती आतां दुप्पट वेगानें उफाळून वर आली. 'एकान्तवासाचे अंतःकरणावर होणारे परिणाम' ह्या विषया-संबंधीं जर्मन तत्त्वज्ञ झिमेरमान यानें जें लिहिलें तें त्यानें वाचून काढलें होतें. आणि तो ज्याला क्षणभरहि विसंबायला तयार नव्हता त्या इमर्सननें 'नेचर' ह्या काव्यांत लिहिलें होतें : "वनांत चिरयौवन वास करीत असतें. ... वनांत आपण बुद्धीकडे आणि श्रद्धेकडे वळतो." 'रशस्पॅरो' ही त्याची कविता म्हणजे आपल्यासाठीं निसर्गानें "अनंत निवांतपणा आणि काळ यांचें गाईलेलें गीत आहे" असें थोरोला वाटे.

या मनःस्थितींत असतांनाच एक दिवस आल्कॉटची कुऱ्हाड घेऊन तो आला. आणि वॉल्डेनच्या तलावाच्या काठीं स्वतःसाठीं एक झोपडें बांधण्यासाठीं स्वतःच्या हातानें झाडें तोडूं लागला. आपल्या जवळच्या वस्तूंची नीट मांडामांड करण्यासाठीं अशा प्रकारच्या निवांत स्थळाची त्याला कधींचीच आवश्यकता होती. सर्वांपासून त्याला दूर जाऊन रहायचें होतें ! त्यांना विसरण्यासाठीं नव्हे तर त्यांचें योग्य तें दर्शन व्हावें म्हणून. त्याची आई, दोघी बहिणी व आत्या आल्या-गेल्या,उठल्या-बसल्या सामाजिक सुधार-णांचा काथ्याकूट करीत बसत आणि हेनरीनेंहि ह्यांत सामील व्हावें, अशीहि त्यांची अपेक्षा असे. ह्या बडबडीनें त्याचे कान किटून जात. इमर्सनच्या किंवा दुसऱ्याहि कोणाच्या घरीं जेव्हा तो जाई तेव्हां तो अज्ञेयवादी आदर्शा-बद्दलचें बोलणें ऐके. प्रारंभीं त्याची मोहिनी थोरोला वाटे, पण पुढें सारखें वापरून वापरून तें नाणें झिजून गेलें होतें. त्याला बडबड आणि तत्त्वचिकित्सा यांचा वीट आला होता. दुसरें कांहीं तरी त्याला हवें असे. त्याला एकाकी-पणानेंच विचार आणि काम करायचें होतें. अशा रीतीनें तरी एक दिवस हें जीवन एका कोपऱ्यांत वळवून सर्वांत खालच्यांतला खालचा जो दुवा त्याची जागा घेण्याची स्वतःची तयारी व्हावी, अशी त्याची इच्छा होती. अशा पद्धतीनेंच जीवनाचा अंतिम आशय हातीं लागतो. "माला स्पार्टनच्या नाग-रिकांप्रमाणें चांगले धट्टेकट्टे म्हणून जगायचें होते. आणि जें जें म्हणून निर्जीव त्याचा त्याच निर्भयपणें मला निकाल लावायचा होता.... "

# ४

*"पैशाअडक्याची धनदौलत माझ्यजवळ नसली तरी सूर्याच्या उन्हानें उजळून निघालेल्या प्रहरांची आणि वसंतांतल्या दिवसांची धनदौलत मला भरपूर लाभली होती."* **—थोरो : वाल्डेन**

पुन्हां एकदां इमर्सनचा ऋणाईत तो झाला. वाल्डेनला निसर्गाच्या सान्निध्यांत जाऊन राहण्याची कल्पना त्याच्या डोक्यांत कधींचीच घोळत होती. तलावाच्या वायव्येला त्यानें जंगल जमिनीचा एक तुकडा कधींचाच घेऊन ठेवला होता. हा तुकडा पट्टा न घेतां त्यानें थोरोला दिला. जर ही जागा त्याला न मिळती तर वाल्डेनला झोपडी बांधून राहण्याचा योग त्याला आला नसता. वर्षापूर्वी एकदा तो आणि त्याचा मित्र सहलीला गेले होते. तेथील शेकोटीची त्यांनीं नीट काळजी न घेतल्यानें वणवा लागून नदी काठची शंभर एकर जंगल जमीन जळून खाक झाली होती ! थोरोचा तो मित्र कॉंकॉर्डमधील प्रतिष्ठित घराण्यांतला, होअर ह्या न्यायाधीशाचा मुलगा होता. तो जर बरोबर नसता तर थोरोची कंबख्तीच होती. त्याच्या सारख्या व्रात्य माणसाला त्या जंगलाच्या परिसरांत कित्येक मैलपर्यंत इतर मालकांनीं पाऊल ठेवूं दिलें नसतें. १८४५ च्या मार्च महिन्याच्या अखेरी अखेरीला, सृष्टींत सर्वत्र नवजीवनाचा हंगाम असतो त्या वेळीं, थोरोनें आपलें झोपडें बांधायला काढलें. शिशिर ऋतूंतलें असमाधान संपून तृप्तीचा काळ सुरू झाला होता.

एप्रिलची पहिली तारीख धुक्यानें भरलेली होती. तलावांतलें बर्फ वितळूं लागलें होतें. पंधरवडाभर तो रोज वाल्डेनला चालत जात होता. सवडी-सवडीनें झोपडीचें काम करत होता. पाइनच्या वासानें दरवळणाऱ्या हवेंत तो बरोबर आणलेली भाकरी खात होता. जाणाऱ्या-येणाऱ्यांशीं गप्पा छाटीत होता. त्याच्या कुऱ्हाडीच्या घावानें लोकांचें लक्ष त्याच्याकडे वेधलें

जात होतें. तलावाच्या वरच्या बाजूच्या टेकडीवर जीं जाड बुंध्यांचीं मिश्र झाडें होतीं त्यांतली सरळ सोट, जोमदार, पांढरी पाइनचीं झाडें, आपल्या झोपडीचा सांगाडा उभारण्याला पुरेशी इतकीं, स्वतःच त्यानें तोडलीं. त्याच्याजवळ स्वतःची कुऱ्हाडदेखील नव्हती. तीहि त्याला उसनी मागून आणावी लागली होती. फार मोठा स्वतंत्र असा कांहीं हा आरंभ नव्हता. पण त्याच्याजवळ औषधालाहि पैसा नव्हता, तेव्हां करणार काय ? एवढेंच त्यानें केलें कीं कुऱ्हाड परत करतांना ती त्यानें चांगली शेवटून लावून दिली. त्याला ती कुऱ्हाड लहानखुरी वाटली, पण खरें म्हणजे इंग्लिश पद्धतीची लांब पात्याची ती कुऱ्हाड होती. त्या कुऱ्हाडीनेंच त्यानें कापकूप करून झोपडीचे चार चौकोनी खांब तयार केले. मग इतर हत्यारें आणून त्यानें लाकडें कापलीं आणि खोबणी करून ती जोडून झोपडीचा सांगाडा उभारला. भिंतीला आणि छपरासाठीं लागणाऱ्या फळ्या त्यानें जवळच्या एका झोपडीच्या उपसून आणल्या. त्या तळ्याच्या जवळून जो नवा रेल्वे रस्ता जात होता त्याच्या बांधकामावर काम करणाऱ्या एका आयरिश माणसानें निवाऱ्यासाठीं ती झोपडी उभारलेली होती. त्याची ती झोपडी अगदीं दळभद्री दिसत होती. झोपडी म्हणण्यापेक्षां त्याला मिश्र खताचा ढिगारा म्हणणेंच शोभलें असतें ! झोपडी उबदार आणि ताठ उभी राहावी म्हणून तिच्या भोवतीं चारी बाजूंना पांच फूट माती आणून थोरोनें ओतली होती. त्या झोपडीसाठीं थोरोला चार डॉलर्स आणि पंचवीस सेंट्स खर्च आला ! एप्रिलच्या मध्यावर एका दिवशीं सकाळीं एका छोट्या गाडींत आपलें सामान भरून ह्या नव्या निवासस्थानाकडे त्यानें खेपा केल्या. बव्यांचा प्रतिनिधि असलेल्या एका बेकार आयरिश माणसानें त्याच्या दोन खेपांतला वेळ साधून त्याच्या सामानांतले चांगले चांगले खिळे चोरून घेतले ! झोपडीचें काम पूर्ण करण्याअगोदर झोपडीमागच्या उतारावर त्याला तळघर खणावें लागलें. हिवाळ्यांतल्या धुक्यापासून भाजीपाल्याचा बचाव करण्याला तें चांगलें उपयोगी ठरलें. झाडाच्या मुळ्या खापलण्याची त्याला मजा वाटली आणि खालीं सात फुटावर त्याला उत्कृष्ट रेतीचा थर आढळला ! एखादा आदिवासी ज्याप्रमाणें सर्वांआधीं सहजच आपल्या साठ्याची काळजी वाहतो तसेंच हें होतें. बोस्टनमधल्या घरांतहि कंदमुळें सुरक्षित ठेवण्यासाठीं

अशीं तळघरें असत. अशीं तळघरें असलेलीं घरें कितीहि भव्य असलीं तरी तीं एखाद्या बिळावरच्या वारुळासारखींच होत, असें थोरोचें म्हणणें ! तळघरें हा घरांचा सर्वांत टिकाऊ भाग असल्यानें त्यांच्याबद्दल त्याला आकर्षण वाटे. घरांची वाताहत झाल्यानंतर जमिनीच्या पोटांत गडप होऊनाहि हीं भुयारें पुष्कळ काळ टिकून राहतात. कॉंकॉर्डच्या परिसरांतील पुराण अवशेषांबद्दल त्याला मोठी जिज्ञासा होती. आणि त्याला जर हें कळतें कीं शंभर वर्षांनंतर जमिनींत गडप झालेले त्याच्या घराचे अवशेष शोधायला वाल्डेनला लोक आले होते, तर त्याला खात्रीनें खूप खुशी झाली असती.

दरेक घमेल्यांतली माती आणि लाकडाचा एकेक ठोकळा त्याला उल्हसित करीत होता आणि त्यांच्याकडे पाहतांना त्याच्या डोक्यांत नाना विचार उसळत होते. या सर्वांतून मिळणारा आनंद खूप वेळ मिळत राहावा म्हणून झोपडी बांधायचें त्याचें काम अगदीं संथपणें चालू होतें. आपल्या कामांत कोणाच्या मदतीवांचून अडत होते म्हणून नव्हे तर शेजाऱ्यापाजाऱ्यांचा स्नेह लाभावा या हेतूनें त्यानें झोपडीचा सांगाडा उभा करतांना, आपल्या अज्ञेयवादी मित्रांना, मदतीचें निमित्त करून पाचारण केलें होतें. मग धुराड्यासाठीं त्यानें तलावांतून मोठमोठे दगड उचलून आणलें. घरावर छप्पर घालण्यापूर्वी त्यानें धुराड्याचा पाया घालून टाकला.

छपराचा शेवटचा वासा चढल्यावर, पाण्याचा शिरकाव होऊं नये म्हणून करावयाचा बंदोबस्त होण्याची किंवा धुराडें बांधून होण्याची वाट न पाहतां थोरो ४ जुलै १८४५ रोजीं झोपडींत राहायला आला देखील. योगायोगाची गोष्ट अशी कीं अमेरिकन स्वातंत्र्यदिन हाच त्याचाहि मुक्तिदिन ठरला ! ताबडतोब आणखी बांधकाम करायला त्याला फुरसतच नव्हती. झोपडीभोंवतीची थोडी जमीन लागवडीला आणण्याचें त्यानें ठरवलें होतें. अडीच एकरांचा हा रेताड, निकस तुकडा. त्यांत त्यानें घेवडा आणि इतर भाज्या लावल्या होत्या आणि त्याची निंदणी करणें त्याला भाग होतें. उन्हाळ्यांतच त्यानें त्या जमिनीची मशागत सुरू केली होती. कित्येक झाडांचे बुंधे त्याला खणून काढावे लागले होते. नंतर घोडे भाड्यानें आणून त्यानें तिची नागरटहि केली होती. नागरतांना नष्टप्राय झालेल्या एका इंडियन जमातीच्या बाणाचीं पातीं त्याला वर आलेलीं सांपडलीं. पहिल्या

उन्हाळ्यांत त्यानें हारीनें घेवडा लावला. ह्या हारी जर एकापुढें एक मांडल्या असल्या तर त्यांची लांबी सात मैल भरली असती, असा त्याचा अंदाज होता! आधीं पेरलेल्या घेवड्याचें निंदण सुरू करण्याची वेळ येण्याच्या कितीतरी आधीं त्याची पेरणी होऊन जायला पाहिजे होती. त्यामुळें त्याचें उभें पीकच्या पीक रोगाच्या तोंडीं पडतें कीं काय अशी भीति निर्माण झाली. आख्खा उन्हाळा तो निंदण करीत होता. हारींमधून वरखालीं फिरत तो रोगाचा निःपात करण्यासाठीं तासनतास दिवसाकाठीं राबत होता. पण हे कष्ट त्याला कष्ट नव्हते. घेवड्याचें संगोपन करण्यांत त्याला मोठा आनंद वाटे. मन शांत कसें ठेवावें तें तो या वेळीं शिकत होता. त्याच्या शेजार-पाजारच्या इतर शेतकऱ्यांप्रमाणें त्याला जमिनीशीं खिळून बसायची पाळी आली नाहीं, ही गोष्ट त्याला समाधानाची वाटत होती. प्रसंगीं स्वतःला वाटलें म्हणून घेवडा हातचा घालवला तरी कांहीं त्याची स्थिति फार बिघडणार होती असें नाहीं. त्याच्यासारखा आनंदी शेतकरी विरळा! त्याच्या शेताच्या एका बांधाला कॉंकॉर्डला जाणारा रस्ता होता. पुष्कळ वेळां शेतांत तो काम करीत असेल याची कल्पना नसलेले शेतकरी जाता येतां त्याच्या पिकावर शेरेताशेरे झाडीत, ते ऐकून त्याची करमणूक होत असे. अनवाणी पायानें एकाकीपणें घेवड्याच्या शेतांत उत्साहानें राबणाऱ्या ह्या शेतकऱ्याचा खरा उद्देश तत्त्वज्ञानाची शेती उठवण्याचा आहे, याची त्या बिचाऱ्यांना काय कल्पना असणार? गवताऐवजीं घेवडा पेरल्याबद्दल भूमीनें आशीर्वाद द्यावा म्हणून त्याचे हे काबाडकष्ट होते.

शेती करून निर्वाह करण्याच्या कल्पनेनें थोरो भारावला होता. माणसाला देहधारणा आणि आरोग्य व शक्ति यासाठीं खरोखर जेवढें धान्य लागतें तेवढें तो आपल्या एकट्याच्या बळावर निर्माण करूं शकेल, अशी स्थिति उत्तरेला थेट मॅसाच्युसेट्सपर्यंत होती, असें त्याला आढळून आलें. गवताचे वेगवेगळे पदार्थ बनवण्यापेक्षां जास्त, इतर प्रयोग अर्थात त्यानें केले नाहींत. गहू, आटा, गूळ आणि आहारासाठीं लागणाऱ्या इतर कांहीं जिनसा विकत घ्यायला त्याची ना नव्हती. सुरवातीला आपला पाव तोच भाजून घेई. त्यांत तो यीस्ट मिसळी, त्यामुळें न आंबवतांहि भागूं शकतें असें आढळल्यावर आतां भट्टीवाल्याच्या तावडींतून आपण सुटलों, याचा त्याला आनंद झाला.

त्याच्या रिवाजाप्रमाणें पाव बनवण्यासंबंधींहि त्यानें अभ्यास केला. आपली स्वतःची पद्धत बसवण्यापूर्वी त्या विषयावरचें सर्व उपलब्ध साहित्य त्यानें वाचून काढलें. आपल्या पद्धतीनें केलेल्या पावांत आवश्यक तीं सर्व अन्नसत्त्वें आहेत, नसली तर फार उत्कृष्ट चव तेवढी नसेल, ही त्यानें खात्री करून घेतली. साधेपणा आणि काटकसर म्हणून त्यानें चहा-कॉफी सोडून दिली. एखाद्या वेळची वाल्डेनच्या माशाची मेजवानी सोडली तर तो आतां पूर्ण शाकाहारी बनला.

त्याचें घर म्हणजे वर पोटमाळा आणि खालीं तळघर असलेली पंधरा-बाराची एक खोली! "एक बिछाना, एक टेबल डेस्क, तीन खुर्च्या, तीन इंच व्यासाची एक पाहण्याची काच, चिमटा, लाकडें ठेवायचा एक ठोकळा, एक किटली, एक पळी, एक कढई, एक उलथणें, सांडपाण्याचें एक तसराळें, दोन चाकू आणि काटे, तीन थाळ्या, एक कप, एक चमचा, एक तेलाची बुधली, गुळाची बरणी आणि जपानी रोंगण लावलेला एक ठोकळा" या सामानानें त्यानें ती आपली खोली सजवली होती. खुर्च्या तीन होत्या, पण त्यासाठींहि सबब त्याच्यापाशीं होती. एक खुर्ची एकांतासाठीं, दोन खुर्च्या स्नेह्यांसाठीं आणि तीन समाजासाठीं, असें त्याचें गणित होतें. त्याच्याजवळ एक थाळी आणि काटा-चमचा अद्याप होता. त्याचा उपयोग एखादाच पाहुणा असे तेव्हां त्याला पंक्तीला बोलावायला होई. एकापेक्षां जास्त पाहुणे आले कीं तो बहुधा त्यांना जेऊं घालीत नसे. त्याचें घरकाम सोपें आणि आनंद वाटण्यासारखें होतें. एखाद्या वेळीं जमीन खराब झाली कीं तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं लौकर उठून सगळें सामान घराबाहेर आणून घासूनपुसून, वाळवण्यासाठीं, सकाळचें ऊन खायला ठेऊन देई. आणि स्वतः घरांत शांतपणें चिंतनांत मग्न होई. "एखाद्या जिप्सीच्या सामानासारखा घराबाहेर गवतावर सामानाचा ढिगारा लागलेला पाहण्यांत आणि आपला ग्रंथसंभार, दौतटाक घेऊन पाइन आणि हिकरींच्या वृक्षराजींत उभें राहिलेलें तीन पायाचें टेबल पाहाण्यांत मौज वाटे. घरकुलांतून बाहेर आल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर विलसतांना दिसे आणि पुन्हां परत यायला त्या नाराज असाव्यात असें मला भासे. त्यांच्यावरच छत घालून आपण त्या घोळक्यांत आपल्या जागीं जाऊन बसावें असा

मोह मला कधीं कधीं होई. त्या सर्वांवर सूर्यकिरणांची माया पसरलेली पाहण्यांत आणि वाऱ्याशीं चाललेल्या त्यांच्या गुजगोष्टी ऐकण्यांत गेलेला वेळ कारणीं लागल्यासारखा वाटे.”

वाल्डेनमधला उन्हाळ्यांतला चांगला दिवस कांहींसा असा व्यतीत होई : सकाळीं साडेपांचला उठून प्रातर्विधि उरकून तळ्याच्या उबदार पाण्यांत पोहणें. त्यानंतर बहुधा निंदण. नंतर थोडी न्याहारी आणि विहिरीच्या थंड पाण्याचा एखादा घोट घेण्यापुरती जराशी मधली सुट्टी. नंतर दुपारच्या जेवणाआधीं अंगावरची धूळ घालवण्यासाठीं तळ्यांत एखादी बुचकळी. एखाद्या वेळीं निंदण करण्याच्या वेळीं तो वाचा–लिहायचें काम करी. अशा वेळीं ह्या दुसऱ्या बुचकळीचा उद्देश ‘अभ्यासानें पडलेली शेवटची सुरकुती साफ करणें’ हा असे. जेवणानंतर तो बहुधा कॉन्कॉर्ड गांवांत हिंडायला जाई. जल–चिचुंद्रीहून माणसें किती वेगळीं आहेत, याचा अभ्यास करणें हा या हिंडण्यामागील हेतु असे. खेडेगांवांतील गप्पाटप्पा ह्या ‘होमियोपाथीच्या पद्धतीनें सेवन केल्या तर, पानांच्या सळसळी प्रमाणें किंवा बेडकांच्या डोकावण्याप्रमाणें खरोखरच ताजेतवाने करणाऱ्या असतात’ असा त्याला अनुभव होता. पण बहुधा दुपारीं तो फिरत फिरत गांवाच्या विरुद्ध दिशेनेंच जाई. घनदाट जंगलांत किंवा पाणथळींत त्याला वनस्पती आणि पक्षी भेटत किंवा वाचा–लिहायला, चिंतन करायला एखादी शीतळ एकांत जागा गवसे. “एखाद्या जाड्या विद्वानाच्या घरीं जाण्याऐवजीं मी ठराविक झाडांच्या भेटीला वरचेवर जाई. हीं झाडें आसपासच्या भागांत दुर्मिळ असणारीं आणि एखाद्या कुरणाच्या आंत लांबवर उगवलेलीं असत. कधीं घनदाट जंगलाच्या अंतर्भागांत असत. तर कधीं डोंगरमाथ्यावर असत. ब्लॅक बर्चच घ्या. दोन फूट व्यासाचा त्याचा एक देखणा तुकडा नमुना म्हणून माझ्याकडे आहे. त्याचा चुलत भाऊ यलो बर्च ! त्यानें घातलेला तो सोनेरी झगा, त्याचा दरवळणारा तो उंची वास. आणि तो बीच ! त्याचा बुंधा कसा नेटका, सुंदर शेवाळी रंगानें रंगलेला. सगळे बारीक–सारीक अवयव रेखीव असलेला. ही जात क्वचित्‌च आढळणारी आहे. माझ्या माहितींत त्यांची एकच बऱ्यापैकीं राई शहरभागांत उरली आहे. जवळच्या बीचच्या बियांनीं पैज लावल्यामुळें कबुतरांनीं ती राई उठवली, अशी आख्यायिका आहे. हें

लाकूड चिरलें कीं आंतर भागावर दिसणारें दाणेदार रुपेरी नक्षीकाम पाहण्यासारखें असतें. आणि तो बास, तें हॉर्नबीम, तें सेलटीस, ऑक्सिडेंटलिस, तो फसवा एल्म, त्याचें एकच भरदार झाड आपल्याकडे आहे. कांहीं पाइन झाडांचे उंचच उंच शेंडे, शिंगलचे झाड, किंवा तो सहसा न आढळ्यांतला नीटस हेमलॉक. ह्या जंगलांत एखाद्या पॅगोडासारखा तो विराजमान दिसतो."

जंगलांत एक घंटाभरच आपल्या एकाकीपणाचा त्याला एकदां अनुभव आला. पण हा 'थोडासा वेडेपणा' लौकरच गेला आणि पुन्हा कधीं फिरकला नाहीं. तो जणु आपल्या सर्व इंद्रियांनीं निसर्गाचें निरीक्षण करीत असे आणि निसर्गाची त्याला पुढें भरपूर सोबत होत असे. त्याला एकटे रहायला आवडे आणि त्याला एकांतासारखा दुसरा चांगला सोबत करणारा सखा आढळला नाहीं! वाल्डेनच्या ह्या जीवनाची आणखी सर्वांत महत्त्वाची गंमत म्हणजे त्याच्या झोपडीनें कितीतरी मंडळींना मोहिनी घातली होती. एकदोनदां तर त्याच्या छपराखालीं पंचवीसावर मंडळी फारशी गर्दी न होतां जमली होती. त्याचे अज्ञेयवादी मित्र एकदां सहलीला त्याच्याकडे आले होते. त्यांचा सहवास त्याला मोठा आनंददायी वाटला. त्याच्या झोपडींत राहाण्याचा एक फायदा असा कीं त्याला कोणालाच मुक्काम ठेवून घ्यायला जमत नसे. ते आले तरी थोड्याच वेळांत त्यांना परतावें लागे. लोकांच्या झुंडी थोडा वेळ नजरेस पडल्या म्हणजे त्याला उत्कट आनंद होई, आणि त्यांच्या जाण्यानें त्याच्या एकांतसेवनाच्या आनंदांत आणखीच भर पडे. त्याला जेव्हां माणसाच्या सहवासाची ओढ वाटे तेव्हां अर्ध्या तासांत तो कॉंकॉर्डमध्यें जाऊन दाखल होऊं शके. त्याच्या घरीं जसे मित्र येत आणि अपरिचितांशीं अवचित त्याची गांठभेट होई, त्याप्रमाणें त्याच्या घरांतली कोणी ना काणा मंडळी शनिवारीं येत. तत्त्वज्ञानी शेतकरी होसयर, तो रविवारीं वाल्डेनची वारी करी. हिंवाळ्यांत संध्याकाळीं त्याला शेकोटीशिवाय कोणाची सोबत नसे, तेव्हां तो आपले अलगूज काढून वाजवी किंवा एकेकाळीं जी मंडळी त्या जंगलांत वास्तव्य करून होती त्यांना त्यांच्या त्यांच्या ठिकाणीं आणण्याचा मनानें खेळ करी.

थोरोच्या समकालिनांच्या आठवणींतलें वाल्डेन म्हणजे बेजमीन गरीब कुटुंबांचें मायपोट. त्या काळांत घेवड्याच्या शेंगांच्या पलीकडला रस्ता चांगलाच गजबजलेला असे. गांवांतल्या वाळींत पडलेल्या ह्या सदा दीन-दरिद्री मंडळींची सेवा तो नेकीनें बजावीत असे. त्या स्थायिक झालेल्या वसाहतीच्या कडेकडेनें राहणाऱ्या मंडळींविषयीं त्याला विशेष आपुलकी वाटे. त्यांतून आपला स्वतंत्र बाणा कायम ठेवणारे ते असतील किंवा अनोळखी असतील तर त्यांच्याकडे त्याच्या सहानुभूतीचा प्रवाह वेगानें धावून जाई. गरीब निग्रो, आयरिश यांची जी पिढी तेथून निर्वासित झाली त्यांचें निरंतर स्मरण ठेवण्यानें त्याला बेर वाटे. मेलेले बँकर्स, जहाजांचे मालक, प्राध्यापक, धर्मगुरु इत्यादि आदराच्या आधारस्तंभांबद्दल बोस्टनचे लोक जसा आदर दाखवीत तसा त्याला त्या आदिवासींबद्दल वाटे! कॅटो इन्ग्रॅहम हा एक तिथला निग्रो. कॉन्कॉर्डमधल्या त्याच्या लब्धप्रतिष्ठित जर्मन मालकानें त्याला वाल्डेनच्या जंगलांत एक घर बांधून दिलें होतें. थोरोनें कॅटोचा 'अक्रोडाच्या जंगलांतला शेतीचा तुकडा' शोधून काढला. अर्धवट बुजलेलें त्याच्या तळघराचें तोंड अद्याप तसेंच शाबूत असल्याचें त्यानें दाखवून दिलें. त्याचा ठावठिकाणा फारच थोड्यांना माहीत होता. कारण पाइनच्या कुंपणामुळें मुशाफीरांच्या नजरेपासून तें झाकलेलेंच राही. मुलायम सुमचनें (ऱ्हुस ग्लॅब्रा) तें आतां भरलेलें आहे. आणि अगदीं प्राचीन प्रकारच्या गोल्डन रॉडची (सॉलिडगो स्ट्रिक्टा) वाढ तेथें भरपूर प्रमाणांत होते. "त्याच्या शेताच्या एका कोपऱ्याला झिल्पा नांवाच्या कृष्णवर्णीय स्त्रीच्या दरिद्री निवासाच्या पुसट खुणा होत्या. ही स्त्री लोकर विणणारी होती. रानटी आणि भित्रें असें सावज! "वाल्डेनचें जंगल तिच्या कर्कश गाण्यानें निनादत असे. तिचा आवाज दणदणीत आणि उमटून पडणारा होता." तिथून थोड्या दूरवर मुक्त गुलाम ब्रिस्टर फ्रीमन राहत असे. त्याच्या त्या जुन्या झाडांवर अद्यापहि 'रानटी आणि मादक' फळें लहडत होतीं. त्या झाडांची लागवड करणाऱ्यांच्या आठवणींशीं निगडित असल्यानें थोरोला हीं फळें भारी आवडत. थोरो फ्रीमनच्या समाधीकडे जात असे. "लिंकोलनच्या जुन्या दफनभूमींत थोड्या एका बाजूला, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या पहिल्या चकमकींत, कॉन्कॉर्डहून माघार घेतांना जे ब्रिटिश दारूगोळाबाज

कामीं आले त्यांच्या निनांवी थडग्यांच्या घोळक्यांत त्याची समाधी आहे." वाल्डेनच्या जंगलाच्या अगदीं अंतर्भागांत वेमन हा कुंभार राहत असे. आणि... "ह्यू कॉइल हा आयरिश गृहस्थ–तो त्या जंगलांतला मी येण्या-आधींचा बहुधा अखेरचा रहिवासी. (त्याच्या नांवाचें लेखन मी पुरेसा जोर देऊन केलें आहे असें मला वाटतें.) तो वेमनच्या झोपडींत राहत असे. त्याला कर्नल कॉइल म्हणत. अफवा अशा होत्या कीं वॉटर्लूच्या लढाईत तो सैनिक होता. तो जर हयात असता तर त्याला त्या लढाया पुन्हां खेळायला लावल्या असत्या. इथें तो खोदकामाचा धंदा करी. नेपोलियन सेंट हेलेनांत गेला, कॉइलच्या नशिबीं वाल्डेनचें जंगल होतें. त्याचें जें कांहीं माहीत आहे तें शोकात्म आहे." एकदां नदीच्या परिसरांतच त्याला पावसानें गांठलें. थोरो निवाऱ्यासाठीं जवळच्या एका ऐसपैस रिकाम्या झोपडींत शिरला. त्या झोपडींत "जॉन फिल्ड हा एक आयरिश गृहस्थ आपली बायको आणि पुष्कळशीं मुलें घेऊन राहत होता" असें त्याला आढळून आलें. "ज्या छपराच्या भागांतून सर्वांत कमी गळत होतें" तेथें ते एकत्र बसले. जॉन फिल्डनें आपल्या कठोर नशिबाची कहाणी त्याला ऐकवली. त्यावर मोजक्या शब्दांत थोरोनें काटकसर आणि साधी राहणी या कलांचा महति सांगितली. फिल्डच्या बायकोचा त्याच्यावर प्रभाव पडला. "एका मोठ्या चुलाण्याच्या खोलींत, एका मागोमाग एक पदार्थ ती निर्भयपणें करीत होती. वाटोळा चेहरा, उघडी छाती, अद्यापहि आपली स्थिति सुधारेल, अशा आशेनें चमकणारा चेहरा असलेली ती स्त्री..."

वाल्डेनला थोरोजवळ बंदूक नव्हती. बंदुकीचा शौक करण्याचें त्याचें कुमारवय केव्हांच उलटून गेलें होतें. माणसें आणि पशुजगतांत जो फरक लोकमानसांत घट्ट रुजला आहे तो किती बनावट आहे तें त्याला प्रौढपणीं चांगलें जाणवलें. वाल्डेनला जंगली जनावरांच्या निकट सहवासांत त्याला जो अनुभव आला त्यामुळें ह्या जिवंत प्राण्यांवर शिकारी आणि संशोधक यांच्याकडून जे अत्याचार केले जात त्याबद्दल त्याला सखोल अशी सहानुभूति वाटूं लागली. खांद्यावर बंदूक टाकून जेव्हां प्रत्येक निसर्गवेत्ता निघे अशा कालखंडांत त्यानें लिहून ठेवलें, "पारध करायला जातांना गेलीं कांहीं वर्षें मी जी बंदूक नेतो त्याला सबब एवढीच कीं, माझा पक्षिविद्येचा अभ्यास

चालू असल्यानें मी फक्त नवे आणि दुर्मिळ असे पक्षी तेवढेच तिनें टिपीत असतों. पण आतां मी असें कबूल करतों कीं पक्ष्यांच्या जीवनाचा अभ्यास करण्याचे यापेक्षां सुसंस्कृत असे दुसरे मार्ग आहेत असें मला वाटूं लागलें आहे. त्यासाठीं पक्ष्यांच्या सवयींचें निरीक्षण अत्यंत बारकाईनें आणि जवळून करावें लागतें. जर तें साधण्याची शक्यता असली तर आनंदानें बंदूक टाकून देण्याची माझी तयारी आहे."

थोड्याच दिवसांनीं त्याला मासे धरण्याचाहि उबग येऊं लागला. आत्मप्रतिष्ठेला ढका लागल्यामुळें त्यांतला सारा आनंदच मावळला. त्यानें लिहिलें, "एकेक वर्ष जातें तसतशी मासे धरण्याची माझी आवड घटतेच आहे. मी मोठा भूतदयावादी किंवा ज्ञानी झाल्यामुळें हें घडलें असें नव्हे. आज तर मासे धरण्यांत मला मुळींच स्वारस्य राहिलेलें नाहीं. पण जर ओसडींत राहण्याचा प्रसंगच माझ्यावर आला तर पुन्हा पट्टीचा मासे पकडणारा आणि शिकारी बनण्याचा मोह मला झाल्याशिवाय राहणार नाहीं असें वाटतें. मांसाहारांत मुळांतच एक प्रकारची अस्वच्छता आहे. घर रोज नीटनेटकें, स्वच्छ आणि साजिरें ठेवायचें, दुर्गंधी आणि ओंगळपणा दूर ठेवून घराचा गोडवा कायम राखायचा तर तें किती जिकिरीचें आणि कष्टाचें काम आहे, तें लौकरच माझ्या ध्यानांत आलें."

माणसाच्या रक्तांतच शिकारीची वृत्ति असते, आणि त्यामुळेंच निसर्गा-तील आणि जंगलांतील रौद्र रूपांचें दर्शन घेण्याची गोडी पुष्कळशा तरुणांत निर्माण होतें. या दृष्टीनें शिकारीचें असलेलें महत्त्व त्याला मान्य होतें. "ज्या मुलानें कधींच बंदुकीची गोळी झाडली नाहीं त्याची कींव करावीशी वाटते! बंदूक हातीं धरली नाहीं म्हणून एखादा माणूस सुसंस्कृत असतोच असें कांहीं नाहीं. पण त्याच्या शिक्षणांत मात्र मोठाच अपुरेपणा राहिला आहे असें म्हणावें लागेल...अविवेक करण्याचें बालवय एकदां संपलें कीं कोणीहि मनुष्य उगीचच्या उगीच कोणाच्याहि जिवावर उठणार नाहीं. ज्यामुळें आपल्याला आपला जगण्याचा हक्क लाभलेला असतो त्यामुळेंच त्या प्राण्यालाहि तो लाभलेला असतो...तरुण माणसाला जंगलाची जी ओळख होते ती बहुधा अशी होते. आणि त्यांत त्याची स्वतःची मौलिक-ताहि असते. तो पहिल्यांदा शिकार करायला किंवा मासे धरायला

जंगलांत जातो. आणि जर त्याच्यांत उच्च जीवनाच्या आकांक्षेचीं कांहीं बीजें असतील तर अखेरीस आपला खरा उद्देश त्याच्या ध्यानांत येतो आणि कवि किंवा प्राणिशास्त्रवेत्ता यांच्याप्रमाणेंच तो आपली बंदूक आणि गळ मागें टाकून पुढें जातो. पण बहुसंख्य लोक या बाबतींत बहुधा तारुण्याची वेस ओलांडीत नाहींत. कित्येक देशांत शिकारी मनुष्य ही नित्याचीच गोष्ट असते. असा मनुष्य फार फार तर धनगराचा चांगला कुत्रा होईल, पण चांगला धनगर मात्र तो होऊं शकणार नाहीं ! ''

पण तें कांहींहि असलें तरी थोरो हा एक शिकारी होता. विशेषतः मासे धरण्याचा शौक त्याला होता. आणि त्यांतूनच त्याला कित्येक सखोल अशा निसर्गाच्या अनुभूति आल्या होत्या. त्यांतूनच त्याचें कांहीं सुंदर लिखाण निर्माण झालेलें आहे. वॉल्डेनच्या जलाशयांतील रात्रीच्या मासे धरण्याचें त्यानें केलेलें वर्णन नमुना म्हणून दाखवण्याजोगें आहे. '' कित्येक वेळीं खेड्यांतल्या घरांत जेथें मुक्काम असेल तिथलीं सर्व माणसें झोपायला गेलीं म्हणजे मी जंगलचा रस्ता धरीत असे. मग दुसऱ्या दिवसाच्या जेवणाची कांहीं प्रमाणांत सोय करण्याच्या हेतूनें भर मध्यरात्रीं, चांदण्यांत होडी घेऊन, घुबडें आणि कोल्हे यांनीं आळवलेलीं प्रेम-गीतें श्रवण करीत किंवा जवळच्याच एखाद्या ठिकाणच्या पक्ष्याच्या तोंडून वरचेवर कानीं पडणारी किर्रकिर्र ऐकत मी तासन् तास गळ टाकून बसे. हे अनुभव मोठे स्मरणीय आणि मोलाचे आहेत. किनाऱ्यापासून पंचवीस तीस हात लांब आणि चाळीस फूट पाण्यांत, कांहीं वेळां हजारों छोट्या पर्च आणि शिनरच्या झाडांच्या वेढ्यांत आपल्या शेपट्यांनीं चंद्रप्रकाशांत पाण्याचा पृष्ठभाग तरंगित करीत असतांना मासोळ्या दिसत तेव्हां तें दृश्य अत्यंत रमणीय वाटे......''

अशा प्रकारें थोरोनें मजेंत जंगलांत वसंत ऋतु घालवला. ना कसली चिंता, ना दगदग. '' किती सुरेख संध्याकाळ ! '' त्यानें आपल्या दैनंदिनींत एकदां लिहिलें, '' सगळें शरीर म्हणजे जणुं एकच इंद्रिय झालें आहे. प्रत्येक रंध्रारंध्रांत आनंद नुसता भरून राहिला आहे. निसर्गांत एका वेगळ्याच मुक्तपणानें मी संचार करूं शकत आहें, जणुं त्याचाच एक अंश मी आहें. '' आणि सरत्या शरदांतला न्यू इंग्लंडमधला तो आखडता दिवस.

त्याचा आनंद साधाभोळा आहे. त्याचें एकाकी राहणें चालूच आहे. शरदांतल्या शांत दिवशीं तलावाचें तें अमित स्थिर सौंदर्य तो आकंठ पितो. पाणकोळ्याच्या गिरक्या घेण्यानें पाण्यावरती जे तरंग आणि वलयें उठतात तीं तो अनिमिष नेत्रांनीं पाहतो. हिंदकळणाऱ्या चिंगळ्या, बुड्या मारणाऱ्या पाकोळ्या, आणि सळसळत जाणारे ते चमकदार मासे ह्या सगळ्यांवर त्याची नजर खिळून राहते. जवळच्या एका डोहाच्या काठावरचीं चेसनर झाडें तोडतांना त्याच्या मनापुढें, न्यू इंग्लंडमधील हिंवाळ्याच्या ऐन मध्यान्हीं, आपला हा कुटिरानिवासाचा प्रयोग चालवतां येण्याजोगा एक दिवस उगवल्याचीं स्वप्नें तरळत. अंधार पडल्यानंतर जंगलाच्या त्या काळोखांतून चाचपडत येतांना त्याला मजा वाटे. त्याला रात्र जशी आवडत असे तसा हिंवाळाहि रम्य वाटे. एखाद्या प्रसन्न हवेंत जसा तो आनंदानें हिंडत असे, तसाच ऐन थंडींत, पावसांत किंवा मळभ दाटल्या दिवशींहि तो बाहेर फिरायला निघत असे. हिंवाळ्यांत तो तलावाच्या पाण्याचें तपमान न चुकतां रोज घेत असे. खोल पाणी थंड करायला उत्तर वाऱ्याला किती वेळ लागला तें तो नोंदवून ठेवी. वेगवेगळ्या ऋतूंतील वेगवेगळ्या हिमवर्षावाचें विविध सौंदर्य तो हेरीत असे. रेल्वेमार्गाचे निरीक्षक, शाळा-निरीक्षक, ह्याचे निरीक्षक आणि त्याचे निरीक्षक, अशा नोकरपेशा निरीक्षकांचा दबदबा समाजांत वाढता होता तेव्हां तो गमतीनें स्वतःला " हिमवादळाचा निरीक्षक " असें म्हणवून घेई. बर्फावर घसरण्याचा खेळ खेळण्याचा त्याला छंद होता आणि पुष्कळ वेळां तो एकटाच बर्फावरून घसरत जाई. कधीं इमर्सन वगैरे मित्र येत ते खेळण्यांतील सवंगडी बनत. तलावाच्या बुडावर एक इंच जाडीचा बर्फाचा थर पसरला असतांना " काचेच्या खालीं ठेवलेल्या चित्राप्रमाणें " तो त्याची चाचणी करी. आपल्या दैनंदिनींत तो केलेली पाहणी, अवलोकलेलीं दृश्यें, काढलेले निष्कर्ष आणि आपल्यां मनावर पडलेली छाप यांची रोज रात्रीं नोंद करी.

हिंवाळा वाढे तसा त्याचा एकाकीपणाहि वृद्धिंगत होई. " जेव्हां बर्फ कमाल पातळी गाठी तेव्हां आठ–आठ, पंधरा पंधरा दिवसांत माझ्या घराकडे कोणीदेखील फिरकत नसे. पण गवताला चिकटलेल्या एखाद्या उंदरासारखा मी तेथें चिकटून राही. भव्य हिम ! ऐकायला किती मधुर वाटतें ! ...माझ्या

हिंडण्या फिरण्यांत कुठल्याहि हवामानानें प्राणघातक अडथळा आणला नाहीं. ......अगदीं घनदाट हिमवर्षाव झालेला असला तरीहि बीच वृक्षाच्या, पीत बर्चच्या किंवा एखाद्या चिर परिचित पाइनच्या भेटीची वेळ चुकूं नये म्हणून मी आठ–दहा मैलांची रपेट करीत असे "...मिठी मारणारा वारा त्याला आवडे. तो वारा भुरभुरत्या हिमाचे ढिगारे बनवी आणि थिजलें दंव जेव्हां त्याच्या एका गालावर तडाखा देई तेव्हां तो आपला दुसरा गालहि त्याच्यापुढें करी ! वेगवेगळ्या घुबडांचे घुत्कार, बर्फाच्या ढिगाऱ्यांवर येऊन त्याच्या खिडकीशीं होणारा कोल्ह्यांचा ओरडा आणि तळ्याच्या पाण्यांत धपाधपा कोसळणाऱ्या बर्फाचा आवाज तो रात्रीं ऐकत राही. "तो जणुं आपल्या बिछान्यांत अस्वस्थ असे. आणि या कुशीवरून त्या कुशीवर होत राही.––पोटांतल्या वातानें तो त्रस्त असे आणि त्याला वाईट स्वप्नें पडत." तो लाल खारी, मैना आणि इतर पांखरें यांना दिवसा खाऊ घाली आणि रात्रीं सशांची खातिरदारी करी. धान्य आणि दारापुढें पसरलेले भाकरीचे तुकडे यांच्यावर त्यांचा गुजारा असे. ससे त्याच्या झोपडीखालीं राहत आणि रात्रीं बाहेर येऊन त्याच्या बटाट्याच्या ढिगाऱ्याचा फन्ना उडवीत. हिंवाळ्यांतल्या ह्या प्राण्यांची रग आणि चिवटपणा यांनीं तो मुग्ध होऊन जाई. या सगळ्या आपत्तींत त्यांच्या तग धरून राहण्याचा अर्थ, ते त्या जंगलाचे सच्चे आणि लायक रहिवासी होत, हाच होता. तो स्वतःच रान चिचुंद्या, घुबडें आणि बेडूक यांच्यात कायम वस्तीला राहिला असता, पण एका दिवशीं असे झालें कीं दुपारीं दोन वाजतां जगाच्या आसापाशींच खरखर सुरू झाली. जणुं त्याला वंगणाची गरज असावी. त्यामुळें जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. त्याला वाटलें कीं जीवनांत 'कांहींशीं जडता' आली आहे. मग त्यानें आपली होती नव्हती चीजवस्त घरीं हलवली आणि ती झोपडी सोडून दिली. तिच्यांत तो पुन्हां कधींच राहिला नाहीं.

● ● ●

# ५

*"सामान्यतः जो अर्थ गृहीत धरला जातो त्या अर्थानें मी पशूंना हिंस्त्र समजत नाहीं. मी त्यांच्याकडे जो एवढा ओढला गेलों त्याचें कारण मीं त्यांच्या तोंडून कधीं मूर्खपणाचें वक्तव्य ऐकलें नाहीं."*

**— थोरोची दैनंदिनी**

६ सप्टेंबर १८४७ रोजीं थोरोनें वाल्डेनमधील आपली झोपडी कायमची सोडून दिली. वाल्डेन ही त्याच्या जीवनांतील एक अवस्था होती आणि तिच्यांतलें सारें नवनीत त्यानें पिऊन टाकलें होतें. झाल्या गेल्याचा कुठलाहि खेद न राहातां तो नव्या अनुभवांकडे वळत होता. जीवन म्हणजे एका अनुभवाकडून दुसऱ्या अनुभवाकडे जाणें. सामाजिक प्रतिष्ठेच्या पायऱ्या चढत जाणें आणि त्याबरोबर संचय वाढवीत जाणें म्हणजे जीवन नव्हे, अशी त्याची जीवनविषयक दृष्टि होती. अंतःकरणाच्या उर्मींचें समाधान शोधण्याच्या दृष्टीनें आत्मविश्वासपूर्वक पडलेलीं प्रगतीचीं पावलें हेंच जीवन होय. ह्या प्रक्रियेंत माणसाला क्षणोक्षणीं "एक अदृश्य सीमा ओलांडण्यासाठीं" कांहीं वस्तु मागें सोडाव्याच लागतात आणि त्यामुळेंच "नव्या, विश्वव्यापी नैतिक अशा उदार बंधनांचा" त्याच्या जीवनांत विकास होण्याला अवसर मिळतो. माणसाच्या व्यक्तित्वाची संपन्नता आणि विस्तार वाढत जाणें म्हणजे प्रगति, अशी थोरोची प्रगतीची व्याख्या होती आणि वॉल्डेनच्या वास्तव्यांत त्याला त्याचा चांगला गहिरा अनुभव आला होता. त्याला ज्याचा शोध घ्यायचा होता तें तिथें त्याला मिळवतां आलें होतें. इमर्सननें यालाच आयुष्याची इतिकर्तव्यता असें संबोधलें होतें. त्याला त्याची दिशा उमगली होती. लेखक म्हणून असलेली आपली स्वतंत्र गुणवत्ता आणि सामर्थ्य याचेंहि त्याला भान झालें होतें. विचारांत आणि शैलींत असलेलें गतानुगतिकत्व आणि पढिकपणा यांच्यातूनहि तो बहुशः बाहेर पडला होता.. पिंडानें वानप्रस्थ नसलेल्या

१२३६५६

माणसाच्या दृष्टीनें जंगलांतलें दोन वर्षांचें वास्तव्य हें पुरेसें होतें. आतां बदलाला त्याची तयारी होती.

इमर्सन युरोपांत व्याख्यानें देण्यासाठीं दौऱ्यावर जाणार असून दुबळ्या लिंडियनला घर चालवण्यांत, बगीचा नीटनेटका ठेवण्यांत जर हेनरीची मदत झाली तर पुन्हा हवी होती आणि त्याबद्दल ती हेनरीचे उपकार मानायला तयार होती. ही दैवाची खैरच होती. इमर्सनच्या घरचें जीवन त्याला आवडे. तेथें त्याचें कौतुक होतें आणि आपल्यांतील सारी कारागिरी वापरण्याला त्याला अवसरहि होता. समान धर्मा लोकांचा सहवास त्याला तेथें मिळे. त्याला वेगळी खोली होती आणि लिहायला भरपूर रिकामपण होतें. त्याच्या आईबापांच्या घरापेक्षां इमर्सनच्या घरीं त्याला अधिक निवांतपणा लाभे. ' अ वीक ऑन द कॉकॉर्ड ' हें हस्तलिखित थोरो वाल्डेनहून घेऊन आला होता आणि त्याला प्रकाशक मिळावा म्हणून इमर्सन त्या वर्षीं खटपट करीत होता. इमर्सनच्या ह्या उपकाराची फेड करण्याची अशी आयती संधि मिळत असल्यानें हेनरीहि खुशींत होता.

१८४७ च्या अखेरीस तो इमर्सनच्या घरीं रहायला गेला. ह्यू व्हेलन या इमर्सनच्या दारूबाज आयरिश माळ्यानें त्याची झोपडी घेऊन टाकली. व्हेलननें ती झोपडी तळ्यापासून हलवून घेवड्याच्या शेतांत आणली. घेवड्याचें शेत आतां त्याला बाजाराच्या उपयोगी बाग करण्यासाठीं वापरायचें होतें, पण तें त्याच्या हातून कधींच झालें नाहीं. त्याची झोपडीची जुनी जागा अगदीं मोडकळीला आली होती. पुढें आयरिशमननें जागा सोडल्यावर एकदां थोरो स्वतःच तिकडे गेला आणि त्यानें इमर्सनसाठीं तेथें पाइनचीं झाडें लावलीं. एका किसानानें ती झोपडी विकत घेतली आणि तिचा वापर तो औजारें ठेवण्यासाठीं करूं लागला. आपल्या जुन्या राहाण्याच्या ठिकाणाबद्दल हेनरी मुळींच हळवा नव्हता. त्याला नवी वसाहत वसवण्याची महत्त्वाकांक्षा नव्हती कीं झोपडी-निवासाचा एखादा संप्रदाय त्याला सुरू करायचा नव्हता.

लिंडियनच्या घरांत अत्यंत सुखासमाधानानें त्यानें आपली पूर्वीची जागा घेतली. त्यांच्यांतला स्नेह अधिक घनिष्ठ झाला. लिंडियनला त्याच्या-

सारख्या धट्ट्याकट्ट्या इसमाची हजेरी आणि प्रेमळ सहवास हवा होता आणि तिच्यापाशीं राहाण्यांत हेनरीलाहि सुख झालें. अधूनमधून चारदोन दिवस तो जंगलांत जाई आणि ताजातवाना होऊन येई, स्फूर्ति घेऊन येई. तें त्याचें लिखाणाच्या दृष्टीनें अत्यंत फलदायी वर्ष होतें. वाल्डेनबद्दल बरेंचसें लिखाण थोरोनें इमर्सनच्या घरीं केलें. 'सिव्हिल डिसओबिडियन्स' ची रचना त्यानें तेथेंच केली. एखाद्याच्या ग्रंथाचें मूल्यांकन त्यांचा इतर माणसांच्या विचारांवर जो परिणाम होतो त्या मापानें केलें तर थोरोच्या सर्वांत थोर अशा ह्या दोन कलाकृति ठरतील.

थोरोच्या झोपडीच्या समोरच्या बाजूला, वाल्डेन तलावाच्या जवळ इमर्सननें जमीन घेतली होती आणि तेथें एक आलीशान इमला उभारण्याचा त्याचा विचार होता. पण ती कल्पना त्यानें सोडून दिली आणि कॉन्कॉर्डच्या जमिनींतच एक उन्हाळी घर बांधण्याचा थोडा कमी महत्त्वाकांक्षी बेत त्यानें आंखला. हें घर बांधतांना थोरोला थोडी करमणूक आणि भरपूर उपद्रव झाला. घर उत्कृष्ट होतें, पण कमनशीबीं ठरलें. त्या घराची आंखणी-बांधणी करण्यांत त्यांचा जुना अज्ञेयवादी मित्र ब्रॉनसन अलकॉट याचा मोठा हात होता. थोरोची सुतारी कामापुरती मदत त्यानें घेतली, पण आंखणीच्या कामांत त्याचें कांहीं त्यानें ऐकलें नाहीं. इमर्सनच्या एका मुलानें नंतर लिहून ठेवलें, "पाइनच्या झाडाचा गाठाळ भाग, ओकच्या झाडाचे तसलेच तुकडे आणि देवदाराचे गाठाळ मोठाले ओंडके एकत्र जुळवून १८४७ मध्यें अलकॉटनें एक बेकार परंतु आकर्षक असें घर उभारलें. पूर्वीच्या घरापासून शंभर पावलांवर हें घर होतें. आपल्या मित्राला एकांतांत अभ्यास करतां यावा म्हणून ही सारी यातायात! त्याच्या या कामांत थोरोनें हातभार लावला. कुठलीहि योजना न ठरवतां काम चाललेलें पाहून थोरोच्या व्यवहारी मनाचा संताप संताप व्हायचा, पण हळूं हळूं काम उठत होतें. इमारतीला लावायची प्रत्येक वेडीवाकडी फांदी, येईल त्या सूचनेप्रमाणें त्याला योजावी लागत होती. पावलापावलागणिक बदल करीत करीत ती इमारत पूर्ण होत होती. तो म्हणे, 'मी कुठेंच आणि कांहींच जणूं करीत नाहीं असें वाटे'......थोरो खिळे ठोकायचें काम करी आणि अगदीं इमानानें करी. सौंदर्यासाठीं अलकॉटनें पागोळ्यांना वरच्या बाजूला वक्रता दिली.

आणि छपराला आंतून वेलव्हेट रंगाच्या शेवाळ्याचें आणि गवताचें अस्तर दिलें आणि लौकरच निसर्गानें तें हिरावून घेतलें. जेव्हां उभारणाराकडून तें घर ताजें ताजें हातीं आलें तेव्हां इमर्सनबाईंनीं अगदीं निरागसपणें त्याला नांव दिलें ' विनाश ! '

बांधणारा आणि त्याचा मदतनीस ह्या दोघांत कमालीचा विरोध होता. अलकॉट हा एक वैशिष्ट्यपूर्ण अज्ञेयवादी होता. त्याचें चित्त कधींच थाऱ्यावर नसे. दिवास्वप्नें पाहाण्याचा त्याला सराव होता. ' फळबाग ' उभारण्यापूर्वी त्यानें इतरहि निष्फळ प्रयोग केले होते. थोरोचे पाय जमिनीवर असत. त्याच्यांत एक प्रकारची तरतरी आणि नेटकेपणा होता. घरगुती काम असो, शेताची पाहणी असो, एखादें औजार तयार करायचें असो थोरोवर विसंबून राहातां येत असे. एका वेळीं बारा महिन्यांचा व्यवहार ज्याच्यावर निर्धास्तपणें इमर्सननें सोपवावा, असा हा विश्वासू इसम होता. अर्थात् कॉंकॉर्डच्या इतर ग्रामस्थांना थोरोबद्दल एवढा विश्वास नव्हता. पुष्कळांना तो जंगलाला आग लावणारा विधोटा वाटे ! त्याच्या आईवडलांना तो म्हणजे एक कोडें होतें. त्याच्याबाबत ते निराश होते. डोळे मिचकवणाऱ्या त्याच्या ज्या गांवमाम्या आणि आत्या त्यांना करमणुकीसाठीं तो एक कुचेष्टेचा विषय होता. एक दिवस उन्हाळी घराच्या छपरावरून हेनरी कोसळला, पण सुदैवानें गवताच्या गंजीवर पडला. त्याच्या मरिया आत्यानें या निमित्तानें या अज्ञेयवाद्यांना एक खवचट टोमणा मारला, " ही सगळी मंडळी जेव्हां ढगांतून खालीं येतील तेव्हां त्या प्रत्येकाला खालीं अशी मऊ मुलायम जागा मिळो, एवढीच माझी देवाच्या चरणीं प्रार्थना आहे ! "

" वाल्डेनच्या मुख्य आणि जंगली वातावरणांतून–' झाडू खराटे, हिशोब ठिशोब आणि कर-घरगुती कामें ' यांच्या वातावरणांत " असें इमर्सनच्या घराचें त्यानें वर्णन केलें आहे. त्याच्याशीं समरस व्हायचें हा फार मोठा बदल थोरोच्या दृष्टीनें होता. पण जंगल आणि शेतें यांच्याशीं त्यानें दैनंदिन संबंध ठेवला असल्यानें तो त्याला फारसा जाणवला नाहीं. नियमितपणें अशा रीतीनें रमण्या-गमण्याची संवय त्यानें आयुष्याच्या अखेरपर्यंत कायम ठेवली होती. वर्षभर दर आठवड्याचे कित्येक दिवस तो ऐन दुपारचा हिंडायला निघे. तासनतास

बाहेरचें निरीक्षण करीत आणि विचार करीत त्याची ही भटकंती चाले. घरगुती कामांतली क्षुद्रता निपटून काढण्यासाठीं रिचर्ड जेफिज तीन मैलांवरच्या आपल्या आवडत्या टेकडीकडे फेरफटका करून येई, थोरोचेंहि तसेंच होतें. गांवाच्या गजबजाटापासून बऱ्याच दूर गेल्यानंतर थोरोला खरेखुरे सात्त्विक झाल्यासारखें वाटे. तो आरंभीं झपाट्यानें चाले. कधीं राजमार्गानें, पण बहुधा पायवाटांनीं; कधीं शेतें तुडवीत तर कधीं दोन शेतांमधलें जंगल ओलांडीत, सावली जशी वईकडून किर्र रानांत घनदाट होत जाते तसा तो आंत शिरे. बागांमधून राईत घुसून सहसा कोणाच्या नजरेला पडत नसे. " सर्व खिडक्या फळझाडांनीं बंद झाल्यानंतर " तो आपल्या मनपसंतीच्या घनदाट भागांत जाऊं शके.

दुपारची ही घराबाहेरची भ्रमंती हा त्याचा आणि त्याच्या लिखाणाचाहि प्राण होता. त्याच त्याच भागांतून जरी तो पुन्हा गेला तरी दर वेळीं नवदर्शन घेण्याची आणि नवविचार स्फुरण्याची त्याच्यांत कुवत होती. त्यानें पाहाणी करीपर्यंत त्याच्या घरासमोरचें कुरण हें अज्ञातच होतें. आठ दिवसांनीं तें पुन्हा बदलणार होतें आणि त्यामुळें त्याची पुन्हा पाहणी करणें भागच होतें. त्या चढउताराच्या मऊशार जमिनींत तो कुठेंहि हिंडला, कोणत्याहि नद्या, राया, दलदली, टेकड्या त्याला भेटल्या तरी तो टिपणें करून घरीं परते. संध्याकाळीं मग तीं पक्की करीं आणि दुसऱ्या दिवशीं पहांटे त्यांचा विस्तार करून त्यांची नीटनेटकी मांडणी करी.

आयुष्यांत वर्षानुवर्षें न कंटाळतां, न कोमेजतां तो हें करीत राहिला. आपल्या टिपणांवरून सतत उल्हासित वृत्तीनें अत्यंत प्रभावशाली वाक्यें त्यानें रचलीं. त्याच्या आयुष्यांतलें हें एक वैशिष्ट्यपूर्ण यश आहे. त्याचें हें लिखाण म्हणजे नुसत्या निसर्गवर्णनाहून किती तरी सरस असें कांहीं आहे. सामान्यतः निसर्गवेत्ते ज्या दृष्टीनें प्रयत्न करतात त्यापेक्षां अधिक विशाल सीमा गाठण्याचा त्याचा प्रयत्न होता आणि त्याचा हा प्रयत्न अधिक दीर्घ आणि आनंदमय होता. तो कित्येक दृष्टींनीं इतर अज्ञेयवाद्यांपेक्षां अधिक व्यापक विचार करीत होता. कॉंकॉर्डमधल्या तत्त्वज्ञानी लोकांच्या प्रभावापासून अद्याप तो मुक्त होता. जर्मन आणि हिंदू दर्शनांचें वाचन आणि मधूनमधून " विश्वात्म्याशीं एकतानता साधण्याचे प्रयत्न करण्याची " येणारी ऊर्मि

लक्षांत घेऊनहि अध्यात्मांत गुरफटलेला तो बव्हंशीं अमेरिकन आणि निसर्गवेत्ता होता असें म्हटलें पाहिजे. निसर्गाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन हा सतत व्यक्तिगत स्वरूपाचाच होता. त्यानें निरीक्षणाची कला आत्मसात केली होती तरी काय पाहिलें यापेक्षां काय, कसें पाहिलें त्याचा त्याच्यावर अधिक प्रभाव पडत असे. आणि निसर्गाचें रूप आणि मानवाची मनःस्थिति ह्या दोन्ही गोष्टी निरंतर बदल तअसल्यानें शेतांतील प्रत्येक घटका त्याला नवा बोध आणि नवा आनंद देणारी ठरत होती.

त्याची पाहण्याची दृष्टि काव्यात्म होती. परंतु ही काव्यात्म दृष्टि त्यानें जें इंद्रियांच्याद्वारां दर्शन घेतलें तें झाकोळून टाकीत नाहीं. रॉबिन, ब्लू बर्ड, सॉंग स्पॅरो, बोबोलिंक रशस्पॅरो, किंग बर्ड, पाइन-वॉरब्लेर इत्यादींवरील कवितांतून वसंत जणुं नाना रूपांनीं उसळत असतो. ओकच्या झुडपांबद्दलचें त्याचें प्रेम, तीं जमिनीवर सरपटतात त्याचें चित्र रेखाटतांना त्याला अंध करीत नाहीं. त्यांचीं "पानें हिवाळ्यांत स्थिर आणि घट्ट असतात. तीं चामड्याच्या ढालीसारखी चमचम करतात. त्यांचा स्पर्श पथ्यकर, स्वच्छ आणि मुलायम वाटतो." तो निसर्गकवि असला तरी फाटकाचे देखील गज मोजण्याइतका साक्षेपी होता. कासवें आणि बेडूक यांच्या संवयींचा अभ्यास करण्याची त्याची बुद्धि होती. वनस्पतिशास्त्राच्या मदतीनें वेगवेगळ्या झाडांचें वर्गीकरण करण्याची आकांक्षा त्यानें बाळगली होती. एखाद्या शास्त्रज्ञाच्या तोडीची जाणण्या-संबोधण्याची त्याची जिज्ञासा होती. "गेलीं वीस वर्षें एका विशिष्ट लव्हाळ्याचा दृष्टिपरिचय मला होता, पण त्याचें नांव ठाऊक नसल्यानें त्यांच्या कांहीं वैशिष्ट्यांचें वर्णन मी करूं शकलों नाहीं. नामज्ञानाबरोबर त्या वस्तूचें व्यवच्छेदक ज्ञानहि प्राप्त होतें."

उद्यांच्या निसर्गवेत्त्यांना त्याचा सल्ला असें कीं बाबांनो, निसर्गाच्या सन्निध रहा. "जर कवि किंवा निसर्गवेत्ते म्हणून एखाद्या परिसराचें संशोधन करीत असाल तर त्या जागीं जाऊन राहा, तुमची जिविका त्यांतून मिळवा. तिथल्या प्रवाहांत मासे धरायला जा. तिथल्या जंगलांत शिकार करा. तिथल्या रानांतून जळण गोळा करा. तिथल्या जमिनीवर मशागत करा. आणि तिथलीं फळें वेचा." त्याच्या दारिद्र्याचा लाभ असा कीं त्यानें

" त्या जन्मभूमींत कितीतरी वेळ स्थिरपणें मला खिळवून टाकलें आणि त्या भूखंडाचा अधिकाधिक अभ्यास करायला आणि त्यावर प्रेम करायला भाग पाडलें. " एका मर्यादित प्रदेशावर अहर्निश एकाग्र चित्त केल्यामुळेंच तो ज्यासाठीं धडपडत होता तें जीवनाचें सखोल ज्ञान त्याला हस्तगत झालें. " दरवाजापासून वेशीपर्यंत थोडीदेखील प्रगति करायची असेल तर बुद्धिसंपन्न माणसानें त्यासाठीं आपला गांव पालथा घातला पाहिजे आणि देश धुंडाळला पाहिजे. माणूस जर कुठें समर्थ आणि संपन्न असेल तर तो आपल्या जन्मभूमीवरच असूं शकतो. " खुलीं मैदानें किंवा रॉकीपर्वत यांच्याकडे धांव घेण्यांत कांहीं मतलब नाहीं. त्याची पुसटशी ओळख व्हायची तर त्याला देखील कित्येक वर्षें लागतील, असें त्याला वाटत होतें. " कॅलिफोर्नियांत जर मी गेलों तर तेथील महावृक्षांकडून जें जीवनपाथेय मला लाभेल त्यापेक्षां अधिक तें या कॉंकॉर्डमधील वनस्पति-सृष्टीकडून मिळेल " असें तो म्हणे. भाराभर पुस्तकें वाचून किंवा पढवून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षां माणूस आपल्या पुरुषार्थानें निसर्गाकडून जें ज्ञान मिळवतो तें थोरोला अधिक सकस आणि सखोल वाटत होतें. सूक्ष्म आणि प्रत्यक्ष निरीक्षणाची बरोबरी कितीहि पढलें तरी होऊं शकत नाहीं. " हीं शेतें, हे झरे आणि हीं जंगलें आणि इथें राहणाऱ्या लोकांचें साधे भोळे व्यवसाय जर मला गोडी लावूं शकलें नाहींत आणि स्फूर्ति देऊं शकलें नाहींत तर त्याचा भरपाई कुठल्याहि संस्कृतीनें किंवा संपन्नतेनें होऊं शकणार नाहीं. "

थोरो जें संग्रह-संपादन कार्य करीत होता तें निसर्गविज्ञानाच्या चाकोरीहून वेगळें होतें. अलकॉटनें त्याचें वर्णन करतांना म्हटलें होत, " कॉंकॉर्डचें आपलें नकाशापुस्तक तयार करण्यासाठीं त्याच्याजवळ भरपूर मालमसाला आणि बुद्धिवैभव होतें. " कारण थोरो जन्मतःच भूगोलवेत्ता होता. चॅनिंगनें लिहून ठेवलें आहे, " एक पंचांग तयार करण्याचें त्याचें स्वप्न होतें, अभिनव पंचांग. ऋतुचक्राचें बव्हंशीं परिपूर्ण दर्शन त्यांतून घडवावें अशी त्याची आकांक्षा होती. ... त्यांत शीतोष्णांच्या आलेखाचा समावेश असेल. त्याच्यापाशीं नदीचें सतत घेतलेलें मोजमाप होतें. आसपासच्या तळ्यांचें आणि झऱ्यांचें तपमान त्यानें टिपलें होतें. आकाशाची बदलती शोभा त्यानें नोंदवली होती. झाडांचे बहर, त्यांचा फुलण्याफळण्याचा हंगाम,

त्यांच्या पानगळीचा काळ, फिरत्या पक्ष्यांच्या येण्याजाण्याचें वेळापत्रक, प्राण्यांच्या संवयी " सारे सारे त्याच्याजवळ होते. स्थानिक परिसराच्या प्रत्येक पैलूसंबंधीं त्यानें टिपणें, सूचि, अवतरणें अशी प्रचंड माहिती जमा करून ठेवली होती. त्यांतून शेजाऱ्यांच्या हालचाली आणि जीवनकथाहि त्यानें वगळल्या नव्हत्या. कृषिविज्ञान, तत्त्वज्ञान आणि सौंदर्यशास्त्र या सर्व गोष्टी त्याच्या पाहाणींत समाविष्ट होत्या. जीवनाच्या विविध घटकांच्या समन्वयाचें सूत्र त्या पाठीमागें होतें. केवळ कॉंकॉर्डच्या परिसरांतील नव्हे तर अवघ्या पृथ्वीवरील जीवनाचें समन्वित दर्शन घडावें हा त्याचा हेतु होता. आकाराचें थोरोवर कधींच दडपण पडलें नाहीं. न्यू इंग्लंडच्या कांहीं चौरस मैल क्षेत्रफळांत साऱ्या जगाचें संक्षिप्त रूप सामावूं शकतें. साऱ्या जगाचें परिभ्रमण केलें असलें तरीहि कांहीं थोड्या संकुचित कल्पनांच्या पक्कडीबाहेर जाण्याचें साहस माणसाच्या हातून कधींहि न घडल्याचें दाखले मिळतात.

निरीक्षण आणि लेखन हें त्याचें जीवन होतें. पाय आणि होडी हीं त्याला आपल्या कामावर पोंचवणारीं साधनें होतीं. सडबरी नदींतून होडी वल्हवीत जातांना त्याला पाहिलें म्हणजे तो केवळ बोरें वेंचायसाठीं ही धडपड करीत नसेल, असें लोकांना वाटतच नसे. त्याची तक्रार अशी होती कीं " जंगलांतला रस्ता आणि होडी हें माझें चित्रगृह आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानींच येत नाहीं. त्या ठिकाणीं मी पवित्र एकान्त राखीत असल्यानें येऱ्या गबाळ्यांना मी तेथें प्रवेश देत नाहीं.... आपल्या बरोबर बोरें गोळा करायला येण्यासाठीं शाळेंतून मुलाला बाहेर काढण्याची कल्पना त्यांना शिवत नाहीं.... मग मीं तरी माझी शाळा आणि शाळेचे तास यांची फिकीर कां करूं नये? हवे तर माझ्याजवळ चार पैसे मागा, पण माझ्या दुपारच्या वेळेची मागणी करूं नका. " लोकांबरोबर निसर्गनिरीक्षण करणें शक्य असलें तरी निसर्गाचें चिंतन करायचें तर एकटेच असलें पाहिजे असें त्याच्या अनुभवाला आलें होतें. पाणलावा, कांसव, मुंगूस, बेडूक इत्यादीं-बद्दल जी आस्था त्याला होती त्यामुळें त्याला सक्तीनें एकान्ताची कास धरावी लागे. माणसांना दुरावण्याची किंमत मोजल्यानंतरच आपल्याला

सृष्टीशीं घनिष्ठ संबंध जोडणें शक्य होत आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आली होती आणि त्यामुळें त्याला खेदहि वाटत होता.

इंग्लंडमधला आपला व्याख्यानांचा दौरा संपवून इमर्सन परत आल्यावर, १८४८ च्या जुलै महिन्यांत थोरो आपल्या कुटुंबांत राहायला गेला. त्या नंतर लौकरच थोरो कुटुंब एका प्रशस्त, प्रसन्न अशा मेन स्ट्रीटवरील पिवळ्या घरांत राहायला गेलें. त्याचें उर्वरित आयुष्य त्यानें येथेंच घालवलें. त्यांच्या घरचा शिसपेनींचा धंदा चालूच होता. हेनरी आणि त्याचे वडील या दोघांच्या संशोधकवृत्तीमुळें त्याला हळूहळू बरे दिवस आले. यानंतर त्यांनीं सांधा बदलून शिसपेनी बनवण्याच्या धंद्याऐवजीं अधिक किफायतशीर असा, उच्च दर्जाची ग्राफाइट पावडर विकण्याचा धंदा सुरू केला. ग्राफाइट पावडर नवीनच शोध लागलेल्या इलेक्ट्रोटायपिंगच्या प्रक्रियेंत वापरली जात असे. त्या धंद्यामुळें हळूहळू त्यांना ऊर्जितावस्था आली. त्याच्या आयुष्यक्रमाला आतां स्थिर असें एक वळण लागलें. सकाळच्या वेळाची ग्राफाइटचें दुकान, त्याची लिहिण्याची खोली आणि त्याचा वाढता मोजणीदाराचा व्यवसाय यांत विभागणी होई. जमीन मोजणीचीं कांहीं उपकरणें जवळ जवळ दहा वर्षें स्वतःजवळ तो बाळगून होता. स्थानिक शेतकरी आणि जमीनदार यांना त्याच्या त्या सेवेची गरज हळूहळू वाढत्या प्रमाणांत भासूं लागली आणि मग त्यानें स्वतःजवळच्या उपकरणांत आवश्यक तेवढी भर घालून तो अगदीं आद्यतन असा मोजणीदार बनला. दुपारचा वेळ तो घराबाहेरच काढी. बहुधा एकटाच. पण कांहीं वेळां चॅनिंग, इमर्सन वगैरे मित्रांबरोबर आणि क्वचित् कुटुंबांतल्या मंडळींबरोबर कांहीं संध्याकाळी अशाच मित्रांच्या सहवासांत व्यतीत होत, पण पुष्कळ वेळां तो लिहीत किंवा अभ्यास करीत बसे. हार्वर्ड विद्यापीठाच्या ग्रंथालयांतून पुस्तकें आणण्याचें त्याचें वळण कायमच होतें. त्याच्या वाचनाच्या कक्षा रुंदावत होत्या. काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्या जोडीला तो आतां कृषिविषयक भूगोल व मानववंशविषयक ग्रंथहि वाचीत होता. रेड इंडियन लोकांविषयीं पुस्तक लिहिण्याचें त्याच्या डोक्यांत घोळत असल्यानें मानववंशविषयक वाचन तो करीत होता.

आपण कधीं काळीं ग्रंथलेखक होऊं किंवा कसें, असा त्याला स्वतःबद्दल संशय वाटण्याला जागा होती. इमर्सनसारख्यांनीं भीड घातली असूनहि 'अ वीक ऑन द कॉंकॉर्ड' हें पुस्तक प्रकाशक हातीं धरायला तयार नव्हतें! थोरोचा स्वभाव काटकसरी होता, पण तरीहि त्याच्याजवळ फारशी माया आतां नव्हती. त्यानें लिहिलें, "आतां पांच वर्षें झालीं, मी स्वतःचा गुजारा शरीरश्रमावर करीत आहे." आतांहि तो कांहीं माल होरेस ग्रीनले यांच्या-मार्फत खपवत होता. इमर्सनच्या सल्ल्यावरून 'अ वीक ऑन द कॉंकॉर्ड' स्वखर्चानें प्रसिद्ध करायला तो एकदांचा तयार झाला. १८४९ च्या वसंत-ऋतूंत पुस्तक प्रसिद्ध झालें. 'द न्यूयॉर्क ट्रिब्यून' मध्यें, संपादक होरेस ग्रीनले यांच्या विनंतीवरून कॉंकॉर्डच्या जॉर्ज रिप्ले यांनीं पुस्तकाचें परीक्षण लिहिलें. ग्रीनले हा अज्ञेयवादाचा एक कट्टर चाहता होता आणि थोरोकडून तो मोठ्या अपेक्षा बाळगून होता. रिप्लेनें थोरोच्या निसर्गवर्णनाची पोट भरून स्तुति केली, परंतु त्यांतला अद्वैताचा पुरस्कार मात्र त्याला पचवतां आला नाहीं. लंडनच्या 'अथेनियम' मध्यें आलेलें परीक्षण अधिक्षेप करणारें होतें. त्या काळांतील प्रमुख अमेरिकन टीकालेखक जेम्स रसेल लॉवेल यांनीं एक विनोदप्रचुर रसग्रहण 'द मॅसाच्युसेट्स क्वार्टर्ली रिव्ह्यू' मध्यें लिहिलें आणि लिखाणांतील मौलिकता, चारुता, आणि हास्यरस यांची वाखाणणी केली. परंतु 'अ वीक ऑन द कॉंकॉर्ड' हें पुस्तक सामान्य लोकांना फारसें आवडलेलें दिसलें नाहीं. हजार प्रती छापल्या होत्या. चार वर्षांनंतर त्यांपैकीं सातशें सहा प्रती न विकल्या गेलेल्या, लेखकाकडे परत आल्या! त्याच्या खोलींत त्यांचा एक ढिगारा झाला. त्याच्या ग्रंथालयांत पडलेली ही जी भर तिच्याबद्दल तो गमतीनें म्हणे: "आतां माझ्या ग्रंथालयांत जवळजवळ नऊशें ग्रंथ आहेत आणि त्यापैकीं सातशेंवर तर मीं स्वतःच लिहिलेले आहेत!"

# ६

*“ समाज ...... ना त्यांत पाइन वृक्षासारखा आरोग्यदायक सुवास ना घनदाट गवताळ जमिनींतल्या सारखा अमर असा मनोवेधक, उत्तेजक गंध. ”*

—**थोरो**–द नॅशनल हिस्ट्री ऑफ मॅसाच्युसेट्स्.

थोरोच्या पहिल्या पुस्तकानें आर्थिकदृष्ट्या मार खाल्ला यांत कांहींच आश्चर्य नाहीं. ‘ अ वीक ऑन द कॉंकॉर्ड अँड मेरिमॅक रिव्हर ’ ह्या नांवावरून हें प्रवास व साहस–वर्णन असलेलें पुस्तक असावें हें ध्यानांत येत असलें तरी हें नांव कांहींसें गोंधळांत टाकणारें आहे. नांवांतील ‘ वीक ’ हा सप्ताहवाचक शब्द म्हणजे वर्षानुवर्षें अंतराअंतरानें कॉंकॉर्ड आणि मेरिमॅक नद्यांच्या सान्निध्यांत लेखकानें जें चिंतन आणि लेखन केलें त्याचें सार होय. लेखकाच्या अमर्याद तत्त्वचिंतनाला आणि स्थानिक इतिहासांतील कथांना एक पुसटशी पार्श्वभूमि एवढ्याच पुरता त्यांत नद्यांचा वापर केलेला नाहीं. मा॥१८ ३ुळरनें त्यापूर्वीं कांहीं वर्षें इलिनॉइस आणि विहसकॉनसिनचा प्रवास केला होता आणि ‘ समर ऑन द लेक्स् ’ हें पुस्तक लिहिलें होतें. विविध विचार आणि काव्य यांना एका प्रवासवर्णनाच्या धाग्यांत दडपून गुंफून ती एक गोधडी बनवलेली होती. आपलें प्रवासवर्णन लिहितांना थोरोच्या समोर कदाचित् तें पुस्तक असेल. सामान्य वाचकाला न पेलणारे आणि न आकलन होणारे असे विषय निबंधांच्या रूपानें त्या प्रवास-वर्णनाच्या माथीं त्यांत मारले आहेत, हें थोरोला चांगलें ठाऊक होतें. थोरोनें लिहिलें आहे : “ रिकामपणाचा चाळा म्हणून जीं पुस्तकें वाचावयाचीं असतात आणि ज्यांतून गुदमरलेला आनंद मिळतो त्या पुस्तकांना मी चांगलीं पुस्तकें म्हणून संबोधणारच नाहीं. उलट ज्यांतला विचार अन् विचार हा असामान्य निर्भयतेचा असेल आणि ज्यामुळें प्रस्थापित समाजसंस्थांना आपली भीति वाटेल त्या पुस्तकालाच मी चांगलें पुस्तक म्हणेन. ”

नदीच्या प्रत्येक वळणावर थोरो वहावत जातो आणि आपल्याला लांडगे, साळिंदर किंवा दुसरा एखादा प्राणी यांच्याच मागे फरफटत नेतो असें नव्हे तर काव्य, योग किंवा इतिहाससंबंधींची तात्त्विक भूमिका इथपर्यंत तो घेऊन जातो. लॉवेल म्हणतो त्याप्रमाणें आपण या विषयांतराकडे आलों म्हणजे " आपण प्रवाहाबरोबर किंवा विरुद्ध शांतपणें वल्हवीत असावें आणि मध्येंच एखादें दांडके येऊन आपल्या कपाळावर आदळावें तसें वाटतें ! ह्या चर्चांमध्यें थोरो असा कांहीं फसतो कीं तो जणुं एखादा खेकडा पकडायच्या नादीं लागून आपली सुकाणूची जागा सोडून देऊन अस्वस्थ मनानें कुठेंतरी नाहींसा झाल्यासारखें वाटतें. " पण एकदम कौशल्यानें तो होडी सावरतो आणि पुन्हा आपला नदीचा प्रवास सुरळीत सुरू होतो आणि आपण झालेली तारांबळ विसरून थोरोचे स्वतःचे असे जे खास विषय त्यांच्याकडे वळतों. स्थानिक प्रवाहांची जीवनकथा तो सांगतो. नाद, गंध आणि रूप यांचा जो आनंद आपण सुट्टीच्या दिवशीं एखाद्या सुंदर परिसरांत नावेंतून गेलों म्हणजे मिळतो तो आपल्या वाट्याला येतो.

रात्रीच्या मुक्कामासाटीं आपण किनाऱ्यावर तळ ठोकतों. मग होडींतून आपलें सगळें सामान काढून तंबूंत आणतों. चूल पेटवून रात्रीचें जेवण आटोपतों. मग कंदील लावून आपण लेखकाच्या तंबूंत जाऊन बसतों. आणि त्याचें ' गॅझेटियर वाचणें ' ऐकतों. मग आपल्या तळाचें नदी-किनाऱ्यावरचें नेमकें स्थान अक्षांश-रेखांशावरून आपल्याला समजतें असें नव्हे तर अवघ्या विश्वांतील आपलें स्थान त्या ऐकण्यांतून आपल्याला उमगतें. किंवा आपण नदीच्या प्रवाहाबरोबर होडी हांकारीत एखाद्या चुकारतट्टू टरबुजाच्या शोधांत निघतो. " या ओढ्याच्या तोंडाशीं असलेल्या थंड पाण्यांतील लव्हाळ्यांच्या दाटींत आपण आपल्या जवळचें सर्वांत मोठें टरबुज ठेवतों. मग आपला तंबू ठोकून तयार झाला कीं तें आणायला आपण जातों. परंतु तें मधल्या काळांत तरंगत तरंगत प्रवाहाला लागतें आणि कुठेंहि दिसेनासें होतें ! मग पहाटे झुंजूमुंजू होतांच आपण आपलें हें हरवलेलें डबोलें शोधायला निघतों. पुष्कळ शोधाशोध केल्यानंतर आणि डोळे फाडफाडून पाहिल्यानंतर प्रवाहाच्या बऱ्याच खालीं एक हिरवी वाटोळी तबकडी आपल्या नजरेला पडते. तें टरबूज धीरेधीरे समुद्राच्या दिशेनें

वाहत आलेलें असतें. आणि त्याच्याभोवतीं डोंगरावरून वाहत आलेलीं पानें आणि फांद्या असतात आणि ह्या डोलाऱ्याचा तोल इतका साधलेला असतो कीं तें उपडें होत नाहीं. टरबुजाला तें लौकर थंड व्हावें म्हणून टाकी लावलेली असते, पण तिच्यांत एक टिपूसभर देखील पाणी शिरलेलें नसतें."

'अ वीक ऑन द कॉंकॉर्ड' हें कितीतरी दिवस वाढत, विस्तारत होतें. ही सहल प्रत्यक्ष १८३९ सालीं झाली. १८४६ सालीं दैनंदिनीवरून या पुस्तकाचा बव्हंश भाग हप्त्याहप्त्यानें लिहिला गेला. १८४९ मध्यें पुस्तक छापून होईपर्यंत त्यांत बदल होत होते, भर पडत होती. अशा प्रकारें लेखकाच्या एका दशकाच्या मनःप्रवृत्ति आणि स्वभावधर्म यांच्यांत डोकावण्यास ही एक खिडकी उपलब्ध झाली आहे. वाल्डेनच्या जीवनक्रमांत जो मोकळा एकांत लाभला आणि त्यांतून जो आशावाद आणि आत्मविश्वास उमलला त्याचें प्रसन्न असें प्रतिबिंब पुस्तकांत आढळतें. इथें त्याला परमानंदाचा काळ लाभला आणि त्याची दृष्टि प्रगल्भ झाली. त्याला स्वतःची ओळख झाली आणि स्वतःवरचा त्याचा विश्वास वाढला. मानवी संस्थांची त्याला कांहींशीं घृणा वाटत असली तरी आपलें जीवन सखोल आणि वास्तव पातळीवर निसर्गाशीं संवादी आहे याचें त्याला समाधान होतें. "प्रसन्न जीवनाच्या लाटा" त्याला न्हाऊं घालीत होत्या, "ढगाळ हवामानांत शेतावर पसरणाऱ्या सूर्याच्या किरणांप्रमाणें जीवन उजळून" निघत होतें. वाल्डेनला असतांना, ह्या पुस्तकाला अधिक वेळ देतां यावा म्हणून, त्यानें दुसऱ्या वर्षी वसंतांत थोड्याच बियांची लागवड केली आणि "प्रांजळपणा, सत्यनिष्ठा, साधेपणा, श्रद्धा आणि निरागसता" यांचें मोठें पीक त्याच्या हातीं पडलें! त्याची साहित्यशक्ति जवळपास पूर्णतेला पोंचत आली होती आणि आपला स्वतंत्र असा जीवनमार्गहि त्यानें निश्चित केला होता. कागदावर शब्दांची टीप पडत असतांना, लेखक या नात्यानें आपल्या वाट्याला येणारें उज्ज्वल भवितव्य त्याला यावेळीं जेवढ्या स्पष्टपणें दिसत होतें तितकें त्याला पुन्हा कधींच दिसलें नाहीं. 'अ वीक ऑन द कॉंकॉर्ड' ही समाधान पावलेल्या माणसाची कलाकृति आहे. आणि निखालस आंतरिक शक्ति, जीवनांतील समाधान आणि कल्याण भावना त्यांत परिपूर्ण रीतीनें प्रतिबिंबित झाली आहे. सामान्य माणसावर सौंदर्याचा जो प्रभाव पडतो त्यापेक्षां अधिक प्रभाव पडलेल्या

माणसाचें हें लिखाण आहे. तो जेव्हां आपल्या प्रियतम निर्झरांचें वर्णन करूं लागतो तेव्हां तें अप्रतिम उतरतें. " हळूहळू खेड्यांतील कुजबुज शमत जाते आणि आपण जणुं आपल्या स्वप्नांतलि प्रवाहांवर स्वार होतो. प्रातःकाळच्या किंवा सायंकाळच्या टवटवीत अशा विचारांच्या गुदगुल्यांनीं आपण जागे व्हावें त्याप्रमाणें आपण भूतकाळाकडून भविष्यकाळाकडे अलगत तरंगत जातो. आमची बोट आवाज न करतां प्रवाहाच्या दिशेनें खालीं जाऊं लागते. अधून-मधून लहान मोठ्या माशांना आम्ही त्यांच्या छपून राहाण्याच्या जागांतून हुसकून काढीत होतों. किनाऱ्यावरील आपल्या एकांत निवासस्थानांतून निघून छोटे बगळे आपल्या सुस्त पंखांवर अलगद उडतांना दिसत होते. किंवा आमच्या होडीची खळबळ ऐकून किनाऱ्यावरच्या उंच गवताडींतून एखादा बगळा चटकन् वर येऊन आपली दौलत असलेलें पाय उचलून दुसऱ्या एखाद्या सुरक्षित स्थळीं नेऊन ठेवीत होता. वाळुंजीच्या झुडपांतून आमची बोट खळबळ करीत पुढें सरकूं लागली कीं कासवें पटकन पाण्यांत डुबी मारीत आणि पाण्यावर पडलेलीं झाडांचीं प्रतिबिंबें त्यामुळें छिन्नभिन्न होत. किनाऱ्यांच्या सौंदर्याचा सूर्य अस्ताचलाकडे निघालेला होता आणि कांहीं तजेलदार फुलें आपल्या कोमेजल्या रंगांनीं असें दाखवीत होतीं कीं ऋतुमान आतां मध्यान्हीकडे झुकलें आहे. नदी-फुलांत राणीसारखी शोभणारीं पांढऱ्या लिलीचीं फुलें आम्हांला गवसलीं नाहींत. त्या हंगामापुरतें त्यांचें राज्य संपुष्टांत आलें होतें. पाण-घड्याळावर विसंबल्यामुळें त्याला फार विलंब होतो आणि त्याचा हा प्रवास फार उशीरा सुरू झालेला असतो. असें कित्येक प्रकार आमच्या कॉंकॉर्डच्या पाण्यांत वस्तीला असतात. उन्हाळ्यांत सूर्य उगवण्यापूर्वीं मी नदींतून बराच खालीं गेलेलों आहे. त्यावेळीं लिलीचीं फुलें निद्रादेवीच्या कुशींत विसावलेलीं असतात. नंतर सूर्याची तिरीप किनाऱ्यावरून पाण्याच्या पृष्ठभागावर उतरते तेव्हां एकदम पांढरा फुलोरा माझ्यासमोर पसरलेला दिसतो. सूर्यकिरणांबाबत हें फूल मोठें संवेदनशील असतें. एखादा झेंडा खुलावा तसें हें सगळें माझ्या डोळ्यांपुढें खुलत जातें आणि माझा प्रवास सुरू असतो. "

पुस्तकाचा पिंड हा मूलतः अगदीं शांत–सौम्य असला तरी कांहीं वेळां त्यांत उतावीळपणाहि जाणवतो. वाल्डेनमधील कित्येक परिच्छेदांत जी धारदार

शैली आढळते त्याचा जणुं इसारच अशा ठिकाणीं मिळतो. त्याला जंगलांतील सर्व जीवनाबद्दल एक प्रकारची उत्कंठा होती. वाल्डेनमध्यें त्याची ही उत्कंठा पदोपदीं दिसून येते. जेव्हां परंपरागत धर्म आणि नीतिविषयक कल्पना त्याच्या व्यक्तित्वाला आणि विचार-स्वातंत्र्याला आव्हान देऊं लागल्या त्यावेळीं त्याच्या मुक्त जीवनाबद्दलच्या ह्या उत्कंठेमुळेंच तो त्यांना पुरून उरला. हिब्रू देवतांकडून थोरो निसर्गउपासनेकडे वळला होता. त्याला वाल्डेनच्या जंगलांत त्यांचें अधिराज्य आढळलें होतें. "तेंच धर्मगुरूसदृश ऐश्वर्य, तसाच तुकतुकीत चेहरा, ती रुळणारी दाढी, केसाळ शरीर, तसाच तोंडांतला तो पाईप आणि तीच अक्कड!" पाश्चिमात्य विचारसरणींत जी खोली आणि जें द्रष्टेपण अभावानें आहे तें भारतीय विचारसरणींत आहे, असें त्याला आढळून आलें आणि त्यामुळें निसर्ग उपासनेबरोबरच तो भारतीय तत्त्वज्ञानाचाहि मोठा उपासक बनला. "भगवत्-गीतेच्या भव्य आणि सृष्टीउत्पत्तीविषयक तत्त्वज्ञानाशीं तुलना करतां आपला शेक्सपिअर देखील अनेक वेळां अगदीं अर्धवट कच्चा बच्चा आणि व्यावहारिक पातळीवरचा वाटतो." औपचारिकता, अधिकारवाद आणि रूढि यांना त्यानें इमर्सनप्रमाणेंच लाथाडलें होतें. "आपल्या पूर्वजांच्या मृत प्रतीकांची" पूजा चर्च करीत असल्यानें इमर्सननें त्याचा त्याग केला होता. वृद्धापकाळ झालेल्या संपन्न ख्रिश्चन धर्मापेक्षां त्याला सॉक्रेटीसप्रणीत मूर्तिपूजादेखील अधिक चांगली वाटत होती. थोरोनें लिहून ठेवलें आहेः "एखाद्या रविवारीं मला तुमच्या पीठावरून प्रवचन करूं द्या असें जर मिडलसेक्समधल्या एखाद्या धर्मगुरूला मीं सुचवलें तर तो मला संमति देणार नाहीं, कारण मी त्याच्या-सारखी प्रार्थना करीत नाहीं किंवा मी त्याच्यासारखी दीक्षाहि घेतलेली नाहीं. हा सगळा काय फालतूपणा सूर्यातळीं चाललेला आहे!"

१८४८ सालीं इमर्सनच्या घरीं रहात असतांना, ह्याच तीव्र बंडखोर मनः-स्थितींत त्यानें सविनय कायदेभंगासंबंधींचें प्रसिद्ध आणि प्रक्षोभक असें पहिलें-वहिलें लिखाण केलें. महात्मा गांधींना त्यापासूनच स्फूर्ति मिळाली असल्यानें हिंदुस्थानांतील व जगभरच्या इतर ठिकाणच्याहि सविनय अवज्ञा आंदो-लनांचें तें उगमस्थान आहे, असा रास्त दावा केला जाऊं शकेल. 'कॉन्कॉर्ड लायसियम' ह्या संस्थेपुढें 'व्यक्तिमात्राचे सरकारच्या संदर्भातील हक्क आणि

कर्तव्यें ' या विषयावर त्यानें जें एक भाषण दिलें त्या स्वरूपांत हे विचार प्रथम प्रकट झाले. ' एस्थेटिक पेपर्स ' या अज्ञेयवाद्यांच्या सूचिग्रंथांत एलिझाबेथ पीबडीनें त्यांतील वार्ताशीलतेमुळें हें भाषण १८४९ च्या मे महिन्यांत प्रसिद्ध केलें. ' सिव्हिल डिसओबिडियन्स ' या नांवानें आतां तें जगभर प्रसिद्ध आहे आणि ज्यांना ज्यांना दंडाचा प्रतिकार दंडेतर साधनांनीं व्हावा असें वाटतें त्यांच्या वाचनांत अद्यापहि त्याचें भाषण असल्याचें आढळतें आणि त्यांतील अवतरणेंहि दिलीं जातात.

' वाल्डेन ' मध्यें थोरोनें एक हकीगत दिली आहे. उन्हाळ्यामधली एक संध्याकाळ. कॉंकॉर्डच्या तळ्यावरून तो परतत होता. तो आपले जोडे दुरुस्त करण्यासाठीं रस्त्यांत उभा होता. इतक्यांत त्यानें डोईपट्टी भरली नसल्याच्या सबबीवर त्याला अटक करून त्या खेड्यांतल्या तुरुंगांत नेऊन डांबण्यांत आलें ! त्याला एक रात्र जेलच्या कोठडींत काढावी लागली. दुसऱ्या दिवशीं न्याहारीनंतर त्याची सुटका करण्यांत आली. कोणी तरी, बहुधा त्याच्या कुटुंबांतल्याच, त्याच्यावतीनें डोईपट्टी भरली होती आणि त्यामुळें थोरो फार संतप्त झाला होता. तसें पाहिलें तर ही घटना अगदीं मामुली, पण थोरोच्या विचारांना तीमुळें चालना मिळाली. अशा तऱ्हेच्या किरकोळ वाटणाऱ्या घटनांच्या बुडाशीं असणारीं तत्त्वें आणि त्यांचे संभाव्य परिणाम यांचाहि विचार करणारें असें त्याचें मन होतें. तो एकटा राहत असल्यानें त्याचे व समाजाचे जे संबंध, त्यांच्याविषयीं त्यानें सखोल असें चिंतन दीर्घकाळ केलें होतें. परंतु समाजानें त्याची प्रत्यक्ष मानगूट पकडून जेलची कोठडी दाखवीपर्यंत सरकार व्यक्तीवर केवढा जोरा सत्तेच्या बळा-वर चालवते, त्याची त्याला परिपूर्ण कल्पना येऊं शकली नाहीं. आपल्या कल्पना स्पष्ट आणि पक्क्या करणें त्याला या निमित्तानें भाग पडलें.

रस्ते बांधणें किंवा शिक्षण देणें अशा समाजोपयोगी कार्यांसाठीं पट्टी द्यायला त्याची हरकत नव्हती. परंतु दडपशाही आणि साम्राज्यविस्तार यासाठीं बस-वल्या जाणाऱ्या डोईपट्टीला तो आणि त्याच्याचसारखे जे इतर उदार मतवादी लोक होते त्यांचा विरोध होता. गुलामगिरी जरी दक्षिणेकडील राज्यांपुरतीच

मर्यादित असली तरी मॅसाच्युसेट्स आणि इतर उत्तरेकडील राज्यें यांच्यासाठीं एक विलक्षण कायदा केलेला होता. एखाद्या फरारी गुलामाला आश्रय देऊन त्याला कॅनडाकडे पळून जाण्यास मदत करणाराला या कायद्यान्वयें कठोर सजा ठोठावण्याची सोय करून ठेवलेली होती. या कायद्यान्वयें असे गुलाम हातीं लागले तर त्यांना दक्षिणेकडील राज्यांतील त्यांच्या मालकांच्या सुपूर्द करण्याची सक्ति होती. उत्तरेकडील संस्थानांत गुलामगिरी विरुद्धची चळवळ फोफावत होती! सर्व प्रकारच्या सुधारणांचा पोटतिडिकेनें पुरस्कार करणारीं वरींच कुटुंबें तिकडे होतीं आणि थोरो कुटुंब हें त्यांतलेंच एक कुटुंब होतें. १८४३ सालीं डोईपट्टी भरण्याचें नाकारून अलकॉटनें तुरुंगवास पत्करला होता. आणि त्याच्या ह्या उदाहरणानें थोरोसह अनेकांना प्रोत्साहन मिळालें होतें. ह्या बंडखोर मंडळींचा गुलामगिरीला विरोध असल्यानें,मेक्सिकोशीं झालेल्या युद्धांत अमेरिकन सरकारची जी साम्राज्यवादी विस्ताराची आकांक्षा दिसून आली तिचाहि त्यांना तिरस्कार वाटत होता. सामान्यतः सर्वच सरकारें सारखींच असतात, त्यांत फारसें उजवें-डावें करतां येणें अवघड आहे, असें त्यांचें मत होतें. अन्यायी सरकार आणि व्यक्तीची सदसद्विवेक बुद्धि यांच्यांत जेव्हां संघर्ष उद्‌भवतो तेव्हां व्यक्तीची सदसद्विवेक बुद्धि हींच वरचढ ठरली पाहिजे आणि या संदर्भात थोरो गुलामगिरी, सैन्य, युद्ध, सरकार, राजकारणी आणि मतदार या सर्वांना नाना बोल लावतो.

त्यानें लिहिलें आहे : "कायद्याबाबत आपल्या मनांत अनावश्यक आदरबुद्धि असण्याचा परिणाम असा कीं आपल्या मनाविरुद्ध, नव्हे आपलें व्यवहारज्ञान आणि सदसद्विवेक अव्हेरून, माणसें सैन्यदलांतील तुकडींतून, सैन्याधिकारी म्हणून, खासगी व्यक्ति म्हणून खुशाल टेकड्या आणि मैदानें तुडवीत कूच करीत असतात! ...हे कोण असतात? तीं काय माणसें म्हणायचीं? कीं एखाद्या उलट्या काळजाच्या सत्ताधाऱ्याची सेवा बजावणारे ते छोटे किल्ले आणि तोफखाने आहेत?"...आणि सदसद्विवेक बुद्धि आणि सरकार यांच्यांत पुन्हा केव्हां झगडा उभा राहील आणि सरकारपुढें लोटांगण घालावें लागेल याचा कांहींच भरंवसा नसल्यानें, तो असा सल्ला देतो. : "तुम्ही स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनलें पाहिजे. आणि सतत कंबर

बांधून सिद्ध असलें पाहिजे. " लाजाळूच्या झाडाच्या पानांना नुसता हात लागतांच तीं पानें जशीं मिटतात तशाच तऱ्हेची प्रतिक्रिया अन्याय्य कायद्यांबाबत थोरोची असे. " मी कांहीं दुसऱ्यांची ताबेदारी करण्यासाठीं जन्माला आलों नाहीं...मी माझ्या पद्धतीनें श्वासोश्वास करीन. जर एखाद्या वनस्पतीला आपल्या रीतीनें जगतां येणें शक्य नसेल तर ती मरून जातें. माणसाचेंहि तसेंच आहे. " त्याच्या ह्या शब्दांत त्याच्या सविनय कायदेभंगाच्या निबंधाचें सारें मर्म आहे. या ठिकाणीं विवादपटु थोरोनें उच्चांक गांठला आहे. यांत ना उपदेश आहे, ना नाटकीपणा, ना गर्जना आहेत. कळपांतल्या मेंढयांचें मेंढपाळ नियंत्रण करतो तशाच रीतीनें कवडीं किंमतीच्या माणसांना समाज आपलें नियंत्रण करूं देतो, याविरुद्ध त्याचें हें बोलणें म्हणजे एक कौल आहे.

' अ वीक ऑन कॉंकॉर्ड ' आणि ' सिव्हिल डिसओबिडियन्स ' हीं त्याचीं पुस्तकें १८४९ च्या मे महिन्यांत प्रकाशित झालीं. याच महिन्यांत त्याची वडील बहीण हेलेन ही वयाच्या छत्तीसाव्या वर्षीं क्षयानें वारली. थोरोवर तिची भक्ति होती आणि हॉर्वर्डला असतांना त्याचा खर्च भागवायला ती हातभार लावीत असे. मॅसॅच्युसेट्समधील वॉरसेस्टरच्या हॅरीसन ब्लेक याच्याशीं त्याची मैत्री जमली तीहि याच वर्षी. उरलेल्या आयुष्यांत हॅरिसनशीं त्याचा अफाट पत्रव्यवहार झालेला आहे. केप कॉडवर त्यानें ज्या चार चढाया केल्या त्यांतली पहिली चढाई त्यानें एलेरी चॅनिंगबरोबर याच काळांत केली. केपकॉडच्या जंगलानें त्याला रोमांचित केलें. त्यानें लेखकाच्या डोळ्यांनीं त्याचा अभ्यास केला. त्याचें दुसरें पुस्तक ' वाल्डेन ' हें नंतर प्रसिद्ध होणार असल्याची जाहिरात ' अ वीक ऑन द कॉंकॉर्ड ' च्या प्रकाशकांनीं केली होती. त्या पुस्तकावर अखेरचा हात फिरवण्याचें त्याचें काम याच वेळीं सुरू होतें. !

परंतु यशस्वी लेखक होण्याची त्याची आशा ही उडवली जाणार होती. यानंतर पांच वर्षांचा हालअपेष्टांचा कालखंड आला. या काळांत त्याच्या प्रकाशकांनीं ( ' नामधारी ' अशी त्यानें त्यांना पदवी दिली आहे ) ' वाल्डेन ' प्रकाशित करण्याबाबत सारखी अळंटळं केली आणि शेवटीं तें प्रकाशित केलेंच नाहीं ! वाल्डेन सोडल्यानंतर त्याच्या अंतःकरणांत जो

उत्साह संचारला होता तो आतां वैफल्याच्या आळीनें हळूहळू कुरतडून खाण्यास सुरवात केली. आणि शेवटीं त्याला आंतूनच खचल्यासारखें वाटूं लागलें. १८५१ सालीं तो आपल्या दैनंदिनींत लिहितो.: "मी आतां चौतीस वर्षांचा झालों, परंतु माझ्या जीवनाचा अद्याप जवळजवळ कांहींच विस्तार होऊं शकलेला नाहीं." स्वतःबद्दलच्या संशयानें कांहीं क्षण तो ग्रस्त होई आणि अशा क्षणीं त्याला आपल्या अंतःकरणाची मलीनता खायला उठे. मग त्याची नजर आपल्या बाळपणाकडे वळे. "त्या काळीं" तो म्हणतो, "मी खराखुरा जिवंत होतों आणि माझ्या शरीराच्या अंगप्रत्यंगांतून समाधान नुसतें ओसंडून वाहत होतें." पण आतां त्याची तब्येतहि बरी नव्हती. त्याच्या छातीला थंडी पटकन बाधत असे. कधीं तो परमानंदांत उड्डाणें घेत असे तर कधीं अगदीं खचलेला दिसे. त्याच्यासारख्या प्रतिभावान् कलावंतांच्या बाबतींत असें पुष्कळच वेळां घडतें.

१८५२ सालीं त्याच्यावर आलेली निराशेची घनदाट सांवली नाहींशी झाली आणि अंतःपरीक्षणाची वृत्तीहि कांहींशीं ओसरली. पुन्हा अन्याया-विरुद्ध तो झुंज घेऊं लागला. मित्रांबद्दलचा सारा दुरावा मावळला. लेखन-कार्य जोमानें सुरू झालें आणि कॉंकॉर्डच्या ग्रामीण परिसरांत तो ज्या आनंदांत होता तो त्याच्या वाट्याला जणुं पुन्हा आला. "आणि आतां माझ्या दुपारच्या फिरण्यासाठीं बाग आहे...मैलांमागून मैल मी हिंडणें-फिरणें करूं शकत होतों. कुठल्याहि धनिकाला बरोबरी करतां येऊं नये असें हें स्थळ...प्राणी मुक्तपणें तेथें संचार करीत. आपलें नैसर्गिक जीवन त्यांना तेथें लाभत होतें. जमीन विविध प्रकारची आणि पाण्याचा तोटा नाहीं. आणि ही जागा अशी एकांत कीं तिथल्या मक्याच्या पिकांत कोणीहि प्रवासी चुकूनच कधीं आढळला तर आढळायचा."

थोरो आतां पसातिशींत पोंचला होता. दहापंधरा वर्षें तो निसर्गाकडे पाहात होता, त्यापेक्षां अधिक शास्त्रशुद्ध दृष्टीनें तो आतां निसर्गाचें अवलोकन करीत होता. कॉंकॉर्डच्या परिसरांतील वनस्पतींची जमवाजमव करण्यासाठीं तो मेहनतहि खूप घेत होता. स्वतःला वनस्पतिशास्त्रज्ञ तो म्हणवून घेत होता, तरीहि त्याचें अंतःकरण हें कवीचें आणि कांहींसें आध्यात्मिकच होतें. निसर्गाच्या सार्वत्रिक नियमांचें आकलन होणारे साक्षात्काराचे क्षण हा

त्याच्या आयुष्यांतील एक ठेवा होता. शास्त्रसंतोषासाठीं एखाद्या वस्तूचें वर्णन करण्यापेक्षां त्यांतील सौंदर्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठीं तिचें वर्णन करण्यांत त्याला अधिक आनंद वाटे. न्यू इंग्लंडमधील रूप, नाद, गंध यामुळें त्याच्यांतील सर्जनशीलता संवेदनेच्या कळसास पोंचे. १८५२ च्या जुलैमध्यें आपल्या इंद्रियांना जाणवणाऱ्या विविध सौंदर्यांचा आपल्याला निकोप कैफ चढावा, अशी मनीषा तो व्यक्त करतो. " ह्या बोरांचा हा घमघमाट किंवा गाईचा फुटूं पाहणारा पान्हा, रात्र पडण्यापूर्वी थंड झालेल्या पर्वतराजीवरून प्रतिध्वनित झाल्यासारखे वाटणारे त्यांचे आवाज, दवानें सगळी हवा सुगंधित झालेली. अनंत असा जोम तेथें जाणवतो. सारें कसें निरभ्र, निष्कलंक असतें. आणि तेजस्वी अशा चिरप्रातःकाळची प्रतीक्षा जाणवते... " एका झऱ्याच्या प्रवाहाबरोबर चालत गेल्यानंतर तो लिहितो, " आतां तुमचे तळवे खालच्या मुलायम रेतीवर विसावतात. मग मध्येंच एखादी गारगोटी टोचली कीं भीतीनें एकदम आकसतात. मग गुदगुल्या करणाऱ्या गाऱ्यांत ते उतरतात. त्याचा तो मऊ, स्निग्ध स्पर्श ! मग गादीवर तुम्ही येता. तुमच्या चाहुलीनें उन्हाच्या तिरीपीपासून बचाव करण्यासाठीं जे मासे त्या झाडोऱ्यांत लपलेले असतात ते दचकून सुळकन बाहेर झेपावतात, नाहीं तर एखादें कासव संथगतीनें वरच्या बाजूला जातांना आढळतें....किनाऱ्याजवळच्या उथळ पाण्यांत आपण आलों कीं किनाऱ्याकडून ओघळणाऱ्या झऱ्याच्या पाण्याची सळसळ त्याच्या गार स्पर्शानें ध्यानीं येतें. तहान लागली असेल तर तुम्ही किनाऱ्यावरच्या वाळूंत एक झरा आपल्या हातानें खोदता आणि मग आपण परत येईपर्यंत तें पाणी निवळून नितळ झालेलें असतें. त्या थंड पाण्याचा एक घोट मग तुम्ही घेऊन तृप्त होता. "

थोरोला कधीं मनस्ताप येऊन घेरी. कधीं आपल्या अंतरंगांतील सुष्टदुष्ट प्रवृत्तींच्या तुमुळ संग्रामाची जाण येई. परंतु असे कांहीं क्षण सोडले तर त्याची जीवितयात्रा पुष्कळच सुखानें चालली होती. आपला दुपारचा वेळ तो समाजाला विकीत नव्हता कीं कधीं विकणार नव्हता. निवांतपणें निसर्गाचें अवलोकन करतां यावें म्हणून तो आपल्या आयुष्यांतला वाटेल तेवढा काळ द्यायला तयार होता. आपल्या टिपणांचा मेळ घालण्याच्या त्याच्या रोजच्या

प्रयत्नांतून त्याच्या व्याख्यानांचीं सुंदर सणंगें विणलीं जात होतीं. कॉंकॉर्डमध्यें किंवा क्लिंटन, वॉरसेस्टर, मेडफोर्ड, लिंकोलन, प्लायमाउथ अशा नगरांत आणि खेड्यांत त्याचीं हीं व्याख्यानें होत. यांपैकीं पुष्कळशा व्याख्यानांतून तो आपण या परिसरांत घालवलेल्या मुद्दयांचीहि माहिती सांगत असे. वयाच्या पंचवीस ते पसतीस या दशकांत त्यानें कॉंकॉर्डच्या पश्चिमेला असलेल्या वॉशुसेट, हूसॅक आणि कॅट्स्किल टेकड्या, मायने आणि माउंट कॅटाहडिन हीं जंगलें, केप कॉड आणि कॅनडा या भागांत त्यानें कितीतरी फेऱ्या संशोधनासाठीं केल्या. ह्या व्याख्यानांतून स्फुरलेले कित्येक निबंध ग्रॅहॅम्स, पुटनम्स मंथली, द युनियन, अशा नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. भटकंतीसंबंधीं लिहिणारा व जीवन आणि साहित्य यासंबंधीं कल्पकता असणारा म्हणून तो विख्यात होऊं लागला. वैज्ञानिकांच्या छोट्या मंडळांतहि निसर्गवेत्ता म्हणून त्याला मान्यता मिळूं लागली. अमेरिकेंतील वन्य पशु-जीवनाची वर्गवारी करण्यासाठीं युरोपमधून हॉर्वर्डला आलेले थोर शास्त्रज्ञ लुई आगासिझ यांना वाल्डेनला असतांना तो भेटला होता. आगासिझ म्हणत असे, “ लोक घरांत बसून निसर्गाचा अभ्यास करतात आणि घराबाहेर पडलें म्हणजे त्यांना तो गवसत नाहीं ! ” पण थोरोचा स्वतंत्र बाणा पाहून त्याच्या मनांत थोरोबद्दल आदराची भावना निर्माण झाली. थोरोनें जमवलेले माशांचे आणि कासवांचे विविध नमुने त्यांना दिले तेव्हां ते प्रसन्न झाले. १८५० मध्यें बोस्टनच्या निसर्गविज्ञान मंडळाचा सभासद म्हणून थोरोची निवड झाली आणि नंतर तीन वर्षांनीं ‘ अमेरिकन असोसिएशन फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स ’ ह्या वैज्ञानिकांच्या संस्थेचें सभासदत्वहि त्याला देण्यांत आलें.

• • •

# ७

*" कांहीं वर्षें मी फुलांच्या सहवासांत घालवलीं, विशेषतः उमलत्या फुलांचें अवलोकन करण्यासारखे दुसरें कोणतेंच मन भुलवणारें काम मला नव्हतें. "*

**— थोरोची दैनंदिनी**

१८५६ सालचें त्याचें एक ढोबळ पद्धतीचें छायाचित्र उपलब्ध आहे. त्याच्या ऐन कर्तबगारीच्या काळांतलें तें चित्र. १८५५ सालाच्या आजारांत अशक्तपणामुळें त्याचे अवयव सुकल्यानंतरच्या काळांतलें तें असलें तरी तेंच त्याच्या देहयष्टीची योग्य कल्पना देणारें चित्र म्हणावें लागेल. त्याच्या एका बाजूनें घेतलेल्या छायाचित्रांत तो दिसे त्यापेक्षां अधिक प्रभावी असें त्याचें व्यक्तिमत्त्व होतें, असें त्याच्या मित्रांना वाटे. आमोरासमोरून पाहिलें म्हणजे त्याच्या डोळ्यांत भरणाऱ्या काळ्या भुवयांखालचे त्याचे निळे भुरे भेदक डोळे प्रभाव पाडीत. बाजूनें घेतलेल्या छायाचित्रांत त्याचें गरुड छाप नाक आणखीनच लांबोडें दिसे. त्याची हनुवटी पुरेशी भव्य आणि अढळ नसावीसें वाटे. त्याच्या दिसण्याबद्दल अगदीं दोन टोकांचीं मतें व्यक्त झालेलीं आढळतात. कांहींच्या मतें तो अगदीं कुरूप होता, तर पुष्कळांच्या मतें त्याचा नितळ चेहरा, विचारी आणि निश्चयी मुद्रा यामुळें सगळी भरपाई होऊन जाई आणि त्याच्यामधून ओसंडणारें चैतन्य पाहाणाऱ्याच्या मनावर छाप पाडी. तो जरासा ठेंगणाठुसका आणि लहानखुराच दिसे. चौतिसाव्या वर्षी त्याचें वजन १२७ पौंड होतें. उघड्यावर काम करणाऱ्यांच्या मानानें त्याचें शरीर दुबळें वाटत असलें तरी त्याला काम करतांना पाहिलें कीं त्याचा प्रभाव पडल्यावांचून राहत नसे. डुलतडुलत चालण्याची त्याची ढब आणि आत्मविश्वास दाखवणाऱ्या त्याच्या वळलेल्या मुठी पाहिल्या कीं तो होता त्यापेक्षां अधिक बळकट वाटे. निसर्गसंशोधनासाठीं बाहेर पडतांनाचें त्याचें हें रूप असे. पण तें कांहींहि असलें तरी त्याचें शरीर कधींच चांगलें धडधाकट म्हणण्यासारखें नव्हतें.

एलेरी चॅनिंगनें त्याचें केलेलें वर्णन हें थोरोचें सर्वोत्कृष्ट शब्दचित्र आहे. त्याचा मित्र एफ्. बी. सॅनबोर्न याच्या म्हणण्याप्रमाणें तर त्याच्याइतकें तंतोतंत चित्र दुसऱ्या कोणी रेखाटलेलें नाहीं. तो म्हणतो, " त्याचे सारे अवयव रेखीव होते. त्याचें गरुड नाक थेट रोमनांशीं जुळणारें वाटे. सिझरच्या चित्रांतल्यासारखें तें दिसें.......त्याचें कपाळ विशेष भव्य नव्हतें, पण शक्तीनें आणि निश्चयी वाण्यानें तें गच्च भरल्यासारखें वाटे. त्याच्या उठावदार ओठांनीं चेहरा वेगळा उठून दिसे. विचारांत गढून गेल्या-सारख्या आठ्या त्याच्या कपाळावर पडलेल्या दिसत.......जणुं त्याच्यापाशीं वायां घालवायला एक पळहि वेळ नसावा असा त्याचा चेहरा दिसे. सक्रिय प्रांजळपणाचा जणुं मूर्तिमंत पुतळा तो होता......." थोरोचा इंग्लिश चरित्रकार हेनरी सॉल्ट यानें त्याच्यासंबंधीं लिहिलेलें अगदीं नेमकें आहे असें वाटतें. त्याची सुदीर्घ चिकाटी, त्याचे ते लांब लांबचे अवघड प्रवास, तें बर्फावरून घसरणें, झाडावर चढणें आणि झाडें तोडणें, त्याचे पर्वतारोहण आणि घनदाट बर्फांतून फिरणें पाहिलें म्हणजे हें " त्याच्या शरीरापेक्षां त्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचें फळ वाटतें. ध्येयवादी माणसें आपलें शरीर नेहमीं आपल्या मनाच्या उमेदी बरहुकूम वाकवीत असतात. थोरो हाहि त्यांतलाच." ह्या आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ सॉल्ट डॉ. इ. डब्ल्यू इमर्सनचें अवतरण देतो. " त्याला जन्मतः मिळालेलें शरीर हें फारच किरकोळ होतें. त्याच्याइतके पडलेले खांदे आणि निरुंद छाती असलेला मनुष्य माझ्या पाहण्यांत दुसरा नाहीं. पण असें असूनहि त्या शरीराकडून जेवढें म्हणून वसूल करण्यासारखें तेवढें सगळें त्यानें केलें. "

थोरोला भेटण्यापूर्वींच ज्यांनीं त्याचें साहित्य वाचलें होतें त्यांची पुष्कळदां निराशा होई, कारण त्यांच्या अपेक्षेइतका तो दिसायला धष्टपुष्ट आणि निसर्गसान्निध्यांत राहणाऱ्या माणसासारखा पोलादी वाटत नसे. डॅनियल रिकेटसन हा त्याच्या अखेरच्या काळांतला एक थोर स्नेही. थोरो त्याच्या भेटीला प्रथम आला, त्याचें तो वर्णन करतो, " थोरो माझ्याजवळ येऊन उभा राहिला आणि म्हणाला, 'तुम्ही मला ओळखत नाहीं.' ह्या वाक्या-सरशी माझ्या मनांत कल्पना चमकून गेली कीं ज्याच्याशीं आपला पत्र-व्यवहार झाला ती हीच व्यक्ति ! माझ्या कल्पनेतला थोरो हा हाडापेरानें

चांगला मजबूत आणि थोराड होता. पण प्रत्यक्ष समोर उभा असलेला आसामी अगदींच किरकोळ दिसणारा होता......त्याचें तें रूप पाहून माझी जी निराशा झाली ती टेबलाशीं बसून आणि संध्याकाळीं त्याच्याशीं जी चर्चा झाली त्यामुळें कुठल्या कुठें पळाली. नंतरच्या काळांत त्याचें थोर समर्थ मन, त्याच्याशीं होणाऱ्या गंभीर चर्चा आणि त्याची विविध विषयांतील पारंगतता यांच्याशीं त्याचें व्यक्तिमत्त्व मला कधीं विसंवादी भासलें नाहीं."

हें शब्दचित्र थोरोनें स्वतःच्या 'जातीचें' जें वर्णन केलें आहे त्यानें पूर्ण होऊं शकेल. "ज्याची नजर पूर्वेपेक्षां पश्चिमेकडे अधिक वळते...घरांत शिरण्यापेक्षां घराबाहेर पडतांना ज्याचा चेहरा अधिक उजळून निघतो... ज्याला हिंवाळा आवडतो तितकाच उन्हाळाहि...ज्याला जंगलाचें प्रेम आहे आणि शेताचेंहि...ज्याला काळोखाबद्दल प्रेम वाटतें तसेंच उजेडाबद्दलहि... ज्याला समाजापेक्षां एकांत अधिक आवडतो, जो भटक्या नाहीं किंवा भूमिगत नाहीं...कोणत्याहि हंगामांत ज्याला बहर येतो...ज्याला घंटा बडवून जाग आणावी लागत नाहीं, तर कॉंकॉर्डच्या जंगलांतील पाइनच्या झाडावर बसणाऱ्या हलक्याशा धक्क्यानें जो दिवसा आणि रात्रींहि जागतो."

एका मंडळापुढें भाषण करून एका रात्रीं थोरो जो परतला तो अगदीं उदास होऊन. बहुधा भाषण आटोपल्यावर त्याची मनःस्थिति अशीच होई. पुढच्या पिढ्यांच्या सुदैवानें, त्याच्या सर्व मनःस्थितींत त्याचा एकच विश्वासू सोबती होता आणि तो म्हणजे त्याची दैनंदिनी. आपल्या साऱ्या भावभावना विकारवशतेचा पूर आल्यासारख्या तो त्यांत वाहूं देत असे आणि त्यामुळेंच त्याला जरा बरें वाटे. ह्या प्रसंगीं त्यानें लिहिलें, "श्रोत्यांना खूश करण्याच्या लोभांत आणि यशस्वी वक्ता ठरण्याच्या मोहांत मी स्वतःला अगदींच खालच्या पातळीवर आणतो कीं काय, अशी भीति ह्या हिंवाळ्यां-तलीं दोन भाषणें दिल्यानंतर सतावूं लागली आहे. मी जो कांहीं आहे किंवा माझें जें वैशिष्ट्य आहे तें समजण्याची पात्रता माझ्या श्रोत्यांत नसल्याचें पाहून मला निराशा वाटते." कुठल्याहि प्रकारची तडजोड जीवनांत न पत्करणाऱ्या थोरोनें लोकप्रिय वक्ता होण्याच्या भरीला पडावें आणि आपलें भाषण श्रोत्यांना आवडावें म्हणून त्यांत साखरपेरणी करावी अशी अपेक्षा

करण्याचें धैर्य श्रोतृवृंदाला होतें तरी कसें? इमर्सन हा एक जातिवंत आणि प्रभावशाली वक्ता म्हणून प्रख्यात होता. त्याच्याशीं श्रोते आणि स्वतः थोरो आपली तुलना करी आणि मग आपलीं भाषणें त्याच्याइतकीं सरस उतरत नाहींत असें त्याला वाटे. परंतु तरीहि त्याला भाषणाला लोक बोलवीत होते आणि तोहि जात होता. अज्ञेयवादासारख्या अति गहन विषयावर व्याख्यान देतांना सर्वसामान्य श्रोत्यांनादेखील इमर्सन आपल्या भाषणशैलीनें आणि व्यक्तिमत्त्वानें झुलत ठेवी. थोरोमध्यें उत्तम वक्तृत्वाला लागणारे गुण इमर्सन-इतके नव्हते तरीहि तो अवघड विषयांवर बोलण्याचे प्रयोग करीत होता. जीवन आणि निसर्ग यांच्याविषयींचें आपलें भावदर्शन श्रोत्यांपर्यंत पोंचवणें हें कांहीं साधेंसुधें काम नाहीं. "सरमिसळ श्रोतृवृंदासमोर, ते बिचारे व्याख्यानाला आले आहेत म्हणून, त्यांना अपरिचित असलेले पण आपल्याला परम समाधान प्राप्त करून देणारे विचार वाचून दाखवणें" हें मोठें बिकट कार्य त्याला वाटे.

पण तो जें सांगत होता तें अभिनव होतें आणि त्यामुळें श्रोत्यांना तें ऐकावेसें वाटे. त्यामुळेंच कॉंकॉर्ड आणि वॉरसेस्टर येथील मंडळें त्याला कित्येक वर्षें नियमानें व्याख्यानासाठीं पाचारण करीत होतीं. इतर नगरांचीं आणि खेड्यांचींहि निमंत्रणें त्याला वरचेवर येत. कांहीं वेळां त्याचीं भाषणें वाहवतहि जात. केप कॉडवरील आपल्या स्वारीचें विनोदप्रचुर शैलींत तो वर्णन करूं लागला कीं श्रोत्यांना हंसतां पुरेवाट होई. शेवटीं हंसून हंसून रडायची पाळी येई. रानफळासारख्या विषयावर निसर्गविज्ञानाच्या दृष्टि-कोनांतून त्यानें दिलेलीं भाषणें लोकांच्या चांगलींच पसंतीस उतरलीं. त्याच्या आवाजांत संगीताचा गोडवा होता, पण त्याचा त्याला योजकतेनें उपयोग करतां आला नाहीं. श्रोत्यांना उद्देशून भाषण करण्याऐवजीं आपल्या टिपणांच्या वहींत डोकें खुपसून बोलण्याची त्याला सवय होती.

जन्मभर व्याख्यानें देऊनसुद्धां त्याला त्यांतून फारशी आर्थिक प्राप्ति कधीं झाली नाहीं. इमर्सनसारख्यांना व्याख्यानांतून गडगंज पैसा मिळे ही गोष्ट खरी, पण त्यांचीं व्याख्यानें खेडोपाडींच्या मंडळांत होत नसत. खेड्यांत व्याख्यानाला गेलें कीं कधीं फार तर चार दोन डॉलर्स मिळतहि, नाहीं असें नाहीं; परंतु बहुधा व्याख्यानें मोफतच देण्याचीं पाळी येई. या

मंडळांपुढें व्याख्यानें देण्याचें कारण एकतर शिक्षणाची भूक असलेला हुकमी श्रोतृवृंद तेथें मिळे आणि दुसरें आपल्या कल्पनांचा आविष्कार करण्याची संधि उपलब्ध होई. 'लायसीयम' चळवळ जरी तेव्हां नुकतीच सुरू झाली असली तरी न्यू इंग्लंडच्या बौद्धिक जीवनांतील ती एक मोठी शक्ति होती आणि ज्याला ज्याला म्हणून थोडीबहुत नव कल्पनांबद्दल आस्था होती त्या त्या लोकांनीं त्या चळवळीला आपला पाठिंबा दिलेला होता. धर्मपीठांवरून मोठमोठीं व्याख्यानें ठोकण्याचा काळ नुकताच संपला होता. आणि न्यू इंग्लंडमध्यें साहित्यिक नवजीवनाचा पाया घातला गेला होता. लेखी शब्दाला त्याचें योग्य स्थान मिळूं लागलें होतें. नव्या आणि जुन्या आविष्कारांत दुवा सांधणारीं हीं 'लायसीयम' व्याख्यानें शेकड्यांनीं, दरवर्षी बऱ्याच राज्यांतील शहरोशहरीं आणि खेडोपाडीं होऊं लागलीं होतीं. ती एक फार उत्कृष्ट चळवळ होती. त्या चळवळीची बरोबरी करील अशी दुसरी चळवळ नव्हती. ज्याला ज्याला म्हणून सांगण्यासारखें स्वत:जवळ कांहीं आहे असें वाटे आणि व्याख्यानरूपानें तें मांडण्याची कुवत असे त्या त्या प्रत्येकाला श्रोते मिळूं शकत—निदान त्याच्या गांवांत तरी त्याला संधि असे. जर त्याचें व्याख्यान चांगलें वठलें तर आसपासच्या गांवांतूनहि त्याला निमंत्रणें मिळत. कॉकॉर्ड हें लेखक आणि तत्त्वज्ञ यांनीं संपन्न असलेलें नगर! त्यामुळें तेथें स्वाभाविकच पहिल्या दर्जाचें 'लायसीयम' होतें. अर्थात् तेथेंहि निधर्मी आणि अराजकवादी विचारवंतांना सुखासुखी व्यासपीठ मिळत होतें असें मात्र नाहीं. इमर्सन आणि त्याच्या मित्रांनीं दीर्घकाळ झगडा केल्यानंतर कुठें १८४५ सालीं 'लायसीयम' मध्यें वक्त्याला संपूर्ण विचारस्वातंत्र्य देण्याच्या तत्त्वाला लोक कबूल झाले. 'लायसीयम' चें काम आळीपाळीनें स्वयंसेवक करीत. १८४२–४३च्या कॉकॉर्डच्या व्याख्यानमालेची जबाबदारी थोरोनें पार पाडली.

त्याला व्याख्यानासाठीं उत्कृष्ट मालमसाला मिळाला तो केप कॉडमध्यें. त्याला वन्य जीवनाबद्दल जी उत्कंठा होती त्यामुळें त्यानें केप कॉडला तीनदां भेट दिली होती. मॅसाच्युसेट्स राज्यांतील वन्य भाग संपुष्टांत आला होता. अटलांटिककडून येणारें तुफान रोखून धरणाऱ्या कॉकॉर्डच्या वाकाणांत मात्र त्याला संतोष वाटावा असें वन्य जीवन तोंवर शिल्लक होतें. कॉकॉर्डपासून साठ मैलांवर, एका भयाण वाळूच्या ढिगाऱ्याच्या आसपास त्याला एक

अगदीं निर्जन किनारा गवसला. तें तीस मैलांचें अंतर त्यानें तुडवलें. लाटांच्या घनगर्जनेंत, वादळी पावसांत, शीत अशा समुद्री धुक्यांत त्यानें हा सगळा प्रवास केला. ह्या प्रवासांत त्यानें जें जें पाहिलें त्याची त्याची नोंद त्यानें आपल्या दैनंदिनींत करून ठेवली आहे. " जहाजें फुटून बुडालेल्या आयरिश निर्वासितांची किनाऱ्याकडे वाहत आलेलीं प्रेतें, खतासाठीं वाहून नेल्या जाणाऱ्या सागरी वनस्पति, अंतर्भागांतील लोकांना अपरिचित असणाऱ्या आणि समुद्रकिनाऱ्यावरच उगवणाऱ्या झोस्टेरा, सॅम्फायर, रोझमेरी इत्यादि वनस्पति, गल, वाडर, विल्सन पेट्रेल हे दर्यायी पक्षी, वादळानें ग्रस्त झालेलीं फळझाडें आणि किनाऱ्यावरचे पाईन, वाळू थोपवण्यासाठीं (लेड लॅंडेसमध्यें असें करतात असें त्यानें ऐकलें होतें त्याच धर्तीवर) लावलेलें माईमचें गवत आणि पाईनचीं झाडें, स्थानिक धान्य दळण्यासाठीं उभारलेल्या पवनचक्क्या, स्थानिक इंडियनांच्या बाणांचीं पातीं, मुरंबे घालण्याचे मासे, अडकून पडलेले व्हेल मासे, बुडालेल्या गलबतांचा वाहून किनाऱ्याला लागलेला माल, आणि जुन्या पुराण्या बुडालेल्या गलबतांचे सांगाडे, किनाऱ्यावर सडत कुजत पडलेल्या वनस्पति, जुन्या पक्क्या झाडांचे बुंधे, आणि दिव्यावर फिरते पतंग आणि पक्षी आपटून मेल्यामुळें धूसर प्रकाश देणारें दीपगृह ! "

भरती ओहोटीच्या रेषा धरून तो मैलच्या मैल फिरला. मोठी लाट येण्यापूर्वीं तो नेमका माघारीं येई. समुद्राच्या निकट सांनिध्याचा मनसोक्त आनंद तो उपभोगीत होता. त्याचे जोडे रेतीनें भरत, ओल्या वाळूवरून परावर्तित झालेल्या उन्हाच्या तिरीपीनें डोळे दिपत, कधीं तो समुद्रांत उतरून पोहोण्यालाहि कमी करीत नसे. पाणी अगदीं थंडगार वाटे. कॉंकॉर्डचा संथ प्रवाह समुद्रांत विलीन होई तेथील भोवरे भीति घालीत. एखाद्या वेळीं तो आंतल्या भागाकडे आपला मोर्चा वळवी आणि शुद्ध रेताडांत उगवलेलीं भरघोस पिकें पाहून तो आश्चर्यचकित होऊन जाई. वन्य गुलाब आणि झाडाचे लसलसते कोंब यांची समुद्रकिनाऱ्यावरची बहराला आलेली दौलत पाहून जंगलचें हें लेकरूं खूष खूष होऊन जाई." बहराला आलेल्या गुलाबांचे त्या रेताडांत वसलेले ताटवे म्हणजे जणूं फुलोऱ्याचें साक्षात् ऐश्वर्य होतें ! किनाऱ्यावरच्या बोरींच्या सुगंधांत त्या गुलाबांचा सुगंध मिसळून गेलेला असे.

इटलींतीलच काय, पण जगांतील कोठलाच गुलाबाचा बगीचा त्यांची बरोबरी करू शकणार नाहीं." खेडीं तो टाळीत असे. मासळी गोळा करण्यासाठीं एकटे दुकटे हिंडणारे लोक जे काय त्याच्या नजरेस पडत तेवढेच. कांहीं जण वाहून आलेलीं लाकडें आणि मोडक्या गलबतांचे अवशेष शोधायलाहि आलेले असत. कांहीं जण लाटांबरोबर वहात येणारे बाम जातीचे मासे धरायलाहि आलेले आढळत. कॉन्कॉर्डच्या जंगलांत अशींच समाजानें अव्हेरलेलीं, पण स्वतंत्र बाण्याचीं माणसें त्याला भेटत आणि त्याला त्यांचें भारी कौतुक वाटे. पण त्याला खरें आकर्षण वाटे तें समुद्राची भव्यता, त्याचे ते शाही रंग आणि त्याचें तें अचाट सामर्थ्य यांचें. समुद्राच्या लाटा त्याला जुन्या संशोधकांची आणि नकाशे तयार करणारांची आठवण करून देत. कोलंबस, हंफ्रे गिल्बर्ट, आणि चँप्लेन! केप कॉडच्या किनाऱ्यावर प्रथम पाऊल ठेवणारे ते यात्रेकरू! दोन महिन्यांच्या प्रवासानंतर जुन्या इंग्लंडहून ते नव इंग्लंडला पोंचले होते.

थोरो पहिल्यांदा केप कॉडला गेला तो १८४९ सालीं एलरी चॅनिंगच्या बरोबर. त्यावेळीं त्यांची गांठ पावसाळी हवा आणि मोडतोड झालेलीं गलबतें यांच्याशीं पडलीं. दुसऱ्या वर्षीच्या जून महिन्यांत तो गेला त्यावेळीं संथ उन्हाळी हवा होती. नंतरच्या महिन्यांत इमर्सनच्या सूचनेवरून तो किनारपट्टींत गेला. मार्गारेट फुल्लर आणि तिचा इटालियन नवरा काउंट ओसोली आणि त्यांचा छोटा मुलगा हे तिघे, त्यांना घेऊन युरोपमधून निघालेलें जहाज वादळांत सापडून फुटून बुडालें त्याच्याबरोबर नाहींसे झाले होते. ऐन न्यूयॉर्कला पोंचण्याच्या सुमारासच हा अपघात झाला होता. त्यांचे कांहीं अवशेष किनाऱ्यावर सांपडतील तर ते शोधून काढण्याची कामगिरी इमर्सननें थोरोवर सोपवली होती. मॅझिनीच्या नेतृत्वाखालीं जी रोमन क्रांति झाली होती तिचा इतिहास मार्गारेटनें लिहून संपवला होता आणि तें हस्तलिखित घेऊन ती निघाली होती. अमेरिकेंत तो इतिहास प्रकाशित व्हायचा होता. समुद्र किनाऱ्यावर वाहून आलेल्या वस्तूंत मार्गारेटचें शव आणि तिचें तें हस्तलिखित असेल तर शोधायचें होतें! परंतु समुद्रानें तीं शवें आपल्यापाशींच विसावून घेतलीं आणि तें हस्तलिखितहि कधीं सापडलें नाहीं!

कॉंकॉर्डच्या ग्रामीण परिसरांत थोरो ही एक ओळखीची आसामी झाली होती. जेव्हां तो निसर्गसंशोधनाच्या किंवा बोरें वेचण्याच्या कामगिरीवर नसे तेव्हां तो जमिनीची किंवा जंगलांची मोजणी करण्यांत गढलेला असे किंवा आपल्या मित्रांच्या वा नातेवाइकांच्या समवेत पायपिटी करायला नाहींतर होडग्यांतून हिंडायला जात असे. त्याच्या वागण्यांत कुठलीहि कर्मठ औपचारिकता नसे. त्याचा पोषाखहि गबाळाच असे. त्यामुळें त्याला न ओळखणाऱ्या लोकांना तो जुनी भांडी दुरुस्त करणारा, फेरीवाला किंवा यंत्र दुरुस्त करणारा असावा असें वाटे. कधीं त्याची खूप रखडपट्टी होई. एकदां केप कॉडच्या परिसरांत पोलिस त्याच्या पाळतीवर होते. त्याच सुमारास एका बँकेवर दरोडा पडला हाता आणि थोरो त्यांना संशयित वाटत होता! एकदां थकून भागून तो एका झाडाला टेकून बसला असतांना तो दारुड्या शेतकरी असावा असें वाटलें होतें. त्याचे कपडे जाडेभरडे आणि हवामानाला दाद न देणारे असत. त्यांचा रंग राखी आणि रूप मळकट या सदरांत जमा होण्यासारखें असे. त्याच्या जीवनक्रमाशीं सुसंगत असाच त्याचा अवतार असे. अपल्याला कोणी ओळखूं नये ही त्याची इच्छ सफल व्हावी असे ते असत. त्याच्या जोड्यांना पॉलिश केलेलें नसे आणि ते चांगलेच मेणचट दिसत. त्याला पायीं फिरणें फार आवडे. आगगाडीच्या डब्यांत पाय निष्कारण लोंबकळत ठेवून प्रवास करणें त्याला मूर्खपणाचें वाटे. प्रवासांत त्याच्याजवळ बोजा फार कमी असे. तो सामान वगळून वगळून अगदीं कमी करी. छावणी जीवनाला अगदीं आवश्यक तेवढेंच सामान त्याच्याबरोबर असें. तो आगगाडीनें कॅनडाला गेला तेव्हां त्याचें सामान म्हणजे एक ब्राउन पेपरमध्यें बांधलेलें बंडल आणि एक नारळाच्या सोपट्यांची हॅट एवढेंच. त्यानें लिहून ठेवलें आहे, "प्रवासाचा अगदीं सस्ता आणि थोडकें अंतर काटून लांबची मजल गांठण्याचा मार्ग म्हणजे पदयात्रा! जवळ एक चाकू, एक चमचा, मासे पकडायचा गळ, थोडें इंडियन पद्धतीचें अन्न, थोडें पीठ आणि थोडी साखर एवढें असलें कीं बस्स! एखादा झरा किंवा तळें रस्त्यांत लागलें कीं खुशाल गळ टाकून चार मासे पकडावे आणि शिजवावे किंवा झटपट शिरा भाजावा किंवा वाटेंतल्या एखाद्या किसानाकडून चार पैशाला पावाचा एक तुकडा खरेदी करावा, पुढच्या झऱ्यांत तो ओलसर करावा, नंतर

साखरेंत घोळावा. एवढ्या आहारावर आख्खा दिवस काढायला अडचण नाहीं. " त्याच्या सामानांतल्या दोन वैशिष्ट्यपूर्ण वस्तु म्हणजे त्याची घोळदार हॅट आणि त्याची छत्री. ह्या वस्तूंचा खास उपयोग असे. हॅटमध्यें तो आपले वनस्पतींचे नमुने एकत्र करी. त्यामुळें त्या नमुन्यांसाठीं पेटी वहायचे त्याचे श्रम वांचत आणि रेनकोटचा एक वजनदार डाग घेण्यापेक्षां छत्री बाळगणें त्याला सोयीचें वाटे.

अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यांतील गुलामगिरीच्या प्रथेविरुद्ध सुरू झालेली चळवळ थोरोच्या आयुष्यांतच तीव्रतेला पोंचली. तो एक ज्वलंत प्रश्न ठरला आणि यादवी युद्धाला तें एक कारण झालें. अधिकाधिक प्रमाणांत गुलाम दाक्षिणेकडील राज्यांतील मळ्यांतून निसटून उत्तरेकडील राज्यांतून घुसत होते. कॅनडांत जाण्यासाठीं किंवा उत्तरेकडील राज्यांतच सुस्थिर होण्यासाठीं त्यांच्यापैकीं पुष्कळांना सहानुभूतिदार मदत करीत. पळणाऱ्या गुलामांचे जे प्रमुख रस्ते होते त्यावर कॉंकॉर्ड वसलेलें नव्हतें. त्यामुळें हे फरारी लोक क्वचित् दृष्टीस पडत. थोरो कुटुंबांतली मंडळी आणि त्यांचे मित्र या दलितांना सर्व प्रकारचें साह्य करीत. कॅनडाला जाणाऱ्या गाडींत बसवून देऊन एका निग्रोला उत्तरेकडील राज्यांत पळून जाण्याला आपण कशी मदत केली, त्याची नोंद हेनरीनें केलेली आढळते. त्याचें घर हें सुधारणावादी असल्यानें त्याचा गुलामगिरीविरोधी चळवळींशीं निकट संबंध होता. आरंभीं बराच काळ इमर्सनप्रमाणेंच तो तात्त्विक अलिप्तपणानें ह्या चळवळीकडे पाहत होता. या गुलामगिरीपेक्षां अधिक मूलभूत स्वरूपाची गुलामगिरी म्हणजे मानवी आत्म्याची गुलामगिरी ! तिच्याविरुद्ध दंड थोपटून उभे ठाकण्याची त्याची मनीषा होती. परंतु १८५० सालीं फरारी गुलामांसंबंधींचा कायदा पास झाल्यानंतर ही त्याची अलिप्तता गळून पडली. मॅसाच्युसेटस आणि इतर उत्तरेकडील राज्यें यांच्यामध्यें जे गुलामगिरीचे विरोधक होते त्यांचा, गुलामगिरीच्या प्रथेच्या पुरस्कर्त्या दूरवरच्या दक्षिणेकडील राज्यांशींच विरोध होता असें नाहीं तर आपल्या राज्यांतील प्रशासन यंत्रणेशींच आपला उभा दावा आहे, ही गोष्ट एकाएकीं त्यांना आढळून आली. आणि त्यामुळें गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रश्न हा घराघरांपर्यंत जाऊन पोंचला.

फरारी गुलामांसंबंधींचा कायदा पास होण्यापूर्वींच आपल्या ' सिव्हिल डिसओबिडियन्स ' मध्यें थोरोनें मॅसाच्युसेट्स सरकारच्या दांभिकपणावर कडाडून हल्ला चढवला होता. स्वतःला स्वातंत्र्याचें माहेरघर समजणारें हें राज्य खुशाल गुलामगिरी खपवून घेत होतें. आपल्या सद्सद्विवेकाशीं नेकी ठेवणाऱ्या माणसाची काय स्थिति होते, याचा अनुभव त्याच्या स्वतःच्या गिरफदारीनें त्याला आला होता. कायदा पास झाल्यापासून या फरारी गुलामांना पकडून देण्याचीच अपेक्षा राज्य करीत होतें असें नाहीं तर जे गुलाम पुष्कळ काळापूर्वी पळून जाऊन उत्तरेकडील राज्यांत स्थायिक झाले होते त्यांनाहि पुन्हा गुलामगिरींत डांबण्याची त्यांची इच्छा होती. माणसाच्या सदसद्विवेक बुद्धीच्या स्वातंत्र्यावरचा हा मोठाच हल्ला होता. १८५१ च्या एप्रिलमध्यें जेव्हां निग्रो सिम्सला पुन्हा गुलामीचें जिणें कंठण्यासाठीं मॅसाच्युसेट्स सरकारनें परत पाठवलें तेव्हां तेथील गुलामांच्या कैवाऱ्यांच्या मनांतील सरकारविषयींची कटुता दाटून आली. सरकारवर कठोर प्रहार करण्यासाठीं थोरो आपल्या दैनंदिनींत नित्य नवा दारूगोळा जमा करूं लागला.

१८५० ते १८५४ या काळांत अन्यायी सरकार विरुद्धचा त्याचा प्रक्षोभ धीरे धीरे वाढतच गेला. एका वेळीं त्यानें तात्त्विक कारणांसाठीं डोईपट्टी देण्याचा इन्कार केला होता, त्याचप्रमाणें फरारी गुलामांसंबंधींचा कायदा जेव्हां जेव्हां म्हणून मोडण्याचा मोका चालून येई तेव्हां तेव्हां तो मोडण्याला तो तयारच असे. एक दिवस सकाळींच एक निग्रो त्याच्या दाराशीं येऊन बेहोश होऊन पडला. त्यावळीं थोरोनें त्याची जी सेवा-चाकरी केली त्याचें सुरेख शब्दचित्र त्याचा मित्र मॉनक्युअर कॉनवे यानें रेखाटलेलें उपलब्ध आहे. " एकाग्र चित्तानें, विनम्र भावानें आणि परम स्नेहानें तो विद्वान त्या गुलामाची सेवा बजावतांना मी पाहातच राहिलों. त्याला जेऊं घातलें पाहिजे. त्याचे सुजलेले पाय धुतले-शेकले पाहिजेत. आणि विश्रांती घेण्या-खेरीज दुसरें कांहीं त्याच्या मनाला शिवतां कामा नये. शांतशीतलांमध्यें परम शांतशीतल म्हणून विराजमान व्हावा असा हा मनुष्य वारंवार त्या थरथर कांपणाऱ्या निग्रोच्याजवळ जाऊन त्याची पूसतपास करीत होता. त्याला घरच्यासारखें मोकळें वाटावें म्हणून केवढी त्याची यातायात! जगांतली कोठलीहि बलिष्ठ सत्ता त्याच्या केसालाहि धक्का लावूं शकणार नाहीं, असा

त्या निग्रोला भरवसा वाटावा म्हणून त्याचा सारा आटापिटा चालला होता. त्या दिवशीं त्यानें आपलें नित्याचें फिरणें सोडलें. त्या निग्रोचा रखवालदार म्हणून हुशार रहाणें त्याला भाग होतें. कारण त्या काळांत निग्रोंना पकडून देणाऱ्यांना कांहीं काळ नव्हता..."

१८५४ च्या वसंतांतली गोष्ट आहे. बोस्टनमध्यें भयंकर प्रक्षोभ आणि अराजकाचें वातावरण होतें. त्या तशा वातावरणांत ॲंथनी बर्न्स नांवाच्या एका फरारी गुलामाला पकडून मॅसाच्युसेट्स सरकारनें पुन्हा गुलामीच्या गर्तेंत खितपण्यासाठीं परत पाठवलें! त्याच्या सुटकेसाठीं प्रचंड निषेध सभा झाल्या, पण सरकारनें दाद दिली नाहीं. ह्या घटनेनें राज्यभर खळबळ माजली. थोरोवर ह्या घटनेचा फार खोल परिणाम झाला आणि त्याच्या तोंडून जणूं अंगार बाहेर पडला. ४ जुलै रोजीं त्यानें कॉंकॉर्डपासून १८ मैलांवर असलेल्या फ्रॅमिंगहॅम या ठिकाणीं एक जाहीर सभा घेतली. त्याच्या भाषणाचा विषय 'मॅसाच्युसेट्समधील गुलामगिरी' हा होता. 'सिव्हिल डिसओबिडियन्स' या विषयावरील भाषणांत त्यानें अन्यायावर निष्ठुरपणें कोरडे ओढले होते तसेंच त्याचें हें भाषणहि गाजलें. निरपराध्यांचा अमानुष छळवाद मांडणाऱ्या सरकारबद्दल वाटणारी अप्रीति त्याच्या शब्दाशब्दांतून ओसंडत होती. जें राज्य अशा तऱ्हेचे अन्याय राजरोसपणें करतें तें राज्य आपल्या दृष्टीनें अस्तित्वांतच नाहीं आणि राज्य ह्या पदवीला तें पात्रच नाहीं असें आपलें मत त्यानें ठणकावून मांडलें. "गेला उभा महिना आपलें सर्वस्व हरण झालें असावें, अशा तऱ्हेचा मला वाटला. मला कसली वेदना आहे तें प्रथम माझ्या ध्यानांतच येईना. पण नंतर माझ्या ध्यानांत आलें कीं आपण आतां देशाला मुकलों आहोंत! या भावनेचीच ती वेदना होती."

गुलामगिरीकडून त्यानें आपला मोर्चा पैसे खणून काढणारांकडे वळवला. न्यू बेडफोर्ड, नानटुकेट आणि फिलाडेल्फिया या ठिकाणीं त्यानें 'आजीविका मिळवणें' या विषयावर भाषणें केलीं. (लाइफ विदाउट प्रिन्सिपल्स-तत्त्वहीन जीवन, या नांवानें तीं प्रसिद्ध झालीं आहेत.) पैशांचा आणि कामाचा हव्यास सुटलेल्या समाजांत व्यक्तीला कशी घसरगुंडी पत्करावी लागते, हा या वेळच्या त्याच्या भाषणांचा विषय होता. अशा समाजांत "आपल्या

जवळच्या अपरंपार संपत्तींतून चार चव्वल लोकांच्या अंगावर फेकून त्यांना झुंजवणारा एक कुबेर" म्हणजे परमेश्वर अशी कल्पना असणार, असें त्याचें मत होतें. जर माणसें जीवनाकडे थोडया सहजपणें पाहतील, मरेमरेतों काबाडकष्ट करण्याचें सोडतील, वर्तमानपत्रें न वाचण्याचें पथ्य पाळतील, आणि आपल्या अंतरंगाची मशागत करतील, कॅलिफोर्निया किंवा ऑस्ट्रेलिया या ठिकाणचें सोनें खणून काढण्याऐवजीं आपल्या अंतःकरणांत बुडी घेऊन आपल्यामधलें सोनें बाहेर काढण्याचा उद्योग करतील; "जर एखादा माणूस वृक्षवल्लीवनचरें यांचें सोयरेपण करण्यासाठीं आपला दिवसाकाठचा अर्धा वेळ खर्च करील, तर त्या बिचाऱ्यावर बदमाश समजले जाण्याची आफत येईल, पण जर आपला आख्खा दिवस तो सट्टेबाजींत आणि हें जंगल उध्वस्त करून पृथ्वीचा अकालीं चमनगोटा करण्यांत घालवीत असेल तर एक साहसी नागरिक म्हणून त्याची संभावना केली जाईल!"

या पूर्वीं कांहीं महिने 'अ वीक ऑन द कॉंकॉर्ड' या त्याच्या पुस्तकाच्या विकल्या न गेलेल्या सातशें प्रतींचे गठ्ठे त्याच्याकडे येऊन पडले होते! कदाचित् या अपयशाच्या तिरीमिरींत त्यानें लिहून ठेवलें असावें कीं "तुम्हांला ज्या मार्गांनी खोऱ्यानें पैसा मिळतो ते मार्ग बहुधा तुमचें अधःपतन करणारेच असतात.... जर वक्ते किंवा लेखक म्हणून तुम्हांला पैसा मिळत असेल तर त्याचा अर्थ तुम्ही लोकप्रिय आहांत म्हणजेच अगदीं सरळ सरळ तुमची घसरगुंडी सुरू आहे....तुम्हाला जो पैसा मोजला जातो तो तुम्ही मनुष्यापेक्षां कांहींतरी हिणकस आहांत म्हणूनच... बडा मुशाहिरा मिळून तो मिरवण्याची संधि कविकुलगुरूच्या वाट्यालादेखील येणें मुश्कील."

मोजणीदार म्हणून तो आपल्या परिसरांत मान्यता पावला होता आणि कित्येक मैलांत त्याचा हात धरील असा कोणी नव्हता. तरीहि त्याला विशेष मागणी येत नव्हती, याचा त्याला खेद वाटे. जमीनदारांना ढोबळ आणि चुकीची मोजणी केलेली चाले, कारण त्यामुळें त्यांच्या जिंदगींत अनुपलब्ध अशा कित्येक एकरांची भर पडलेली दिसे.! आपलें जीवन वेगळयाच दिशेनें आडमाप वाहत चाललें आहे असें ह्या नेक मोजणीदारालाहि आढळत होतें. "हें धांवपळीचें आणि ओबडधोबड काम मला आपलें जीवन कसेंतरी जगायला भाग पाडीत आहे. धड जेवणांतदेखील मला

लक्ष देतां येत नाहीं, हा तर कहरच झाला! कामाबद्दल प्रीति असावी तशी जेवणाखाणाबद्दलहि असावी, हा सोनेरी नियम आहे, असें मला वाटतें. जर मला माझ्या छंदानें वागतां आलें तर मी चहा-कॉफी सेवन करणार नाहीं कीं मांसाहार घेणार नाहीं. ''

तें वर्ष थोरोला निराशाजनक गेलें. जेवणाखाणाचीहि त्याची खूप आबाळ झाली. तरीहि १८५४ च्या ९ ऑगस्टला त्याची सर्वोत्कृष्ट कलाकृति ' ऑफ वाल्डेनः ऑर लाइफ इन द वूड्स ' प्रसिद्ध झाली. हें त्याचें दुसरें पुस्तक. त्याच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशकांच्या धरसोड वृत्तीमुळें त्याचें प्रकाशन लांबतच गेलें. पण ' अ वीक ऑन द कॉंकॉर्ड ' च्या अपयशाची या पुस्तकानें पूर्ण भरपाई केली. त्याला नवा हुन्नरी प्रकाशक लाभला. टिकनर अँड फिल्डस यांनीं त्याचें हें पुस्तक प्रकाशित केलें.

वाल्डेन तळ्याच्या परिसरांत थोरो जरी १८४५ आणि १८४६ या वर्षींच राहिला तरी ' वाल्डेन ' या पुस्तकासाठीं त्यानें १८३८ ते १८५४ या काळांतील आपल्या दैनंदिनींतील नोंदींचा उपयोग केलेला आहे. जग आणि आपलें त्यांतील नेमकें स्थान ठरवण्याचा प्रांजळ प्रयत्न करणाऱ्या माणसानें आपल्या सोळा वर्षांच्या मानसिक विकासाचा आलेख काढण्याच्या हेतूनें स्वतःबद्दल जें म्हटलें त्याचें ग्रथन म्हणजे हें पुस्तक! त्याचा उद्देश असा साधा सरळ असला तरी तो आपले हे वन्य जीवनासंबंधींचे अनुभव हलक्या फुलक्या प्रसन्न ललित निबंधांच्या मालिकेच्या रूपानें मांडतो. आपल्या गोष्टी आणि जीवन विषयक विचार आपल्या वाचकांना कसें नटवून-खुलवून सांगावें तें कौशल्य एव्हांना त्यानें चांगलेंच हस्तगत केलें होतें. ' वाल्डेन ' मध्यें त्यानें त्या दोहोंचा उत्तम समन्वय घातला आहे. टक्केटोणपे खात त्यानें जें कौशल्य या क्षेत्रांत हस्तगत केलें त्याचा तो एक उत्कृष्ट नमुनाच म्हणावा लागेल.

*" जर खिन्नतेनें तुम्हाला घेरलें असेल ... तर पाणथळींत जा आणि नव्या वर्षाकडे पुलकित होऊन पाहणाऱ्या त्या काळ्या-पांढऱ्या कोबीच्या कांद्यांच्या पात्यांचें दर्शन घ्या......त्यांनीं मरणाची धास्ती घेतल्यासारखें जरा तरी वाटतें ? त्यांना आपल्या त्या जीवनाबद्दल कधींतरी खिन्नता वाटतें काय ? "*

**— थोरोची दैनंदिनी**

थोरोच्या समकालिनांना ' वाल्डेन ' हा एक संदेश होता. त्या समकालिनांचा व्याजोक्तीनें थोरो " न्यू इंग्लंडमध्यें आपण राहिलों असा दावा करणारे " असा उल्लेख करी ! त्याचा संदेश अगदीं स्पष्ट होता. औद्योगीकरणानें पछाडलेल्या एकोणिसाव्या शतकांतील जीवन गुंतागुंतीचें,उथळ आणि एखाद्या तपश्चर्येसारखें दिवसेंदिवस बनत चाललें होतें. तो म्हणे : " शेजारी-पाजारी जे काबाडकष्ट उपसतात त्यांच्या मानानें हरक्युलसचें कष्टदेखील कमीच म्हणावें लागतील ! त्याला बारांनाच तोंड द्यायचें होतें आणि त्यांना कोठेंना कोठें अंत होता. पण या बिचाऱ्यानी एखाद्या राक्षसाला कह्यांत आणलें आहे किंवा आपले कष्ट निकालीं काढले आहेत असें कधींच माझ्या नजरेला पडलें नाहीं ! " अहर्निश कष्ट आणि चिंता यांनीं ग्रस्त अशा आपल्या शेजाऱ्यांचीं जीवनें त्याला निरानंद, क्षुद्र आणि जड वाटत. सद्गुण, सद्गुण म्हणून जे म्हणवले जात त्यांनाहि तेथें कुबटपणाचा वास असे. या सगळ्यांतून मार्ग काढायचा तर कठोर असा साधेपणा त्यांत आणला पाहिजे, असा त्याचा दावा होता.

जॉन फिल्ड हा त्याचा एक शेजारी. कष्टाळू आणि दारिद्र्यांत रुतलेला तो एक आयरिश मनुष्य होता. त्याला सल्ला दिल्यानंतर थोरोनें लिहून ठेवलें आहे : " आपल्या अनुभवाचें शहाणपण त्याला देण्याचा मीं

प्रयत्न केला. माझा तूं अगदीं जवळचा शेजारी म्हणून, ह्या चार हिताच्या गोष्टी राहवत नाहीं म्हणून सांगतों, अशी त्याची भलावण मीं केली. मी त्याला म्हणालों, 'अरे बाबा, मी असा शोधाशोध करीतच इथें आलों. मी जरी भणंगासारखा दिसत असलों तरी तुझ्यासारखा इतमामानेंच मी राहात आहें. मी नेटक्या हवेशीर आणि स्वच्छ घरांत राहतों. माझ्या घराला जो खर्च आला तेवढें तर त्याच्या त्या मोडकळीला आलेल्या घराचें वर्षाकाठचें नुसतें भाडें होतें ! त्याला इच्छा असली तर महिन्या दोन महिन्यांत आपला शानदार इमला कसा उठवतां येईल, हेंदेखील मीं त्याला सांगितलें. चहा, कॉफी, दूध, लोणी, मांस ह्या वस्तु मी वापरीत नसल्यानें त्यांच्यासाठीं मला राबावें लागत नाहीं, हेंहि मीं त्याला सांगितलें. मला असें राबावें लागत नसल्यानें चापून जेवायचीहि पाळी माझ्यावर येत नाहीं. माझ्या रोजच्या जेवणाखाण्याचा खर्च तरी कमी...पण अमेरिकेंत आल्यावर रोज चहा, कॉफी आणि मांस मिळतें हा केवढा तरी लाभ झाला असेंच त्याला वाटत होतें ! अशी चैन करायला मिळते ती कांहीं खरी अमेरिका नव्हे. खरी अमेरिका म्हणजे असा देश कीं जेथें असल्या गोष्टी न कराव्या लागणारी जीवनप्रणाली चालवण्याचें स्वातंत्र्य व्यक्तीला मिळतें. जेथें गुलामगिरी ठेवण्याला सरकार तुम्हांला भाग पाडीत नाहीं, जेथें युद्धांत सहभागी होण्याची सक्ति केली जात नाहीं. जेथें असल्या गोष्टींमुळें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें होणाऱ्या खर्चाचा बोजा टाकला जात नाहीं. असा देश म्हणजे अमेरिका होय. चार चांगले पदार्थ पोटांत ढकलतां येतात तो देश अमेरिका नव्हे. ''

थोरोचा संदेश हा मनसोक्त श्रीमंती उपभोगणारांसाठीं नव्हता. ज्यांच्या जीवनांत सतत दुःख, कष्ट, असमाधान, ज्यांना हीन गोष्टींसाठीं आपली शक्ति वेंचावी लागत होती, अशांसाठीं थोरोचा संदेश होता. कष्टाला जखडलेले आणि आपल्या भोंवतीं पसरलेली चैतन्यावरील मरगळ न पाहणारें हे लोक म्हणजे " निराशेच्या खोल गर्तेत फसलेलें जीवन वांट्याला आलेले " लोकच. ह्या असल्या क्षुद्र जीवनाला त्यानें रामराम ठोकला होता. तो म्हणे, माझी इच्छा डोक्यांतून "कॉकॉर्ड, मॅसाच्युसेट्स, अमेरिका यांना हद्दपार करून दैनंदिन जीवनाचा एक निरागस भाग बनण्याची आहे ...... त्याचसाठीं जेथें

जीवनाचे प्रश्न साधे सरळ बनतात अशा ह्या एकांताकडे मी वळतों." अशा साध्य आयुष्यक्रमांतच नीटनेटकेपणा आणि पूर्णता त्याच्या अनुभवाला येई. लोकांचा पैशांचा हव्यास पाहून तो आश्चर्यचकित होई. शेतांत बसून टिपणें करणाऱ्या थोरोला पाहून एका आयरिश माणसाला तो आपल्या रोजंदारीचा हिशोबच मांडीत बसला आहे असें वाटलें. आपल्याला हव्या त्या प्रकारचें जीवन घालवण्याचें स्वातंत्र्य मिळावें म्हणून तो आलिप्तपणें एका बाजूला बसून, प्रगतीचे पुरस्कर्ते ज्याला आपलें उज्ज्वल भवितव्य अशी संज्ञा देत त्या मार्गानें एकोणिसावें शतक भर वेगानें धावतांना पाहत होता. त्यानें लिहून ठेवलें. : "माझ्या राष्ट्राची सारी धडपड आरोहणासाठीं नसून पश्चिम दिशेला- ऑरेगॉन, कॅलिफोर्निया, जपान यांच्याकडे जाण्यासाठीं आहे ! मला त्यांत कांहींच राम वाटत नाहीं...कोठल्याहि उच्च विचारांची प्रेरणा त्यामागें नाहीं, कोठल्याहि भावनेची ऊब त्यांत जाणवत नाहीं, ज्यासाठीं माणसानें आपलें जीवित वाहावें असेंहि त्यांत कांहीं नाहीं. जीवन वाहणें तर सोडाच, पण आपला हातमोजा ज्यासाठीं ओवाळून टाकावा असें-देखील त्यांत कांहीं नाहीं...जावोत बिचारे त्या आपल्या उज्ज्वल भवितव्या-कडे, मला त्याच्याशीं कांहींच कर्तव्य नाहीं, अशी माझी समजूत आहे."

थोरोच्या ह्या विवेचनाला जें वजन आहे तें त्यामागील सत्य अनुभूतीमुळें आहे. लोकांपुढें नवकल्पना ठेवण्यापूर्वीं त्यानें त्याचे प्रयोग स्वतःच्या जीवनांत करून पाहिले होते. त्याचे शब्द म्हणजे तोंडाची वाफ दवडणें नव्हतें. ज्या साध्या जीवनप्रणालीचा अवलंब अत्यंत सुखद आणि लाभदायक असा त्याच्या अनुभवाला आला, ती प्रणाली तो लोकांपुढें ठेवीत होता. हिंदु धर्मग्रंथांत कर्म आणि अकर्म यांच्याविषयीं जें अत्यंत मौलिक असें विवेचन आहे त्याचें सार घेऊनच त्यानें आपला मार्ग आंखला होता. प्रत्येकानें स्वतःचा मार्ग शोधावा आणि मग शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं त्याची निष्फळ म्हणून कितीहि टवाळी केली तरी त्याची पर्वा न करतां त्या मार्गानें जावें. असें करावयाचें तर मुक्त असें मन व्यक्तीजवळ असलें पाहिजे आणि तीच गोष्ट आज मोठी दुर्मिळ झाली आहे. "मुक्ततेचा-निदान विचारांतील मुक्तीचा- अनुभव घेऊं शकणारीं माणसें किती क्वचित् आढळतात. आपण रूढींनीं जखडलेले असतो. कांहीं माणसें मृत्युशय्येला खिळलेलीं असतात !"

पण सारीं माणसें पूर्वग्रहांना खिळलेलीं असतात! माझा शेजारी बुद्धिमान् आहे. त्याला मी वनांत घेऊन जातो आणि नव्या निरामय दृष्टीनें सगळीकडे पाहण्याचें त्याला आवाहन करतों. आपले पूर्वग्रह आणि जुन्या समाजसंस्था यांच्या बेड्या झुगारून आणि मन मोकळें आणि स्वच्छ करून जगाचें नवदर्शन घ्या, असें मी सांगतों. पण तें त्याला जमत नाहीं. तो आपली परंपरा आणि लहर यांनाच चिकटून बसतो. त्याला असें वाटतें कीं सरकार, महाविद्यालयें आणि वर्तमानपत्रें वगैरे अमरपट्टा घेऊन आलेलीं आहेत!"

वर्तमानपत्रांच्या भित्रेपणाचा थोरोला उबग येई. लोकांना त्याचा सल्ला असा असे कीं "बाबांनो 'द टाइम्स' वाचूं नका. असा खंडित काळ नजरेपुढें ठेवण्यापेक्षां अनंत काळ वाचणें इष्ट!" "अलीकडेच निघालेल्या त्या वृत्तपत्राला वाटतें कीं आपण फार उदार, नव्हे निर्भय आहोंत. परंतु जीवन, मृत्यु, चांगलीं पुस्तकें अशा महत्त्वाच्या विषयांवरील मुलांचे विचार प्रसिद्ध करण्याची त्याची बिशाद आहे काय? एखाद्या बुळबुळीत धोरणाच्या वृत्तपत्राला जशी 'देवांची' मान्यता लागते तशी त्यालाहि लागतें. ख्रिस्त आणि डॉक्टर्स यांच्यामधील झगड्याच्या वेळीं जर हें वृत्तपत्र निघत असतें तर त्यानें त्या डॉक्टरांचीं मतेंच तेवढीं छापलीं असतीं आणि ख्रिस्ताचीं दडपून टाकलीं असतीं."

माणसांनीं कसें जगावें? त्यानें स्वतःहि आपली उपजीविका चालवावी? अन्यायी सरकारला सत्यनिष्ठ माणसानें कसें तोंड द्यावें?...अशा प्रश्नांचें त्याचें चिंतन व प्रयोग चालू होते. त्याच्या जीवनांत एक प्रकारची गंभीरता आतां आली होती. समाजपरिवर्तनाच्या कल्पनेनें तो भारला गेला होता. या कालखंडांतील थोरोचें चरित्र रेखाटणें सोपें आहे. पण याहि कालखंडांत थोरोमधील निसर्गवेत्ता तितकाच, नव्हे वाढत्या प्रमाणांतच जागा होता. त्यानें नीतिविषयक केलेलें लिखाण आणि केलेलीं भाषणें, यांतील कांहीं तर फार स्मरणीय अशीं होतीं. पण तरीहि त्यांच्यासाठीं त्याचा थोडाच वेळ खर्चीं पडलेला होता. निसर्गनिरीक्षण आणि टिपणें यांत त्याचा किती वेळ खर्चीं पडत होता तें त्याच्या नंतरच्या दैनंदिनीवरून दिसून येतें. कॉन्कॉर्डच्या परिसरांतील त्याचें फिरणें चालूच होतें. अधूनमधून एखाददुसरी लांबची मजलहि तो मारीत होता. १८५३ व १८५७ मध्यें तो मैनेच्या जंगलांत

फेरफटका करून आला. १८५६ मध्यें फॉल माउंटनवरील ब्रॅटल बोरो, व्हरमॉंटच्या परिसरांतील वनस्पतींची त्यानें पाहणी केली. १८५७ मध्यें केप कॉडला त्यानें पुन्हा एकदां भेट दिली. १८५८ मध्यें दोन गीर्यारोहणांत तो सामील झाला. ब्लेकबरोबर मोनेडनॉकवर दोन दिवस तो छावणींत राहिला आणि एडविन होअरच्या सोबतीनें 'व्हाइट माउंट'वर त्यानें पाहणी केली. १८६० सालीं एलेरी चॅनिंगबरोबर त्यानें अखरेची फेरी केली. या वेळीं मोनेडनॉकवर पांच रात्री त्यांनीं काढल्या.

थोरोच्या काळांत प्राणिशास्त्राच्या जन्माच्या प्रसूतिवेदना सुरू होत्या. ओळख आणि वर्गीकरण एवढीच त्या शास्त्राची प्रगति झालेली होती. वेगवेगळे नमुने गोळा करणें हा निसर्गवेत्त्यांच्या कामांतील मुख्य भाग होता. हल्लीं प्राण्यांच्या संवयींवर जसा भर दिला जातो तसा त्या वेळीं दिला जात नव्हता. थोरोपेक्षां अधिक शास्त्रशुद्ध रीतीनें निसर्गविज्ञानाचा व्यासंग करणाऱ्यांच्या सूचनेवरूनच मुख्यतः थोरोनें कांहीं नमुने जरी गोळा केले असले तरी त्यामुळें त्याला कधींच संतोष वाटला नव्हता. या कामांत नैतिक पैलूची जी गुंतागुत झालेली आहे त्याचें विश्लेषण त्यानें १८५४ मध्यें केलें आहे. एका कासवाची हत्या घडल्याच्या संदर्भात त्यानें ही टीका केली आहे. तो म्हणतो: "विज्ञानाच्या नांवाखालीं प्राण घेण्याच्या एका भानगडींतून आतांच मी सुटलों ! पण त्या हत्येच्या पातकाचीं मी स्वतःला क्षमा करूं शकत नाहीं. अशा या कार्यांत विज्ञानाची सेवा घडत असेल कदाचित्, पण काव्यात्म भावजीवनाशीं या गोष्टीचा मेळ मुळींच बसत नाहीं. यामुळें माझ्या निरीक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. अधिक निरागसपणें आणि आनंदपूर्वक माझ्या निसर्गयात्रा घडाव्या अशी माझी प्रार्थना आहे. जें घडलें त्याचें कसेंहि समर्थन केलें तरी कांहीं केल्या माझें समाधान होत नाहीं. माझ्या दिवसावर मोठा घातक आघात त्यामुळें होतो. माझ्या स्वाभिमानाला त्यानें ढका लागल्यासारखें मला वाटतें. एखाद्या खुनी माणसासारखा कांहींसा अनुभव माझ्या वाट्याला जणुं यामुळें आला."

कांहीं मासे आणि सरपटणारे प्राणी यांची हत्या करण्याची पाळी त्यानें स्वतःवर ओढवून घेतली आणि मग कोठल्याहि जिवंत प्राण्याच्या वाटेला

जाणें त्याला अवघड वाटूं लागलें. त्यानें पक्ष्यांची हत्या कधींहि केली नाहीं. एकदां बोस्टनच्या एका पक्षिवेत्त्याला त्यानें सांगितलें, " एखादा मेलेला पक्षी हातांत धरण्यापेक्षां जिवंत पक्षी प्रेमांत गुंतवणें मला अधिक पसंत आहे. " परंतु पक्षी ओळखणें ही गोष्ट अवघड आहे. ( त्याच्याजवळ एक अगदीं सामान्य अशी दुर्बीणच काय ती होती. ) त्यामुळें हळूहळू त्यानें आपलें लक्ष प्राणिशास्त्राकडून वनस्पतिशास्त्राकडे वळवलें आणि स्थानिक वनस्पतींच्या संग्रहाकडे केंद्रित केलें. निसर्गवेत्ता म्हणून त्याची थोडीफार ख्याति झाली असली तरी वैज्ञानिकांच्या सहवासांत त्याला एक प्रकारची जी अस्वस्थता वाटे तिच्यांतून तो कधीं मुक्त झाला नाहीं. त्याला वाटे, जो जो हे निसर्गवेत्ते विशेषज्ञ बनण्यावर भर देतील आणि अधिकाधिक आधिभौतिक आणि अलिप्त होण्यावर लक्ष केंद्रित करतील तो तो आध्यात्मिक दृष्टीनें ते दरिद्री होत जातील. मनुष्य किती जागृत आहे, ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. एखाद्या तांत्रिक जंत्रीचें रूप देण्याचें कौशल्य त्यानें किती हस्तगत केलें ही गोष्ट गौण आहे. विशेषज्ञांच्या शास्त्रीय कलकलाटानें थोरो उबगून जाई. त्यानें लिहिलें आहे: " जें जें म्हणून जिवंत तें लोकभाषेंत अगदीं स्वाभाविक-रीत्या आणि सहजपणें सांगतां येईल. "

निसर्गाचें एकात्म दर्शन घडावें, ही थोरोला तळमळ होती. मानवी जीवनाचें मूल स्वरूप आकलन व्हावें यासाठीं मानवाच्या परिसराची खडान् खडा माहिती त्याला हवी होती. यासाठीं निसर्गाकडे पाहण्याचा आपला स्वतंत्र दृष्टिकोन आपण कायम ठेवला पाहिजे, अशी त्याची धारणा होती. निसर्गाचा बोध होण्यापूर्वीं त्याचा जिवंत असा संस्पर्श जीवनाला झाला पाहिजे. वैज्ञानिकांनीं अहर्निश झटून माहितीचे ढिगारेच्या ढिगारे लावले तरीहि आपल्याला जीवनाविषयीं नेमकें काय जाणून घ्यावयाचें आहे तें त्यांना सांगता येईल किंवा कसें, याबद्दल तो साशंक होता. जीवन परिपूर्ण आणि आनंदमय कसें करावें आणि जीवनांतील सर्व पैलूंचा जागरूक अनुभव कसा घ्यावा, हीच तर आपली खरी जिज्ञासा असते. " घनदाट जंगलांत अंधारांत वाढणाऱ्या झाडांना पानें फुटतात, पण फुलाफळांचा बहर कधींच येत नाहीं. " त्या झाडांची उपमा तो शास्त्रज्ञांना देई. अधिक सखोल आणि संपन्न जीवन कसें जगावें, हें निसर्गाकडून त्याला जाणून

घ्यावयाचें होतें, ह्या उलट त्याच्या मित्रांची तशी कांहीं अपेक्षा नव्हती. एकेका अवयवाचें छेदन करून अप्रत्यक्ष ज्ञान मिळविण्याची त्याची कल्पना नव्हती. निसर्गाकडून प्रत्यक्षच काय तें ज्ञान त्याला हवें होतें. आपापल्या परिस्थितींत जीव कसा विकास पावतो, हें त्याला अंतःसंवेदनेनें जाणून घ्यावयाचें होतें. मृत्यूपूर्वी दोन वर्षें त्यानें लिहून ठेवलें आहे : " आपल्या डोक्यावरून, दोन तीनशें फुटांवरून जाणाऱ्या ससाण्याची ती रेखीव आकृति पाहून कांहींना तो अधिक जवळून, अगदीं हातांत घेऊन पाहण्याची इच्छा होते. पण त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं कीं त्यांनीं जें पाहिलें तेंच त्याचें सर्वोत्कृष्ट दर्शन असतें. असें दर्शन त्यांना दुसऱ्या कुठल्याच स्थितींत होणें शक्य नाहीं. हें त्यांना समजत नाहीं. बंदिस्त गरुड म्हणजे काय गरुड ? बिचारा अंगणांतून किंकाळत असतो ! इतक्या जवळून त्याला पाहिलें म्हणून माझ्या ज्ञानांत मोठीशी काय भर पडणार आहे ? त्याच्या कोथळ्याची लांबी थोडीच मला जाणून घ्यायची असते ? "

पक्ष्यांचें अवलोकन किंवा वनस्पतींचा संग्रह यासाठीं थोरो गांवाबाहेर पडे. हाताच्या मुठी वळवीत किंवा प्रवाहाबरोबर नांव वल्हवीत तो चालला म्हणजे आपल्या ध्येयाशीं एकाग्रता पावलेली ती साक्षात् मूर्ति वाटे. दर वेळीं तो सहलीला निघे तो आनंदाच्या कैफांत. जणुं त्याचा आणि निसर्गाचा कोठला जीवनव्यापी सौदा पटायचा असावा. कॉन्कॉर्डच्या एल्म वृक्षांच्या घनदाट छायेच्या रस्त्यानें जातां जातां तो शेतांत दिसेनासा होई, त्यावेळीं त्याच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्याची विशेष दखल नसे. त्याला जंगलें, नद्या, दलदली आणि गवत माजलेल्या पाणथळी, ओसाडी आणि कातळ यांच्याविषयीं एक अलौकिक असें प्रेम वाटे. समाजाशीं जरा फटकून वागणारीं आणि अर्ध-इंडियन पद्धतीनें जगणारीं माणसेंच काय तीं त्याला तेथें भेटत.

इंडियन किंवा तत्सम कोणी भेटला कीं त्याला खुशी होई. इंडियन वंशाचे जे अवशेष कॉन्कॉर्डच्या कांहीं शेतकऱ्यांच्या चेहऱ्यामोहऱ्यांत आढळत त्यांची त्यानें नोंद केली होती. परंतु " मॅसाच्युसेट्सच्या आदिम जमातींच्या उरल्यासुरल्या मंडळींपैकीं एखादा शुद्ध रक्ताचा इंडियन आपल्या वन्य वैभवासह त्या पाईन वृक्षांच्या राईत " एखाद्या वेळीं त्याला दिसे, तेव्हां त्याच्या आनंदाला पारावार राहत नसे. किंवा एखाद्या वेळीं एका बाजूला

एकाकी जीवन कंठणारा, मुलांच्या टवाळीचा विषय झालेला, आपल्या नष्टप्राय वंशाच्या अखेरच्या क्रियाकर्मात गुंतलेला, इंडियन बायको केलेला अमेरिकन त्याला आढळे. त्याच्याविषयीं अत्यंत अनुकंपेचीं वाक्यें त्याच्या लेखणींतून उतरत. “आपल्या जमातीला दुरावलेली एखादी भूमिकन्या म्हणजे जणुं कोणी मनसबदारीणच.” ज्या इंडियन शिकारी व मार्गदर्शकां-समवेत त्यानें मैनेच्या जंगलांत सफरी केल्या त्यांच्याविषयीं लिहितांना त्याचा ऊर प्रेमानें ओसंडूं लागे. त्यानें जीं सफरींचीं वर्णनें केलीं आहेत त्यांत मैने आणि माउंट कराहदिन येथील वन्य जीवनाचें केलेलें वर्णन सर्वांत उत्कृष्ट उतरलें आहे. ताम्रवर्णी इंडियनांची आठवण येण्यासाठी आतां त्याला कॉंकॉर्डच्या किनाऱ्यावरील टोकदार लाल रेती तुडवण्याची कांहीं जरूरी नव्हती. तिकडे मैनेच्या डोंगरावर आपल्या खोपटांच्या वस्त्यांतून ते इंडियन राहत होते. त्यांच्या नैसर्गिक वातावरणांत तेथें त्यांचें दर्शन होत होतें. कधीं आपलीं होडगीं वल्हवतांना, कधीं आपलीं आदिवासी गीतें गुणगुणतांना, कधीं आपल्या ओबडधोबड आयुधांनीं शिकार करतांना किंवा आपल्या पद्धतीनें मासे पकडतांना ते दिसत होते. प्राचीन इंडियन जातीचे कुत्रे घेऊन आपल्या वस्त्यांची देखभाल करतांना ते आढळत होते. लांबलांबच्या, किर्र आणि निर्मनुष्य जंगलांत घुसतांना तो पुलकित होत असे. तेथें सांबरें, अस्वलें आणि लांडगे “जिवंत, पडलेल्या, आणि जीर्णशीर्ण झालेल्या,...भीषण, निरंकुश ओसाडींतून, नागमोडी वळणांतून” माग काढीत हिंडत असत. फर, देवदार आणि बर्चच्या घनदाट आणि बिहीड जंगलांतून एका टप्प्यावरून दुसऱ्या टप्प्यावर जातांना तो प्राचीन काळच्या, नदी प्रवाहांतील जलमार्गांनीं जात असे.

वसाहत करणाऱ्या लोकांच्या चौक्यांत तो राहिला. वाहत्या प्रवाहांत तराफे चालवायला शिकला. धबधब्यांच्या भोवतालीं त्यानें पडावांतून दीर्घ आणि खडतर प्रदक्षिणा घातल्या. तलावांतून मैलोगणती अंतर त्यानें होडींतून कापलें आणि तेंहि रात्रीच्या वेळीं. ओंडके पेटवून तारकांकित आकाशाखालीं झोपून रात्रीं कोल्हे आणि घुबडें यांचें संगीत ऐकलें. त्याच्या-मधल्या शिकाऱ्यानें आपला प्रभाव दाखवला व त्यानें गाढ्या पाण्यांतले ट्राउट आणि रोश हे मासे पकडले. त्यानें एवढया मोठ्या आकाराचे हे मासे

पूर्वी कधींच पाहिलेले नव्हते. त्यानें त्यांना पकडण्यासाठीं टाकलेलें अमीष तें क्षणांत गट्ट करीत. हा अनुभव असा विलक्षण होता, ते मासे असे देखणे होते, तें सारें दृश्य असें स्वप्निल होते कीं त्या रात्रीं देवदाराच्या फांदीवर झोपला असतांना ही एखादी परिकथा किंवा स्वप्न तर नाहीं ना, असा संभ्रम त्याच्या मनांत निर्माण झाला. त्यानें लिहून ठेवलें आहे : " म्हणून मी फटफटण्यापूर्वीच उठलों. आणि शहानिशा करायला निघालों. माझे सोबती तोंवर साखर झोपेंतच होते. टाडन तेथें उभे होते. निरभ्र स्वच्छ आकाशांत चंद्रप्रकाश रेखीव दिसत होता. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. नदीच्या प्रवाहाच्या खळखळाटाशिवाय दुसरा कोठलाच आवाज कानीं पडत नव्हता. मी नदीच्या कांठावर उभा राहिलों. माझें पाण्यांतलें प्रतिबिंब पाहिलें. आणि मला असें दिसून आलें तें स्वप्न खरें होतें आणि ती परीकथा वास्तव होती. ते खवलेदार ट्राउट आणि चंदेरी रोश, एखाद्या उडत्या माशाप्रमाणें चपळाईनें त्या चंद्रप्रकाशित हवेंत पोहत होते. टाडनच्या त्या काळ्या पार्श्वभूमीवर त्यांनीं काढलेलीं तजेलदार वर्तुळ मोहक वाटत होतीं!"

त्यांच्या टोळींतल्या माणसांच्या ओळखीच्या मुलखाकडे त्यांनीं कूच केलें. आतां नदीचा आसरा त्यांनीं सोडून दिला. ओबडधोबड प्रदेशांतून ते पर्वताकडे जाऊं लागले. थोरो स्वतः एक जुना आणि जाणिता गिर्यारोहक असल्यानें टोळीचें नेतृत्व त्यालाच पत्करावें लागलें. त्यानें होकायंत्र काढलें आणि त्याच्या आधारानें तो आपल्या टोळीसह सरळ जंगलांत घुसला. ओक, बर्च, फर या वृक्षांच्या घनदाट झाडोऱ्यांतून मैलांपाठीमागे मैल त्यांना जिकिरीनें माग काढावा लागला. कोठेंहि फारसा विसावा न घेतां ते अंधार पडेपर्यंत चालतच राहिले. अगदीं थेट डोंगराच्या एका कड्यापुढें ते जाऊन ठेपले होते. दुसऱ्या दिवशीं थोरोनें एकट्यानेंच अभ्राच्छादित मुक्काम गाठला. " मी एकटाच मोठमोठे कातळ चढून गेलों. त्यांतले कित्येक अलगद असे वसले होते ! मैलांवर मैल त्याच दिशेनें ढगांकडे मीं कूच केलें. तो दिवस इतरत्र तसा निरभ्र होता. परंतु आमच्या मुक्कामाचें ठिकाण मात्र धुक्यानें घेरलें गेलें होतें. तो पर्वत म्हणजे प्रचंड अशा सुट्या शिळांचा एक ढिगाराच वाटत होता. जणुं कधीं काळीं शिळांचाच पाऊस पडलेला असावा आणि त्या शिळा जशा पडल्या तशाच त्या पर्वत उतारावर अद्याप राहिल्या होत्या.

त्या कुठेंच सुस्थिर झालेल्या नव्हत्या. एकावर एक त्या आधारासाठीं ओणवलेल्या होत्या. हेलकावत होत्या. मध्यें मध्यें सर्वत्र फटी होत्या. त्यांच्यामध्यें कुठेंच जमीन किंवा मातीचा थर गवसत नव्हता. कोठल्यातरी अनोळखी खाणींतून एखाद्या ताम्याचा तो कच्चा माल येऊन पडला होता ! निसर्गाचें अजब रसायनच त्यांची घडण करूं जाणें किंवा त्यांचा विनाश करूं जाणें. त्यांतूनच हंसरीं आणि हिरवीं पठारें आणि खोरीं पृथ्वीवर आकारास येत असतात."

मैनेचा पहिला प्रवास आटोपल्यावर थोरो आपल्या वाल्डेनमधल्या पर्णकुटींत जाऊन राहिला होता. त्यानें टाडनच्या आपल्या ह्या प्रवासाचें वर्णन लिहून काढलें आणि होरेस ग्रीलेनें ते त्याच्यासाठीं छापून प्रकाशित करवलें. नंतरच्या वर्षांत त्यान दोन वेळां मैनेचा दौरा केला. वन्य प्रदेशांत एकाकीपणें राहणारे आदिम निवासी इंडियन आणि सांबरें यांच्याविषयीं अधिक माहिती मिळवणें हा त्याचा उद्देश होता. त्याला पालेसि हा इंडियन वाटाड्या भेटला आणि त्याची थोरोवर चांगलीच छाप पडली. इंडियन जसा असावा थेट तसा तो होता ! शांत, पुरुषार्थी, चाणाक्ष, शिकारींत हुशार, माग काढण्यांत प्रवीण, कुशल नावाडी, इंडियन विद्येंत पारंगत, वन्य पशूंच्या हालचालींचा होरा असलेला, असा तो होता. थोरोच्या मनांत वन्य जमातीची आदर्श मूर्ति वसत होती त्याच्या जवळपास पोंचणारा परंतु थोडा माणसाळलेला आणि सुसंस्कृत झालेला असा तो जो–" झाडांच्या सालीमुळ्यांनीं सांधलेला पडाव शिंगांच्या वल्ह्यांनीं वल्हवीत तो नेई. त्याचें व्यक्तित्व कांहींसें अस्पष्ट आणि धुकेजलें मला भासतें. तराफा आणि पडाव यांच्यांतील कालावधीचा जणुं त्याच्यावर पडदा असावा. तो लाकडी ओंडक्याचें घर बांधीत नाहीं तर कातड्याच्या राहुट्या उभारतो. तो गरम पाव खात नाहीं कीं गोडा केक, द्राक्षांचा रस, सांबरांचें मांस आणि अस्वलांची चरबी हा त्याचा आहार आहे तो मिलीनॉकेटवर चढून जातो आणि मला दिसेनासा होतो...... अशा रीतीनें लाल चेहऱ्याच्या माणसांच्या मार्गानेंच तो चालतो."

लेखनकलेविषयीं थोरोला पुष्कळ लिहावयाचें होतें. " एखादा निशाणबाज बंदूकवाला जितक्या अचूक आणि सहजरीतीनें आपलें शस्त्र रोखतो तितक्याच कौशल्यानें त्याचीं वाक्यें रोखलेलीं असत," असें तो म्हणे.

एखादें वाक्य लिहिणें, हीदेखील एक चांगली झटापट असे. ह्यापेक्षां अधिक भव्य असें काम त्याच्या गणतींत नव्हतें. आपली पाठ भिंतीला भिडलेली असूनहिं त्याचा यत्किंचितहि दबाव असल्यासारखें आपल्या चेहऱ्यावर उमटून पडूं नये तसें लेखन असलें पाहिजे. ज्याचे शब्द स्वतःच्या अनुभूतींतून अनुप्राणित होऊन येत नसतील त्याचें व्यर्थ कालहरणच होत असतें. भावबळ नसलेले शब्द हे निर्जीव ठरतात. त्यानें म्हटलें आहे : " आपल्या निवडलेल्या कथासूत्रावर लिहिणें हें व्यर्थ होय. आपल्या मनांत त्यांनीं ज्योत प्रज्वलित करीपर्यंत आपण वाट पाहिली पाहिजे. कोणताहि प्रयत्न सफल व्हायचा तर त्याच्यामागें नवनिर्मितिक्षम अशी प्रेमाची शक्ति असली पाहिजे. " जॉर्ज मिनोट या शेजारच्या शेतकऱ्याच्या वर्णनशक्तीचें त्याला कौतुक होतें. " मिनोटचें शब्द म्हणजे देखणे, जुने इंग्लीश शब्द ! ते सगळे शब्दकोशांत सांपडतील याबाबत मी संपूर्ण निःशंक असे. परंतु मला पूर्वायुष्यांत ते कधींहि ऐकूं आलेले नसत....एखादा सामान्य माणूस वाल्डेन तलावाबद्दल बोलूं लागला कीं माझ्यासमोर एक गढूळ पाण्याचें उथळ डबकें उभें रहातें. ना त्या पाण्यांत कसलें प्रतिबिंब, ना त्याला कुठला एक रंग. पण मिनोट बोलूं लागला कीं हिरवेगार गहिरें पाणी आणि त्यांत पडलेलें डोंगराचें प्रतिबिंब क्षणार्धांत माझ्या डोळ्यांपुढें उभें रहातें ! कारण तो तेथें होता. तो ज्या जंगलांतून जातो त्या जंगलांतील पानांची सळसळ माझ्या कानीं येते." वाक्य हें आरंभापासून शेवटापर्यंत सरळ धांवत गेल्यासारखें असलें पाहिजे. त्यांत कृत्रिमता आणि बोजडपणा असतां कामा नये. कुठेंहि अडखळल्यासारखें होऊं नये. लेखकानें हातांत कधींतरी नांगर धरला आहे असें तें वाचतांच वाटलें पाहिजे. थोरो असें उद्गार काढतो तेव्हां त्याच्या डोळ्यांसमोर मिनोटसारख्या व्यक्ति असल्या पाहिजेत. वाक्य प्रभावी होण्यासाठीं तें ' रुचीनें ' लिहिलेलें असलें पाहिजे. " सर्व अवयवांचा आणि शरीराचा मनाशीं मेळ असला पाहिजे. आविष्कार ही मानवाच्या सर्व व्यक्तिमत्त्वाची क्रिया आहे, नुसत्या लेखणीची नव्हे ! " वाल्डेन लिहिण्यापूर्वींच अनेक वर्षें कोणती शैली आपल्याला हस्तगत करावयाची आहे याची त्याला जाणीव होती. " वाक्यें शब्दांनीं सांगतात त्यापेक्षां कितीतरी अधिक त्यांनी सूचित केलें पाहिजे. त्या प्रत्येक वाक्याभोवतीं एक

वातावरण असलें पाहिजे. हीं वाक्यें म्हणजे जुन्याचें कथन असतां कामा नये, तर त्यांनीं नव्याची छाप पाडली पाहिजे. हीं वाक्यें अर्थानें ओसंडणारी आणि रोमन कालव्यांप्रमाणें चिरकाल टिकणारीं असलीं पाहिजेत. अशीं वाक्यें लिहिणें याचें नांव लेखनकला! वाक्यें लिहिण्यासाठीं आपण आपलें आयुष्य आणि शक्ति इतकी खर्च करतों, कागदावर ती कशी घासूनपुसून सुबक केलेलीं वाटतात, वर, खालीं, आरपार तीं कागदावर असतात, ज्या वाक्यांत दुसऱ्या वाक्याचीं बीजें असतात, तीं वाक्यें पूर्वींचा प्रतिध्वनि असत नाहींत तर नवरचना असतें, ज्याच्यावर किल्ले उभारतां येतील अशी जमीन विकण्यासारखी हीं वाक्यें असलीं पाहिजेत." थोरोच्या दृष्टीनें शैली हा व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता. "तुमचें व्यक्तिमत्त्व जेवढें परिपूर्ण असेल तेवढेंच सुंदर तुमच्या लेखणींतून उमटेल. प्रत्येक वाक्य म्हणजे तुम्हांला मनुष्यस्वभावाची जी दीर्घकाल पारख आहे त्याचाच आविष्कार होय. लेखकाचें व्यक्तित्व मुखपृष्ठापासून समाप्तीच्या पानापर्यंत वाचलें जातें. त्यांतील मुद्रण-दोष तो कधींच सुधारीत नसतो."

थोरो हा निसर्गवेत्ता, मोजणीदार आणि शेतीचा गहिरा शौक असणारा मनुष्य असल्यानें कॉन्कॉर्डचा परिसर धुंडाळणारा तो प्रमुख संशोधक होता. आपल्या शेजाऱ्यांना त्यांच्या शेतांबद्दल शिकवण्यासारखें त्याच्यापाशीं खूपच होतें. पाहिल्या दृष्ट भेटींत थोरो हा एक भटक्या बदमाश आहे, अशी ज्यांची कल्पना झाली होती त्यांना स्वतःच आपण त्याचे एक चाहते आणि मित्र बनल्याचें पुढें आढळून आलें आणि त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. अत्यंत कष्टाळू आणि कल्पनाशून्य शेतकरी हा जणुं न्यू इंग्लंडचा कणा! त्यांना वास्तविक थोरोच्या अविश्रांत भटकण्याचें विशेष कौतुक वाटूं नये. परंतु त्यांनाहि वाटू लागलें कीं तो निष्कारण फिरत नाहीं. कांहींतरी विशिष्ट हेतूनें फिरतो आहे. ससाणे आणि बदकें यांची वर्गवारी करण्यासाठीं ते त्याच्याकडे घेऊन येत. कांहीं अनोळखी वनस्पति आणीत. आणि त्याच्या चौकशांना न कंटाळतां उत्तरें देऊन हवी तेवढी माहिती त्याला सांगत. अशा मंडळींपैकीं एकानें म्हटलें आहे. : "त्याचें वागणेंसवरणें अगदीं सरळ असे. इतरांशीं जुळवून घेण्याकडे त्याच्या मनाचा कल असे...माझ्या शेतांतून तो जातांना दिसला कीं मला त्याच्यापाशीं

जाऊन बोलावेसें वाटे......आपल्याला इच्छा असेल तितका वेळ बोलण्याची त्याची तयारी असे. आणि तो जें कांहीं बोले त्यांत नावीन्य असे.'' आपल्या तथाकथित सुसंस्कृत परिचितांपेक्षां ह्या ग्रामीण लोकांना थोरो अधिक थोर समजतो. आणि आपल्या दंतकथा नोंदवहींत टिपून घेण्याचें त्याला फार महत्त्व वाटतें, ही गोष्ट त्यांना कळली तर त्यांना केवढें आश्चर्य वाटलें असतें.

थोरोची दैनंदिनी म्हणजे अमाप रत्नांची खाण आहे. त्याचें संशोधन त्यानें मोठ्या उल्हासानें केलें. परंतु अद्यापहि कोणी कष्टाळू संशोधक खटपट करील तर त्यांतून एक दोन चांगल्या पुस्तकांचा मसाला त्याला मिळूं शकेल. फ्रान्सिस एच्. ॲलन यांचें ' मेन ऑफ कॉंकॉर्ड' हें एक असें अद्वितीय प्रसन्न पुस्तक आहे. थोरोनें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांविषयीं ज्या नोंदी केल्या त्यांच्याच आधारें तें पुस्तक बव्हंशीं तयार केलें आहे. थोरोला त्या परिसरांतील सर्वांविषयीं–बुद्धिवादी, खेळाडू, भणंग, नवागत, अक्करमाशे, शेतकरी, जंगलांची तोड करणारे, भटके–यांच्याविषयीं जें प्रेम वाटे आणि त्यांच्या जीवनांत त्याला जी गोडी असे त्याची खात्री ' मेन ऑफ कॉंकॉर्ड' वरून पटते. साध्याभोळ्या मनाच्या माणसांची गाठभेट घेण्यांत त्याला विशेष आनंद वाटे. जुन्या ब्रूक क्लार्क यांचें नांव उदाहरणादाखल घेतां येईल. हातीं कुऱ्हाड घेऊन रस्त्यावरून घाईघाईनें जातांना ते त्याला भेटतात. "सुटलेलें झोंबरें गार वारें आपल्या उघड्या पायांना लागूं नये म्हणून त्याची ती धडपड असावी." त्यानें आपल्या मोजांत कांहीं रानफळें आणि एक मेलेली सारिका ठेवली होती. "त्याच्या विरलेल्या कोटाच्या चिंध्या कंबरेशीं लोंबत होत्या आणि पाटलोणीची तीच दशा उघड्या पायापाशीं झाली होती." एखाद्या तरुणानें ज्या उत्साहानें रानांत जाऊन काय हातीं पडतें तें पहायला निघावें तसा तो बहुधा त्या सोसाट्याच्या गार वाऱ्यांत बाहेर पडला असावा, असें त्याच्याकडे पाहिल्यावर वाटत होतें. हे म्हातारबुवा, जीवनाच्या नियमनाचें बळ अगदीं क्षीण झालेलें असतांना, डोकें जमिनीला लागावें इतकें कबरेंतून वाकलें असतांना आयुष्याच्या संध्याकाळीं एखाद्या बालकाच्या उत्साहानें आणि आनंदानें जीवनाचा आस्वाद घेतांना पाहून मला भारी आनंद झाला."

आणि तो अलेक थेरियन. मोठा गमतीदार इसम. वाल्डेनच्या जंगलांतला तो एकाकी जंगलतोड्या. " जणुं एखाद्या ओबडधोबड साचांतून ओतलेला. चांगला उंचापुरा, पण मंद देहाचा. त्याची चाल ऐटबाज असे. सूर्याच्या उन्हानें त्याची मान काळी पडलेली. केस काळे, भुरभुरणारे. डोळे निळे आणि मंद, झोपाळू.... त्याचें झाड तोडणें अगदीं जमिनीसरसें सपाट असे. असें झाड तोडलें कीं नवे येणारे अंकुर अधिक जोमदार असतात. आणि घसरगाड्यांतून सहज त्या बुंध्यांवरून जातां येते...मला त्याच्याबद्दल कुतूहल वाटलें; कारण तो अगदीं शांत, समाधानी आणि एकाकी दिसत होता. विलक्षण आनंदी. त्याच्या हंसऱ्या डोळ्यांतून समाधान ओसंडत होतें. त्याचा आनंद निर्भेळ होता. निसर्गानें त्याला घडवतांना दणकट शरीर दिलें आणि जें वाट्याला येईल त्यांत समाधान मानणारें मन दिलें. त्यानें आपल्या वाट्याला आलेलीं शंभर वर्षें मुलाप्रमाणें जगावीं म्हणून त्याची घडण सर्व बाजूंनीं पवित्र हातांनीं आणि विश्वासपूर्वक केली...एकदां एका प्रख्यात विद्वान आणि समाजसुधारक व्यक्तीनें म्हणे त्याला विचारलें कीं हें जग बदलावें असें तुला वाटतें कीं नाहीं? आश्चर्यानें गालांतल्या गालांत हंसत, कॅनेडियन हेल काढीत, पूर्वीं ह्या प्रश्नाचा आपण कधीं विचारदेखील केलेला नाहीं, हें विसरून तो म्हणाला : ' छे छे, मला ते भरपूर आवडतें ! '

रुबेन राइस ही आणखी एक व्यक्ति. स्वावलंबन आणि काटकसर यामुळें त्याला जीवनांत जें हवें तें लाभलें होतें. त्याचें काम " धीरे धीरे, पण खात्रीपूर्वक चाले. त्या प्रत्येकांतली गोडी चाखीत चाखीत तो तें करी." जॉर्ज मेलवीन हा त्याला बहुधा शेताभोंवतीं घिरट्या घालतांना भेटायचा. त्याच्या हातीं बंदूक आणि जवळ कुत्रा ठेवलेला ! थोरोनें लिहून ठेवलें आहे, " मेलवीनला पाहिलें कीं दैवानें आपल्यावर खैर केली असें मला वाटतें... त्याच्या आईची, बिचारीची तो सत्त्वपरीक्षाच पहात असतो. डोंगरावरच्या लालसर राकट झाडाच्या सालीसारखा तो दिसतो. मला आवडतो... चमत्कारिक, लाजाळू, ढिलपट, स्वतःच्या मागें जणुं पाय फरफटत चालणारा मेलवीन माझा समकालीन आणि शेजारी आहे. त्याची एक जात आहे तर माझी दुसरी. आणि तरीहि आमच्यांत वैर नाहीं." आणि तो भटक्या बिल व्हीलर. तो कोठारांत झोपायचा. "तो एकटाच भटकायचा, कांहींहि

काम करायचा नाहीं. नात्यागोत्याचें त्याला कोणी नव्हतें…कुठलीहि महत्त्वाकांक्षा त्याला नव्हती…इतरांचें आपल्याविषयीं चांगलें मत असावें याची त्याला फिकीर नव्हती. एखादा बेडूक बागवानाकडे पाहतो तशा निःपक्षपाती आणि निरपेक्ष नजरेनें त्यानें कां पाहूं नये?" आणि तो एकाक्ष जॉन गूडविन. मासे मारून किंवा वाहात आलेलीं नदींतलीं लाकडें धरून किंवा अधेमधें मजुरी करून तो कसाबसा गुजारा करीत असे. पण होता सुखी जीव! थोरोला तिथल्या कोळ्यांचें मोठें कौतुक. गारफिल्ड, मायनर, पफर, हेनेस यांच्याकडून माशा-कासवांच्या गोष्टी ऐकतांना त्याला कधीं म्हणून कंटाळा यायचा नाहीं. ही सगळी मंडळी मोठी तत्त्वज्ञानी आहेत असें त्याला आढळून आलें होतें. "अबोल, साध्याभोळ्या अशा ह्या माझ्या शेजाऱ्यांबद्दल, माझ्या देशबांधवांबद्दल मला मोठें प्रेम वाटतें" असें तो म्हणतो. त्यानें लिहून ठेवलें आहे, "ते स्वतःच्या कामांत दंग असतात आणि माझ्या अध्यांतमध्यांत पडत नाहींत.… व्हिआस, होर, ख्रिस्त आणि शेक्सपिअर या अवनीतलावर झाले म्हणून मला कृतज्ञता वाटते असें नव्हे तर मिनोर, टाइम, मलवीन, गूडविन, पफर ही मंडळी जन्माला आली म्हणूनहि मला कृतज्ञता वाटतें."

त्याची कॉंकॉर्डमधल्या एका व्यापक सहानुभूतीच्या आणि कुशाग्र बुद्धीच्या शेतकऱ्याशीं गांठ पडली. व्यावहारिक गोष्टींबद्दल मार्गदर्शन घ्यायला इमर्सनदेखील त्याच्याकडे जात असे. हॉथॉर्न त्याच्या भरभक्कम नैसर्गिक शहाणपणामुळें त्याचा चाहता बनला होता. एडमंड होसमरला सरळ भावानें वेगवेगळ्या कल्पनांची केलेली चर्चा आवडे आणि थोरोबद्दल त्याला स्वाभाविकच प्रेम वाटे. 'वाल्डेन' मध्यें थोरोनें "शांत स्वभावाचा शेतकरी" असें त्याचें वर्णन केलें आहे. "लांब जंगलांतून तो आलेला असल्यानें कुठलीहि सामाजिक विकृति त्याच्यांत अद्याप आलेली नाहीं…धर्म आणि शासन यांच्यापासून चांगलें घेण्याइतकाच तत्पर तो खताच्या कोठारांतून खत उपसतानांहि असतो! आम्ही साध्या सरळ जीवनाच्या काळाबद्दल बोलत असूं. त्या काळीं चावऱ्या थंडींत लोक मोठमोठ्या शेकोट्यांभोंवतीं, निर्मळ मनानें बसत…"

● ● ●

## ९

*"वनस्पतिशास्त्र किंवा तत्सम एखाद्या शास्त्रांतील एखाद्या विशिष्ट कामांत मी गुंतलेलों नाहीं! परंतु जर मी जगलोंवांचलों तर निसर्गाबद्दल मात्र सांगण्यासारखें सामान्यतः मजजवळ पुष्कळ आहे."*

—मार्च १८६२ मधील थोरोचें एक पत्र.

हॉथॉर्न आणि थोरो यांनीं मिळून उन्हाळ्यांत मोठ्या आनंदानें भटकंती केली होती आणि हिंवाळ्यांत बर्फावरून घसरण्याच्या खेळासाठींहि ते कित्येक वेळीं गेले होते. हॉथॉर्ननें ओल्ड मॅनसे येथें हेनरीचें अनेक वेळां आदरातिथ्य केलें होतें. हेनरीनें तयार केलेल्या छोट्या मचव्याचें नांव जॉन ठेवलें होतें. तो मचवा घेऊन ते दोघे कॉंकॉर्ड व मेरीमॅक यांतून सफर करीत. हेनरीनें हॉथॉर्नला तो मचवा चालवायला शिकवलें होतें. हॉथॉर्नच्या दैनंदिनींतील नोंदींत थोरोच्या "ओबडधोबड आणि कांहींशा गांवढळ परंतु नम्र वागणुकीचा" उल्लेख आहे. थोरोच्या दैनंदिनींत हॉथॉर्नला "साधा आणि लहान मुलाप्रमाणें निरागस" म्हटलें आहे.

१८५४ मध्यें 'वाल्डेन' प्रसिद्ध झालें आणि सुसंकृत लोकांतील त्याच्या स्नेह्यांची संख्या वाढली. न्यू बेडफोर्डचा क्वेकर पंथी डॅनियल रिकेटसन हा 'वाल्डेन' या त्याच्या पुस्तकाचा एक वाचक. त्यानें अनेक वेळां थोरोला आपल्या घरीं आदरपूर्वक पाचारण केलें होतें आणि स्वतःहि कॉंकॉर्डला थोरोकडे तो अनेक वेळां भेटीसाठीं गेला होता. त्याचा क्वेकरपंथी साधेपणा थोरोला निःसंशय आवडला आणि त्यामुळें ते दोघे जिवश्चकंठश्च मित्र बनले. त्यांच्यांत नियमित पत्रव्यवहारहि सुरू झाला. थोरोच्या अखेरच्या दिवसांतल्या कितीतरी गोष्टी त्यामुळें रिकेटसनला अवगत झाल्या. श्रॉपशायरचा थॉमस चोलमंडले हा एक इंग्लिश मित्र थोरोला तें पुस्तक वाचून मिळाला.

तोहि भटक्या, लेखक आणि तत्त्वज्ञ होता. त्यानें न्यूझीलंडबद्दल लिहिलें होतें आणि पौरस्त्य अध्यात्म आणि पाश्चिमात्य विज्ञान यांची थोरोसारखीच त्याला गोडी होती. तो खरें म्हणजे इमर्सनला भेटायला म्हणून कॉंकॉर्डला आला, पण त्याची थोरोशींच गट्टी जमली, कारण दोघांच्या समान आवडी-निवडी. दुसऱ्या वर्षी इंग्लंडहून त्यानें थेरोला हिंदू लिखाणाचें चौऱ्हेचाळीस खंड भेट म्हणून पाठवले. वाल्डेननंतरच्या वर्षी कॉंकॉर्डला फ्रँकलिन बी. सॅनबोर्न हे एक तरुण शिक्षक आले. ते इमर्सनचे भक्त. ते थोरोचे चाहते बनले. हेनरीच्या आईला इतरांना जेऊंखाऊं घालण्यांत मोठा उत्साह वाटे. नंतरचीं तीन वर्षे तिनें या शिक्षकासाठींहि रांधण्याचें काम केलें. अशा प्रकारें त्यांच्या कुटुंबांतला एक घटक म्हणूनच सॅनबोर्न त्यांच्याकडे राहिला, आणि त्यांच्या सुधारक आणि अज्ञेयवादी विचारांशीं एकरूप होऊन वावरला. थोरोचा जवळून अभ्यास करण्याची त्याला अद्वितीय अशी संधि मिळाली आणि अनेक वर्षांनंतर त्यानें थोरोचें अमोल असें चारित्र लिहिलें.

भावनाशील आणि अतिअज्ञेयवादी एलरी चॅनिंग हा थोरोचा पहिला चरित्रकार. तो त्याचा अगदीं अंतरंग मित्र. परंतु आपल्या दैनंदिनींत आपल्या अंतःकरणांतील खळबळी आणि संशय यांची जी नोंद थोरोनें केली आहे त्यासंबंधीं चॅनिंगशीं त्यानें मनमोकळी चर्चा केल्याचें आढळत नाहीं. तलावाकाठच्या त्याच्या झोपडीला भेट देणारा चॅनिंग हा कवि. थोरो विनोदानें म्हणतो : " अत्यंत दूरवरच्या प्रदेशांतून...सखोल अशा हिमांतून आणि अत्यंत भयाण अशा तुफानांतून जातांना शेतकरी असो कीं शिकारी असो, वार्ताहर असो किंवा तत्त्वज्ञदेखील असो, तो घाबरल्या-वांचून राहताना, परंतु निर्मळ प्रेमानें उद्युक्त झालेल्या कवीला कोण माघारीं फिरवणार ? " त्यांचें हंसणें तुफान आणि चर्चा घनगंभीर अशा चालत. वाल्डेनला हिंवाळ्यांत संध्याकाळीं त्यांचा हा कार्यक्रम चाले. त्यावेळीं खिरीचें जेवण दिलें जाई. त्यामुळें " सणासुदीसारखें प्रसन्न वातावरण आणि तत्त्वज्ञानासाठीं लागणारें निरभ्र मन " उपलब्ध होई. मॅसाच्युसेट्स-मधील वोरसेस्टरचा हॅरिसन ब्लेक हा त्याच्या अखेरच्या वर्षांतला एक महत्त्वाचा स्नेही. हॉर्वर्डला असतांना त्याची थोरोशीं पुसटशी ओळख झालेली होती. ' द डायल'मधलें थोरोचें लिखाण त्यानें वाचलें होतें, आणि

१२०१३८

कित्येक वर्षें त्याला थोरोकडून नीतिविषयक लांब लांब पत्रें येत होतीं. ह्या पत्रांत थोरोची सर्वोत्कृष्ट शैली उतरली आहे असें म्हणतां येणार नाहीं, पण त्याच्या चरित्रकारांना उपयोगी असा मालमसाला मात्र त्यांत आहे. कारण ह्या पत्रांतच थोरोनें अत्यंत मनमोकळेपणानें आणि आपलेपणानें लिहिलें आहे. ब्लेकच्या निमंत्रणावरूनच जवळजवळ दर वर्षी थोरो वोरसेस्टरला व्याख्यानाला जाई.

'द न्यूयॉर्क ट्रिब्यून'चा होरेस ग्रीले हा अखेरपर्यंत त्याचें साहित्य प्रकाशांत आणण्याच्या कामीं त्याचा साहाय्यक होता. पुष्कळ वेळां त्यासाठीं त्याला पदरमोडहि करावी लागे. (एकदां त्यानें स्वतःच्या खिशांतलें पाऊणशें डॉलर्स त्यासाठीं इसार म्हणून दिले होते.) आणि तो अलकॉट. त्याच्या छोट्या मुली आतां " छोट्या गृहिणी " बनत होत्या. परंतु त्यांच्या ध्येयवादी " खांद्यांवरील कौटुंबिक बोजा पूर्वींप्रमाणेंच अगदीं हलका असा होता." अलकॉटच्या सामूहिक व्यवहारांशीं जरी थोरो कधीं समरस झाला नाहीं तरी आपल्या ह्या जुन्या मित्राचें सरळ वागणें आणि निर्भय विचार, याबद्दल मात्र थोरोला आदर वाटे. उन्हाळीं घरें बांधण्याबाबत जरी तो फारसा यशस्वी झाला नसला तरी त्यामुळें, थोरो म्हणे, " आमच्या भेटींत कधीं प्रत्यवाय आला नाहीं. त्याचा कसला आग्रह नसे. एखाद्या संस्थेचा ठेका त्यानें घेतलेला नव्हता. त्याच्यासारखा सरळ मनुष्य मला दुसरा भेटला नाहीं...."

थोरोला स्त्रियांचा स्नेह आयुष्यांत सदैव लाभला. परंतु तरुण सुंदर मुलींना मात्र त्यानें सतत टाळलें, हें एक वैशिष्ट्य असल्याचें त्यानें मान्य केलें आहे. " या बाबतींत कदाचित् माझ्या स्वभावांत कांहीं उणीव असू शकेल. आणि एखाद्या तरुणीचे अवयव रेखीव आहेत एवढ्याच कारणासाठीं तिच्याशीं अर्धा घंटा बोलत बसण्यांत मला कुठलाहि आनंद मिळत नाहीं. तरुण स्त्रियांची जी कांहीं ओळख मला आहे त्यावरून माझें असें मत झालें आहे कीं तरुणींचा समाज हा अगदींच लाभशून्य असतो." या त्याच्या भावनेपाठीमागें विफलग्रस्त ब्रह्मचाऱ्याचें मनहि असेल, कदाचित् एलन सीवॉलच्या रेंगाळणाऱ्या आठवणी असतील. तें कांहींहि असो, एक गोष्ट मात्र खरी कीं एलननंतर त्यानें स्त्रीस्नेह लिडियन इमर्सनसारख्यांपुरताच

मर्यादित केला. ( अर्थात् कालान्तरानें तिचें वागणेंदेखील संकोचाचें होत गेलें.) तिची बहीण लकी जॅकसन ब्राउन हिच्या खिडकींतून एक भावगीत आणि निळ्या फुलझाडांचा एक गुच्छ वयाच्या विसाव्या वर्षी त्यानें टाकला होता, हीहि त्याच्या स्त्री-स्नेहांतली एक घटना आहे. आणखी एक स्त्री म्हणजे कॉंकॉर्डची माता शोभणारी, इमर्सनची म्हातारी, परंतु अतिशय हुशार अशी आत्या मेरी. थोरो तिच्याकडे वरचेवर जात असे. थोरोच्या मनाचें चैतन्य तिला आवडे, परंतु त्याच्या धर्मविषयक मतांमुळें मात्र तिच्या मनाला रुखरुख लागून राही. ती त्याला म्हणे, " मी तरुण होतें तेव्हां इतकें स्वतंत्र असण्याची रीत नव्हती." परंतु या ऐंशी वर्षांच्या म्हातारीजवळ मनाचा मोठा लवचिकपणा होता. थोरोचीं मतें समजून घेण्याची तिच्यांत जेवढी उत्सुकता होती तेवढी कॉंकॉर्डमधील त्याच्या ओळखीच्या कोणत्याहि तरुण स्त्रींत त्याला आढळली नाहीं.

आणि इमर्सन? वरवर पाहणाऱ्यांना दिवसेंदिवस ते दोघे परस्परांच्या अधिकाधिक निकट येत आहेत असें वाटलें असतें. हेनरीचें इमर्सनच्या घरीं जाणें-येणें चालूच होतें. आणि राल्फ वाल्डो आणि तो, दोघे आतां अधिक वेळां निसर्गनिरीक्षणासाठीं बरोबर जात होते. या दुपारच्या सहलींच्या वेळीं परस्परांच्या सहवासांत ते मोठे प्रसन्न असत. परंतु वस्तुतः त्या दोघांमधलें अंतर बरेंच वाढलें होतें. आणि विशेषतः इमर्सनच्या घरीं संध्याकाळीं त्यांच्या चर्चा होत त्यांतून हें अंतर वाढत होतें. समान प्रेरणांनीं सत्याचा शोध घेण्याला उद्युक्त झालेले ते आत्मे राहिले नव्हते. उलट आपल्याला ह्या दोन तत्त्वज्ञांत परस्परांना खोडून काढण्याची स्पर्धा सुरू झाल्याचें आढळतें. एकांगीपणामुळें त्यांच्यांतली परस्परसहिष्णुताहि विलयास जात असल्यासारखें जाणवतें. प्रत्येकानें आपल्या दैनंदिनींत दुसऱ्याला दोष दिला आहे. १८५३ च्या मे महिन्यांत थोरोनें लिहून ठेवलें : " रॉ. वा. इ. शीं बोललों—नव्हे बोलण्याचा प्रयत्न केला. सगळा वेळ वाया गेला ! माझें स्वत्वच जणुं हरपलें. आमचें ज्या बाबतींत मतैक्य तेथेंच लटका विरोध उभा करून, तो जणुं वाऱ्याशीं हुज्जत घातल्यासारखा मला ठाऊक असलेल्या गोष्टीच मला समजावून सांगूं लागला. आणि मग मींहि त्याला विरोध

करणारा कोणीतरी वेगळा इसम असल्यासारखी स्वतःबद्दल कल्पना करून घेण्यांत आपला वेळ दवडला. " इमर्सनच्या दैनंदिनींत अशा मतभेदांच्या प्रसंगांची नोंद वारंवार केलेली आढळते, पण बहुधा थोरोसंबंधीं हळुवार उल्लेख केलेला दिसतो. रागापेक्षां खेदाचीच भावना त्यांत अधिक जाणवते. १८५६मध्यें इमर्सन लिहितो : " केवळ थोरोच विचारांत घेतला तर चांगल्या माणसांत सहकार्य होणें अशक्य आहे, असेंच मला वाटलें असतें. आपण सतत विजयाच्याच धुंदींत बोलावें आणि सत्यासाठीं, सुखासाठीं, आनंदासाठीं बोलूं नये असें थोडेंच आहे? खरोखर त्याचें व्यक्तिमत्त्व वेधक आहे, त्याची समजशक्ति दांडगी आहे आणि अलौकिकाचें त्याला देणें आहे... त्याला सत्याचें दर्शन आहे... त्यासाठीं लागणारी नैतिक सचोटी त्याच्या-पाशीं आहे. परंतु हें सर्व, आणि त्याची विनोदबुद्धि आणि संशोधकबाणा ... यांना मी पारखा झालों आहें. वर्षांपाठीमागून वर्षें मी त्याच्या मनाचा ठाव घेण्याचे जो जो प्रयोग करतों तों तों तो मला दुरावतो आहे. दर वेळीं कुठलातरी विरोधाभास उभा करून तो हुज्जत घालूं लागतों आणि त्यामुळें आपला वेळ आणि मनःशांति दोन्हीला आपण आंचवतों. " त्या दोघांत परस्परांबद्दल परकेपणा आलेला पाहून खेद वाटतो. आणि विशेषतः दोघांनीं स्नेहाची थोरवी गाणारें जें लिखाण केलें आहे तें वाचलें म्हणजे तर हा खेद अधिकच वाढतो. दोघांच्या मनांत स्नेहभावनेला फार उच्च स्थान होतें, पण त्या आदर्शांची किंमत त्यांना आतां वैफल्यभावनेच्या रूपांत चुकती करण्याची पाळी आली होती.

१८५६ मध्यें अलकॉट हेनरीला घेऊन न्यूयॉर्कजवळ पर्थ एम्बॉम या ठिकाणीं गेला. तेथें एक सामुदायिक जीवनाचा प्रयोग करण्याचा अलकॉटचा विचार होता आणि म्हणून त्या जमिनीची पाहणी व मोजणी हेनरीकडून त्याला करवून घ्यायची होती. महिनाभर ते तिकडेच होते. हेनरीला नव्या वसाहतीपेक्षांहि तेथील भूस्तरामध्यें अधिक गोडी होती. एक दिवस त्या काळांतील एक विशेष लोकप्रिय कवि वॉल्ट व्हिटमन त्याची त्यांनीं न्यूयॉर्कमध्यें भेट घेतली. 'लीव्हज् ऑफ ग्रास' हें त्याचें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें आणि त्यामुळें परंपरावाद्यांत मोठी खळबळ माजली होती. कारण त्यांत स्पष्टस्पष्ट ऐहिकता दिसून येते. कर्मठपणामुळें 'लीव्हज् ऑफ

ग्रास ' चें सौंदर्य समजून घेणें थोरोलाहि अवघड गेलें. एकांतप्रेमी आणि शहरप्रेमी अशा दोघांची गांठ घालून दिली कीं गंमत पहायला मिळेल असा अलकॉटचा होरा होता. परंतु ते दोघे लेखक जागरूकपणें आणि हातचें राखून एकमेकांशीं बोलत होते आणि त्यामुळें बोटावर मोजण्याइतक्याच चकमकी त्यांच्यांत उडाल्या. थोरोची " सर्वसामान्य लोकांबद्दलची तुच्छताबुद्धि " व्हिटमनला आवडली नाहीं. अर्थात् यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. कारण व्हिटमननें त्याला तोंडावरच सांगितलें होतें कीं," मला बावा ब्रॉडवेवरून दिवसभर ऑमनी बसमध्यें ड्रायव्हरशेजारीं बसून गाड्यांचा गदारोळ पहात आणि कांहीं वेळां हातवारे करीत, जोरजोरांत होमरची निर्भर्त्सना करीत हिंडायला आवडते." हेनरीला इतका आपल्याशीं सर्वस्वीं विसदृश मनुष्य कधीं मिळाला नव्हता. व्हिटमनमध्यें एक अपरिचितपणा त्याला जाणवला आणि तो कच्चा वाटला. पाहिल्यांदा त्याचें मन त्यापासून परावृत्त झालें, परंतु नंतर मात्र त्याची शक्ति त्याला स्फूर्तिदायक वाटली. त्यानें ' लीव्हज् ऑफ ग्रास ' चें पुनर्वाचन केलें आणि या वेळीं त्यासंबंधीं लिहिलें: " गेल्या कित्येक वर्षांत मी कांहीं वाचन केलें त्यापेक्षां ह्या वाचनानें मला कितीतरी फायदा झाला आहे." व्हिटमनच्या कवितांतील अविभाज्य अभिजातपणा आणि मुळांतील प्रांजळपणा यांचा तो चाहता बनला आणि त्याला असें आढळून आलें कीं व्हिटमन काय किंवा तो स्वतः काय, त्यांच्या स्फूर्तीचा उगम निर्मळ आणि मूलभूत स्वरूपाच्या गोष्टींतच आहे.

१८५६ मध्यें थोरोच्या जीवनांत न्यूयॉर्क आणि व्हिटमन हें एक वेगळेंच प्रकरण शिरलें आणि आपल्या निसर्गाभ्यासापासून थोरो कांहींसा चळला आणि समकालीन घटनांच्या विश्वांत वावरूं लागला. १८५० च्या फ्युजिटिव्ह स्लेव्ह ॲक्टमुळें त्याच्या जीवनांत प्रक्षोभ उत्पन्न झाला आणि त्यांतूनच ' स्लेव्हरी इन मॅसाच्युसेट्स ' लिहिलें गेलें. पण ती त्याची अवस्था आतां मागें पडली. क्वचित् गुलामगिरीविरोधाला पाठिंबा द्यायला तो उद्युक्त होतहि असे, परंतु आतां त्यामुळें त्याला कच्च्या दुव्याला स्पर्श केल्यासारखें वाटे. त्यानें थोडक्यांत पण अत्यंत बोलक्या पद्धतीनें आपला निषेध नोंदवला आणि संघाटित चळवळींतून अंग काढून घेऊन आपल्या भोवतींच्या एफ्. बी. सॅनबोर्नसारख्या जातिवंत उत्साही मित्रांवर तें काम

सोडून दिलें. परंतु ‘ स्लेव्हरी इन मॅसाच्युसेट्स ’ लिहिल्यानंतर तीन वर्षांनीं थोरोच्या घरीं एक इसम आला. त्या माणसाच्या कल्पना, त्याचें व्यक्तित्व आणि भवितव्य यांच्यामुळें थोरोमधील सर्व भावबळ आणि वक्तृत्व पूर्वीं कधीं नव्हतें इतक्या मोठ्या प्रमाणांत बहरास आलें. दुसऱ्या कोणत्याहि माणसाच्या संदर्भांत असें पूर्वीं घडलें नव्हतें. हा मनुष्य म्हणजे प्रसिद्ध वृद्ध जॉन ब्राउन. तो कन्सासमधील ओसावाटोमीचा. कन्सास आणि मिसुरी या दोन राज्यांच्या सीमेवर जें क्रूर युद्ध झालें त्याच्यांत तो होता. त्या ठिकाणीं दोन्ही बाजूंनीं रक्ताचे प्रचंड सडे पडले. तो जॉन ब्राउन १८५७ सालीं मॅसाच्युसेट्सला गुलामगिरीविरोधी युद्धाच्या बाजूनें लोकमत वळवण्याच्या हेतूनें आला होता. नेमस्तांनीं वेडापीर म्हणून त्याची संभावना केली तरी सॅनबोर्न आणि त्याच्या मित्रांनीं मात्र त्याचें अत्यंत उत्साहानें स्वागत केलें. सॅनबोर्नच ब्राउनला कॉंकॉर्डला घेऊन आला. गुलामगिरी प्रथेविरुद्ध मत असलेल्या लोकांच्या गांठी-भेटी घालून देणें हा त्याचा उद्देश. गुलामगिरीचा पुरस्कार करणाऱ्या राज्यांच्याविरुद्ध संघटित कारवाई करण्याबाबत थोरोला विशेष आस्था नसली तरी जॉन ब्राउनच्या व्यक्तित्वाचा त्याच्यावर इमर्सन-प्रमाणेंच प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाहीं. त्याची बावनकशी निष्ठा आणि त्या एकाच गोष्टीचा त्याला लागलेला ध्यास, हा संक्रामक होता. जर उत्तरेकडून त्याला सार्वत्रिक पाठिंबा मिळाला असतां तर एखाद्या वेळीं थोरोचा उत्साह कमी पडला असता. परंतु गुलामगिरी अमान्य करणाऱ्या लोकांनींहि ब्राउनला कोरडी सहानुभूति तेवढी दाखवली. त्यामुळें हा कट्टर ध्येयवादी मनुष्य अन्याय आणि अन्यायी संस्था यांच्याविरुद्ध एकाकी लढत आहे, असें थोरोला वाटलें. बोस्टनमध्येंच प्रायः जमा केलेला निधि घेऊन ब्राउन त्याच्या जिवावर दक्षिणेंत व्हर्जिनियाला गेला आणि तेथें हार्पर्स फेरींत जाऊन केवळ त्यानें एकट्यानें गुलामगिरी प्रथेविरुद्ध सगळ्या राज्यांत आगडोंब पेटवण्याचा प्रयत्न केला, तेव्हां थोरोला तो सविनय कायदेभंगाची एक थोर प्रतिमा वाटला. ब्राउनच्या अटकेच्या वृत्तानें उत्स्फूर्त होऊन त्यानें ‘अ प्ली फॉर कॅप्टन जॉन ब्राउन’ हा निबंध लिहिला. ह्या प्रभावी निबंधांत त्यानें अन्यायी संस्थेविरुद्ध न्यायप्रिय माणसानें कोणत्या पद्धतीनें सक्रिय पावलें उचलावीं, याबाबतचीं आपलीं मतें पुन्हां एकदां मांडलीं.

ब्राउनवर खटला चालला आणि राष्ट्रद्रोहाचा आणि खुनाचा आरोप ठेवून त्याला सजा ठोठावण्यांत आली. मॅसाच्युसेट्स हा गुलामगिरीच्या प्रथेविरुद्ध असणारांचा बालेकिल्ला समजला जात होता. पण तेथेंहि ब्राउनच्या बाजूनें कोणीदेखील चार शब्द लिहिले नाहींत! पण आपल्या लोकप्रियतेवर होणाऱ्या आघाताची वा आपल्यावर कोसळणाऱ्या संकटांची पर्वा न करतां ब्राउनचा कैपक्ष घेऊन आखाड्यांत उतरण्याचा थोरोनें निश्चय केला.

त्याच्या मित्रांनीं त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्यानें निर्धार केला होता. ब्राउनच्या अटकेनंतर थोरोनें एक जाहीर सभा योजली. तिथें त्यानें ब्राउनच्या बाजूनें असें आत्मविश्वासपूर्वक आणि प्रभावी भाषण केलें कीं इमर्सनसारख्या श्रोत्यानें त्याच्या दैनंदिनींत लिहिलें कीं थोरोचें म्हणणें "सर्वांनीं अत्यंत आदरानें ऐकून घेतलें. कित्येकांनीं ज्या समरसतेनें तें ऐकलें त्यांना स्वतःला स्वतःचेंच आश्चर्य वाटलें." अशा रीतीनें ब्राउनच्या बाजूनें जाहीरपणें बोलणारा हा पहिला अमेरिकन ठरला. ब्राउन हा वैयक्तिक स्वातंत्र्यासाठीं हौतात्म्य पत्करणारा महापुरुष आहे, अशा शब्दांत त्यानें त्याची संभावना केली आणि अन्यायी शासनसंस्थेनें एका ध्ययनिष्ठ माणसाचा छळवाद मांडल्याबद्दल त्या शासनसंस्थेची त्यानें कडक निर्भर्त्सना केली. "अठराशें वर्षांपूर्वीं खिस्ताला सुळी दिले, आज सकाळीं कदाचित् कॅप्टन ब्राउन यांचीहि तीच गत झाली असेल! हीं झालीं साखळीचीं दोन टोकें. मध्यें या साखळीला अनेक दुवे असणारच." एका ठिकाणीं तरी त्याचें भाषण हें भविष्याचा यथातथ्य संकेत करणारें होतें. "संथपणें आणि यशस्वी रीतीनें या माणसानें गुलामगिरीच्या कुप्रथेविरुद्ध जें आंदोलन चालवलें...तें काय विस्मृतीच्या तळघरांत दडपलें जाईल असें वाटतें?" आणि तें तसें दडपलें गेलेंहि नाहीं. दोन वर्षांनीं ब्राउननें ज्या राज्यांवर पहिला हल्ला चढवला होता त्याच राज्यांच्या रोखानें उत्तरेकडील राज्यांची फौज कूच करतांना गात होती—

"जॉन ब्राउनचा देह
शवपेटिकेंत पडला आहे
पण त्याचा आत्मा
आज कूच करीत जात आहे."

थोरोला त्या माणसाच्या आत्म्याचीच फिकीर होती. त्यानंतर त्यानें वोस्टन आणि वोरसेस्टर या दोन ठिकाणीं जाहीर सभा घेऊन पुन्हां ब्राउनची तरफदारी करणारीं भाषणें केलीं आणि महिनाभरानें पुन्हां कॉंकॉर्डमध्येंहि त्यान् एक भाषण दिलें.

ह्या प्रक्षोभाचा कालान्तरानें बराचसा उपशम झाल्यानंतर थोरो पुन्हां निसर्गाकडे वळला आणि ती चळवळ आपल्या गतीनें विकसित व्हावी म्हणून त्यानें तिच्याशीं असलेला संबंध सोडून दिला. हार्पर फेरीमधील ब्राउनच्या कृत्याचे जे काय राजकीय परिणाम होणार होते त्याची त्याला फारशी फिकीर नव्हती.

दोन वर्षांनीं अखबी उत्तर ब्राउनला डोक्यावर घेऊन नाचूं लागली आणि ब्राउननें केलेल्या सगळ्या गोष्टी ईर्षेनें करूं लागली. परंतु थोरोवर त्याचा कांहीं प्रभाव पडला नाहीं. एका राज्याचा दुसऱ्या राज्याबरोबर चाललेला संघर्ष, जॉन ब्राउननें एकट्यानें सर्व दाक्षिणात्य राज्यांच्याविरुद्ध दिलेल्या सामन्यापुढें थोरोला फिका वाटत होता.

* * *

थोरो तसा कणखर मनुष्य कधींच नव्हता. हार्वर्डला असतांनाच त्याला एक सहामाही फुप्फुसांच्या विकारापायीं घरीं बसावें लागलें होतें. तेव्हांपासून अधूनमधून त्याचें छातीचें दुखणें त्याला छळीत होतें. थंडीची त्याला वारंवार बाधा होत असे. पण शारीरिक दुबळेपणाकडे कानाडोळा करण्यावर त्याचा विश्वास होता. आपली शारीरिक दशा काय आहे आणि बाहेरची हवा किती खराब आहे याची पर्वा न करतां भटकन्ती करण्याचा त्याचा खाक्या होता. परंतु १८५५ सालच्या आजारानंतर दोन वर्षें त्याची तब्येत तुनुमुनूच राहिली आणि तो कबूल करी त्यापेक्षां त्या आजाराचा पुष्कळच वैताग त्याला वाटला. परंतु त्यांतून तो बरा झाला आणि १८५७ ते १८६० ह्या काळांत त्याची भटकन्ती चालू राहिली. त्याचें चढणें, पाहणी करणें, लेखन, व्याख्यानें देणें हें वरवर पाहतां कुठल्याहि व्यत्ययाशिवाय पूर्वींच्याच जोमानें चालू असल्यासारखें दिसत होतें. १८६० सालीं, वयाच्या त्रेचाळीसाव्या वर्षीं, विशेषतः जॉन ब्राउनच्या बचावासाठीं त्यानें जी नेत्रदीपक कामगिरी

केली तेव्हांपासून थोरोनें थोर पदवी गांठली आहे, असें त्याच्या मित्रांना जाणवूं लागले. लेखक आणि वक्ता म्हणून त्याची कीर्ति सतत वाढत होती. त्यानें केलेल्या निसर्गविषयक टिपणांच्या संग्रहाबद्दल ज्यांना ज्यांना माहिती होती ते ते निसर्गविज्ञानावरील एका महत्त्वाच्या ग्रंथाचा लेखक या दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागले होते. १८६० च्या सुरवातीला त्यानें लिहून ठेवलें : "एखाद्या विषयाचें जसजसें आपण अधिक चिंतन करावें आणि लिहावें तसें तसें लिहिण्यासारखें पुष्कळच अद्याप आहे, असें आपल्याला आढळतें. विचारांतून विचार स्फुरतात. आपल्या हातांखालीं त्यांची वाढ होत राहते." तो म्हणतदेखील असे कीं एखादा बुद्धिशाली मनुष्य आपल्या परगण्याचा इतिहास दुसऱ्या एखाद्याच्या जागतिक इतिहासापेक्षांहि अधिक रोचक करूं शकेल ! बहुधा त्याचा असा विश्वास असावा कीं असें बुद्धिशाली व्यक्तित्व आपल्याला लाभलेलें आहे. निसर्गविज्ञानासंबंधीं त्यानें जें कांहीं साहित्य गोळा केलें होतें त्याशिवाय त्याच्यापाशीं इंडियन लोकांसंबंधीं लाखों शब्द भरतील अशीं टिपणें केलेलीं होतीं. त्यावरूनहि एखादें पुस्तक तयार करणें पुढेंमागें आवश्यक होतें, पण घाई करण्याचें कांहींच कारण नव्हतें. त्याच्या जीवनांत परम संतोष नांदत होता. आणखी चाळीस वर्षें तरी आपण धडधाकटपणें सहज घालवूं शकूं, असें त्याला जाणवत होतें आणि तसें तो आपल्या एका मित्रापाशीं बोललाहि होता.

नोव्हेंबर १८६० चे दिवस. थंडी आणि पाऊस थोरोला चांगलाच बाधला. त्याला भयंकर पडसें झालें आणि थंडीनें तर त्याच्या छातीपर्यंत मजल गांठली. त्या हिंवाळ्यांत खेड्याबाहेर देखील तो क्वचित्‌च पडला असेल. १८६१ चा उन्हाळा आला. थोरो चांगलाच अशक्त झालेला होता. मे महिन्यांत, होरेस मान या आपल्या तरुण वनस्पतिशास्त्रप्रेमी मित्राला घेऊन थोरोनें वायव्येकडे प्रस्थान ठेवलें. मिनसोटाच्या कोरड्या हवेंत आपल्याला बरें वाटेल, अशी त्याची कल्पना होती. शिवाय सीऑक्स जातीचे आदिवासी इंडियन्स अद्याप आपल्या वन्य पद्धतीनें तेथें जीवन कंठित होते, त्यांच्याहि जीवनांत डोकावण्याची पहिली संधि मिळावी हाहि एक हेतु तिकडे जाण्यांत होताच. आगगाडी, इतर गाड्या, नदींतील नावा अशा नाना वाहनांतून चालणारा हा आठ आठवड्यांचा प्रवास म्हणजे

आजारी माणसाच्या दृष्टीनें एक दिव्यच होतें! कॉंकॉर्डमधील सर्वांत मोठ्या पदयात्रिकाची देखील कसोटी लागावी, असा हा प्रवास होता. त्याला त्याचे इंडियन्स भेटले. नायगऱ्याचें दर्शन झालें. अप्पर मिसिसिपीशीं गांठ पडली. कित्येक नव्या वनस्पति आढळल्या. नवे पक्षी दृष्टीस पडले. परंतु तारुण्यांतली ती कुवत मात्र एकदां गेली ती गेली! तो घरीं परतला, पण जातांना ज्या आजारी स्थितींत होता त्याच स्थितींत तो परत आला. त्याचे वडील तीन वर्षांपूर्वींच निवर्तले होते, पण त्याची आई आणि बहीण सोफिया त्याची शुश्रूषा करायला होत्या. परंतु हिंवाळ्यांत त्याला कळून चुकलें कीं रोग साधासुधा नाहीं, काळ जवळ आला आहे. 'दुःखेषु अनुद्विग्न मनः, सुखेषु विगतस्पृहः' अशी त्याची स्थिति होती. त्याचे अखेरचे सहा महिने कुठल्याहि प्रकारें एकाकीपणांत किंवा कर्महीनतेंत गेले नाहींत. त्याला भेटण्यासाठीं सारखीं माणसें येत होतीं. 'द अटलांटिक मंथली' या नियतकालिकाचा त्याच्या मागें निबंधांसाठीं सारखा लकडा लागलेला असे त्यांच्यासाठीं, सोफियाच्या मदतीनें आपले कित्येक निबंध त्यानें फिरून लिहून काढले.

थोरोच्या विचारांचा प्रभाव मोठा असल्यानें त्याच्या लिखाणांतून नेहमींच इतर लोक अवतरणें घेत आणि अखेरपर्यंत अशीच स्थिति राहिली. मृत्यु परिसरांत वावरूं लागल्यानंतर, आपल्या स्वतंत्र जीवनावर शिक्कामोर्तब करणारे त्याचे जे विचार प्रकट झाले ते फार प्रसिद्धि पावले आहेत. थोरोचा एक जुना मित्र होता. परलोकांतील जीवनाविषयीं त्याला फार चिंता. थोरोनें त्याला मृदुपणें उत्तर दिलें," मित्रा,एका वेळीं एकाच 'लोका' चा विचार करणें चांगलें!" त्याच्या मरिया आत्याला फिकीर होती कीं ईश्वराची त्यानें आपल्या भवितव्याबद्दल करुणा भाकली आहे कीं नाहीं. त्यावर,'ईश्वराशीं मीं कधीं दावा मांडला नाहीं,' असें त्यानें उत्तर दिलें. ग्रामीण तुरुंगाधिकारी सॅम स्टॅपल्स हा त्याचा जुना मित्र. थोरोचा वाल्डेनमधला एक दिवस त्यानें एकदां हिरावून घेतला होता आणि त्यांतूनच त्याच्या लिखाणांतील एका थोर कलाकृतीचा जन्म झाला होता. तो एक दिवस त्याच्या भेटीला आला. तो बाहेर येऊन लोकांना सांगूं लागला कीं " आपण जिंदगींत मृत्यूला इतक्या प्रसन्नपणानें आणि शांत वृत्तीनें सामोरे जाणारे कुणी पाहिलें नाहीं."

सारा हिंवाळा त्यानें कण्हतकुंथत काढला आणि वसंत संपूर्ण बहराला आलेला असतांना १८६२ सालच्या मे महिन्याच्या सहाव्या तारखेला त्यानें इहलोकाची आपली यात्रा संपवली. 'मूसे' आणि 'इंडियन' हे त्याच्या तोंडचे अखेरचे शब्द होते.

कॉंकॉर्डच्या नव्या दफनभूमींत त्याची उत्तरक्रिया करण्यांत आली.

पंचवीस वर्षांपूर्वी लकी ब्राउनच्या खिडकींतून हेनरीनें जी कविता अलगद आंत टाकली होती ती तारुण्यांतील भावना अभिव्यक्त करणारी कविता दफनभूमींत अलकॉटनें वाचून दाखवली. इमर्सननें एक प्रभावशाली भाषण करून श्रद्धांजलि अर्पण केली. पुढें ह्या भाषणाची सुधारून वाढवलेली आवृत्ति निबंधरूपानें प्रसिद्धहि झाली. आजवर थोरोविषयीं जें जें लिहिलें गेलें त्या सर्वांहून तो निबंध उजवा आहे.

*　　*　　*

अखेरच्या महिन्यांत आपल्या शक्तीचा उरलासुरला भाग थोरोनें आपलीं टिपणें आणि कागदपत्रें यांची जुळवाजुळव करण्याच्या कामीं लावला. 'द अटलांटिक मन्थली' साठीं त्यानें तीन निबंध तयार केले. 'वॉकिंग', 'ऑटमल टिंट्स' आणि 'वाइल्ड ॲपल्स' हे ते तीन निबंध. नंतर १८६२ सालीं हे निबंध प्रकाशित झाले. तीन वर्षांत त्याच्या लेखांचे चार संग्रहहि निघाले.' एक्सकर्शन्स ', ' मैने वूडस ', ' केप कॉड ' आणि इमर्सननें त्याच्या निवडक पत्रांचा केलेला संग्रह हीं तीं चार पुस्तकें. परंतु त्याच्या लिखाणाचा फार मोठा भाग तोंवर अप्रकाशित असाच होता. त्याच्या नित्य निरीक्षणांचें निष्कर्ष, त्याचे तत्संबंधींचे विचार आणि लिखाण, पंचवीस वर्षांच्या त्याच्या दैनंदिन्या आणि अक्षरानुक्रमानें नीटनेटकीं लावलेलीं हस्तलिखितें यांच्या रूपांत पडून होतें. या संग्रहांतून निवड आणि संपादन करून त्यांतले जें उत्तम वाटेल तें इतरांनीं प्रकाशित करावें अशी स्थिति होती. वोरसेस्टर-मधील थोरोचा मित्र हॅरिसन ब्लेक. (थोरोची फिरण्याची काठी इतर वस्तूं-बरोबर त्यानें एखाद्या मौल्यवान् वस्तूसारखी जपून ठेवली.) त्यानें थोरोच्या लिखाणाचें चिकित्सकपणें संपादन केलें. वर्णनात्मक असा जो भाग त्याच्या दैनंदिन्यांत आढळला त्यावरच त्यानें भर दिला आणि ऋतुमानानुसार त्या

साहित्याची मांडणी केली आणि चार उत्कृष्ट संग्रह त्यानें तयार कल ' अर्ली स्प्रिंग इन मॅसाच्युसेटस ', ' समर ', ' ऑटम ' आणि विंटर ' हे ते चार संग्रह होत.

१८९४ सालीं थोरोच्या साहित्याचे संपादित खंड प्रकाशित झाले, परंतु १९०६ पर्यंत त्याच्या दैनंदिन्या मात्र संपूर्ण स्वरूपांत प्रकाशित झाल्या नाहींत. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस थोरोचा समग्र अभ्यास करणारे दोन संग्रह लिहिले गेले. या दोन्ही संग्रहांत त्याच्या जीवनचरित्राचा भाग कांहीं प्रमाणांतच समाविष्ट केलेला आहे. चॅनिंगचा संग्रह १८७३ चा आणि सॅनबोर्नचा १८८२ मधला. फेबियन समाजवादी हेनरी सॉल्ट या इंग्लिश गृहस्थानें त्याचें पहिलें चरित्र प्रकाशित केलें. सॉल्ट थोरोला कधींच प्रत्यक्ष भेटलेला नव्हता, परंतु थोरोच्या विचारांशीं त्याचा परिचय असाधारण होता. चॅनिंग आणि सॅनबोर्न यांच्याहि पेक्षां तो अधिक होता. त्यानें थोरोच्या जीवनाचें सर्वांगीण दर्शन घडवलें आहे. ' थोरो आणि त्याचा जीवनसंदेश ' यावरील सर्वांत उत्कृष्ट असें पुस्तक त्याचेंच अद्याप आहे.

आपल्याला थोरो समजला आहे असें त्याचे मित्र धरून चालले होते. पण त्याची कविता, त्याचे निसर्गवर्णनपर निबंध आणि साध्या राहणी. विषयींचा त्याचा संदेश या सर्वांचा आवाका त्यांना होता असें म्हणणें अवघड आहे. चाळीस वर्षांच्या उपेक्षेनंतर तो एवंढा प्रसिद्ध होईल आणि अमेरिकेपेक्षां इंग्लंडमध्यें त्याला अधिक ख्याति लाभेल, याची बहुधा त्यांना कल्पना नसावी. थोरोचा जीवनसंदेश पचण्याइतकें एकोणिसावें शतक परिपक्व नव्हतें. विसाव्या शतकाच्या आरंभीं, ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीमधून कुरूप आणि राक्षसी अशी परिस्थिति जीवनांत निर्माण झाली, तेव्हां थोरोच्या संदेशाकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें. स्वातंत्र्याची तहान लोकांना वाटूं लागली आणि व्हिक्टोरियाच्या कारकीर्दींत सुप्रसिद्ध झालेल्या वर्ग आणि धर्मविषयक जड कल्पनांतून बाहेर पडण्याची प्रेरणा समाजांत उदय पावली. ब्रिटिश मजूर चळवळीचा जन्म झाला आणि बुद्धिवाद प्रचलित झाला. सायकलींत झालेल्या सुधारणांमुळें ग्रामीण ब्रिटन प्रकाश आणि हवा यांची उपासना करूं लागलें. नवजीवनाच्या ह्या चळवळीचें स्वतःचें साहित्यहि होतें. रस्किन आणि मॉरिस हे त्यांचे साहित्यिक, परंतु थोरो,

व्हिटमन, एडवर्ड कार्पेंटर आणि त्यांच्यापासून स्फूर्ति आणि प्रेरणा घेतलेला लेखकसंप्रदाय यांचा प्रभाव अधिक मोठ्या लोकसमूहावर होता. ' द ओपन रोड ' या नांवाचा एक निवडक लोकप्रिय गद्य-पद्य लिखाणाचा संग्रह इ. व्ही. लुकास यांनीं १८९९ मध्यें प्रसिद्ध केला. थोरोच्या लिखाणांतील एक वैशिष्ट्यपूर्ण कविता त्यांत समाविष्ट केलेली असून तिचा शेवटचा चरण असा आहे.

' वाहत असलेला वारा
हें एकच एक कोणालाहि माहीत असलेलें सत्य होय. '

शहरी माणसांना ग्रामजीवनाचें जें आकर्षण असतें आणि भूमातेच्या निकट सान्निध्याची जी काव्यात्म ओढ वाटतें त्याला थोरोच्या पर्णकुटींतील जीवनाची कथा हें उत्तर आहे, असें आढळून आलें. इथें हा एक माणूस असा होता कीं ज्यानें जमिनीच्या एका तुकड्यापासून सुरुवात केली. नंतर एक कुऱ्हाड उसनवारीनें मिळवली. स्वतःच झोपडी उभारली. आणि तेथें तलाव, झाडें, पशुपक्षी आणि मधूनअधून येणारे एखाद दोन पै-पाहुणे यांच्या सहवासांत परमानंदांत स्वतंत्रपणें कालक्रमणा केली. हा इथला मनुष्य असा होता कीं ज्याच्याजवळ चारित्र्याचें बळ होतें, निर्मळ मन होतें, सखोल निरीक्षणाचें सामर्थ्य होतें आणि अंतर्वेधी बुद्धिमत्ता होती. वाचकाला त्या सगळ्याबद्दल आदरभाव वाटून अनुकरण करावयाची इच्छा होई.

पण आणखी एक वेगळा थोरो अर्थातूच होता. हा थोरो त्याच्या दैनंदिनींतूनच डोकावतांना काय तो दिसे. अर्थात् त्या दैनंदिन्या सामान्य लोकांच्या वाचनाच्या आवाक्यांत येतच नसत. हा थोरो मोठा गुंतागुंतीचा आणि स्वतःविषयींच कोडें पडलेला असा होता आणि त्याला स्वतःच्या वैफल्याच्या स्वरूपाची आणि विस्ताराची स्पष्ट अशी कल्पना कधींच आली नाहीं. परंतु हा चेहरा जगाला तो दाखवीत नसे. एवढेंच नव्हे तर आपल्या निकटवर्तीयांपासूनहि त्यानें तो लपवून ठेवला होता. त्याच्या जीवनांत आलेल्या सुखहीनतेच्या घडी त्याला माहिती होत्या आणि त्या बहुधा त्याच्या शारीरिक अस्वास्थ्याच्या हातांत हात घालूनच आलेल्या असत. परंतु त्याच्या जीवनाचा मुख्य आणि दृश्य प्रवाह मात्र प्रसन्न अशा झऱ्यांच्या रूपानेंच वाहात असलेला दिसतो. आपल्या छोट्या भूभागांतील निसर्गाचा

तो इतिहासवेत्ता होता. सेलबोर्नचा ग्रामीण निसर्ग इतिहासवेत्ता गिल्बर्ट व्हाइट याच्याशीं या एका बाबतींत त्याचें साम्य दिसून येतें. सामाजिक आणि तात्त्विक प्रश्न, तत्त्वज्ञान, साहित्य आणि लोक या गोष्टींत व्हाइट खूप मन घालीत असे. परंतु त्याच्या व्यक्तित्वांतला शाश्वतभाग म्हणजे त्याच्यांतील निसर्गवेत्ता हाच होय.

लोकांमध्यें निसर्गप्रेम रुजावें म्हणून तळमळणाऱ्या लोकांवर व्हाइट-प्रमाणेंच थोरोंचेंहि ऋण मोठें आहे. १९०० च्या सुमाराला ब्रिटनमध्यें डब्ल्यू. एच्. हडसन ही परंपरा चालवून अगदीं अशाच धर्तीचें निसर्ग-विषयक लिखाण' करूं लागला होता. त्याच्या लिखाणांत विकारवशता नव्हती, परंतु सौंदर्य मात्र तितकेंच होतें. अमेरिकेंत निसर्गविषयक लेखन करणारा जॉन बरो यानें पुष्कळांविषयीं लिहिलें आहे. आपल्या आयुष्याच्या अखेरीस त्यानें लिहून ठेवलें आहे : " थोरो हा एकच होऊन गेला आणि अशी मूल्यवान देणगी दिल्याबद्दल आपण न्यू इंग्लंडच्या ईश्वराचे अत्यंत ऋणी राहिले पाहिजे. थोरोचे गुण अंशतः तरी माझ्या अंगीं असायला हवे होते, असें मला वाटून जातें. त्याच्या लेखनांत जी उच्च नैतिक आणि आत्मौपम्य वृत्ति प्रकट होते आणि जी माझ्या लेखनांत अभावानेंच दृग्गोचर होते त्यामुळें त्याचें लिखाण महाकाव्यांच्या कोटीच्या जवळ जवळ पोंचतें."

तें कांहींहि असो वेगवेगळ्या वृत्तिप्रवृत्तीचें लोक हे त्याच्या साहित्याचे चाहाते आहेत, परंतु निसर्गाच्या सान्निध्यांत राहाण्याचा खंदा पुरस्कर्ता म्हणूनच पुष्कळसे लोक त्याला ओळखतील. वाल्डेनमध्यें त्यानें जितक्या समर्थपणें ह्या गोष्टीचा पुरस्कार केला आहे तसा दुसरा कोणी आजवर तरी केल्याचें दिसत नाहीं. " जर आमच्या खेड्याच्या भोवतीं अज्ञात अशीं जंगलें आणि कुरणें नसतीं तर आमचें ग्रामजीवन हें चैतन्यरहित, जड बनलें असतें. वन्यजीवनाच्या शक्तिवर्धक औषधाची गरज आपल्याला असते. दलदलींतून आणि पाणथळींतून भटकणें आरोग्यवर्धक ठरते. तेथें बगळे आणि पाणकोंबड्या लपाछपी खेळतांना दिसतात आणि पाणलावा झेपावतो त्याचा आवाज कानीं पडतो. लव्हाळ्यांतून दरवळणारा वास आपल्याशीं गोष्टी करतो. अशा ठिकाणीं एखादें जंगली आणि एकाकी कबूतरच तेवढें आपलें घरटें बांधतें. जमिनीवर पोटानें सरपटत जाणारे

छोटे प्राणी तेथें दिसतात. आणि जर आपल्याला खरोखरच धुंडाळायचें असेल आणि शिकायचें असेल तर आपल्या भोवतींच्या या सर्व गोष्टी विस्मयकारी आणि आपल्या आवाक्यापलीकडच्या आहेत असें वाटलें पाहिजे. आपल्या सभोवतीची भूमि आणि समुद्र हा अपार आणि अपरिचित भासला पाहिजे. तो अगाध आणि आपल्याच्यानें धुंडाळून होणार नाहीं असा भासावा. निसर्गाच्या बाबतींत पूर्णविराम असूंच शकत नाहीं."

आपण त्याला निसर्गमातेच्या अंकावर, वसंत ऋतूंत आपल्या प्रियतम जलाशयाच्या सहवासांत विश्राम करण्यासाठीं सोडून देऊं या. "अहाहा, वसंतागमाच्या सुप्रभातीं मीं तीं कुरणें धांडोळून टाकलीं आहेत. एका टेकाडावरून दुसऱ्यावर उड्या ठोकीत, एका वाळुंजाच्या बुंध्यावरून दुसऱ्या वाळुंजाच्या बुंध्यावर कुदत मी भटकलों आहे. निर्मळ सूर्यप्रकाशांत तें अवघें खोरें आणि तें जंगल न्हाऊन निघत होतें. जर आपल्या थडग्यांत कांहीं माणसांची कल्पना आहे त्याप्रमाणें मृत व्यक्ति निद्रा घेत असतील तर त्या देखील ह्या दर्शनानें संजीवित झाल्या असत्या. यापेक्षां अमरत्वाबद्दल आणखी पुरावा तो काय हवा? अशा प्रकाशांत सर्व वस्तूंमध्यें प्राणाचा संचार झालाच पाहिजे."

REFBK-0012396

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १२३९६